





# यशोगाथा

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, ८ मार्च २०२३

# कविता, उखाणे-चारोळ्यांतून गणित सोपे करणाऱ्या प्राचार्या सौ. छाया खेडकर



आधुनिक केसरी

**शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी गणित हा विषय कविता उखाणे व चारोळ्यांच्या माध्यमातून सहजसोप्या भाषेत शिकवत ते पुस्तकरूपाने विद्यार्थ्यांच्या हाती देत एक वेगळी ओळख निर्माण केली आणि गणिताचे मूलभूत ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवू शकले यापेक्षा मोठा आनंद आयुष्यात कोणताही नसल्याची भावना गणित विषयाला वाहून घेतलेल्या अनोख्या शिक्षिका प्राचार्या श्रीमती छाया खेडकर यांनी जागतिक महिला दिनानिमित्त आधुनिक केसरीच्या यशोगाथेत विशेष संवाद साधत व्यक्त केली.**

गणिताचे लिखाण, प्रकाशन स्वतःचे असलेले आणि गरजू विद्यार्थ्यांपर्यंत ते पुस्तक रूपाने पोहोचवण्याचे ( वितरण ) एक वेगळे कार्य प्राचार्य श्रीमती छाया खेडकर यांनी करून दाखवले आहे. गणिताच्या मूलभूत संकल्पना ( 1000 ) , गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच( 500 ), उखाण्यातून गणित व जनरल नॉलेज( 1000 ), काव्य गणित ( 1000 ) अशा पुस्तकांची स्वतः निर्मिती करीत शाळा, महाविद्यालय यांना भेट देत त्या पुस्तकाची संकल्पना, उपयोजन इत्यादी विद्यार्थी आणि शिक्षकांना समजावून सांगत ते त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचे एक वेगळे शैक्षणिक कार्य प्राचार्य खेडकर यांनी केले आहे. त्यांच्या लेखन कौशल्याची चुणूक ही पुस्तके वाचताना आणि आत्मसात करताना नक्कीच येते. माझी इच्छाशक्ती प्रबळ असल्यामुळे गरीब, होतकरू वंचित, घटकातील विद्यार्थ्यांसाठी गणिताचे सहज सोपे भांडार मी उभे करू शकले असे सांगत त्या पुढे सांगतात, गणिताच्या बेसिकची मुलांना खूपच गरज आहे. इयत्ता आठवीपर्यंत बेस पक्का असला की गणित विषय सहज सोपा वाटत राहतो. मी अगदी सहा सात महिन्यात हे गणित पुस्तकांचे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवू शकले. स्वतःच्या प्रचंड मेहनतीवर 2016 पासून या लिखाणात मी गुंतले आणि यशस्वीदेखील झाले. ऊन, वारा ,पाऊस झेलत प्राथमिक, माध्यमिक शाळांना प्रत्यक्ष भेट देत गणिताचा पुस्तकरुपी जागर घडवून आणला. या कामी बऱ्याच अडचणींवर मात करीत मी धीराने सामोरे गेले. गोरगरिबांच्या मुलांना छत्तीस वर्षे गणित ज्ञान दिले. त्याचा आनंद पुस्तक रूपाने मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर माझे अनेक शिक्षकांनी कौतुक केले.


आजच्या पिढीतील शिक्षकांचे बेसिक स्पष्ट नाही. एकाने एक जोडत जातात. जे खरेच शिक्षक व विद्यार्थी तळमळीचे काम करत आहेत त्यांनी माझे पुस्तक विकत घेऊन त्याचे महत्त्व जाणून घेतले याचा अभिमान वाटतो. बाजारातील पुस्तके ही व्यवसाय म्हणून आपल्या माथी मारली जातात. माझी चारही पुस्तके सहज सोप्या भाषेत आणि संकल्पना स्पष्ट करून गणिताबद्दलचे प्रेम वाढवतात. म्हणून प्राथमिक स्तरावर पूर्व माध्यमिक ( पाचवी ) ,आणि उच्च माध्यमिक ( आठवी ), शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय शिष्यवृत्ती परीक्षा, महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा, राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना परीक्षा, लोकसेवा आयोग , राज्यसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी ही पुस्तके विद्यार्थ्यांना लाभदायक ठरली आहेत. ही पुस्तके अंक गणित, बीजगणित, भूमिती या विषयांवर विद्यार्थ्यांस विविध गुणधर्म, संकल्पना स्पष्ट करीत विद्यार्थ्यांना भावतात.

**आम्ही दहा जण भाऊ भाऊ**
**पहिल्याचे नाव शून्य, दहाव्याचे नाव नऊ**
**आम्ही दशमान संख्या चिन्ह,**
**अंकगणिताची सुरुवात करून पाहू...**

ही कविता सहजपणे विद्यार्थ्यांची गणिताची गोडी वाढवत जाते. म्हणून कठीण परिस्थितीतून संघर्ष करीत शिक्षण क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान अनेकांसाठी प्रेरणेचा विषय आहे.

एखाद्या विषयासाठी वाहून घेत त्यात यशदायी कार्य करणा-या व्यक्तिमत्वात प्राचार्य खेडकर यांचे नाव अभिमानाने घ्यावेच लागते. म्हणूनच अल्पावधीत त्या विद्यार्थीप्रिय होतात हे त्यांच्या यशाचे मोठे गमक आहे. इच्छा असूनही त्यांना इंजिनियर होता आले नाही. भौतिकशास्त्र विषय सोडून गणित विषयाची आवड निर्माण करीत त्यात त्यांनी प्रगतीचा केलेला प्रवास खूप मोलाचा वाटत राहतो. असंख्य कविता आणि उखाणे यांचे भांडार त्यांनी उघडून ठेवल्यामुळे गणिताबद्दल आवड मनोरंजन आणि हसत खेळत गणित शिकण्याची सकारात्मक भावना निर्माण होऊन व्यवहारिक ज्ञान व शास्त्रीय दृष्टिकोन विद्यार्थ्यांत विकसित होतो. स्वावलंबन, नीटनेटकेपणा , तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता विकसित केल्यामुळे गणित विषयाच्या मनो-याकडे एक प्रेरणादायक शिखर म्हणून पाहता येईल अशी भावना शेवटी प्राचार्य खेडकर यांनी आधुनिक केसरीच्या यशोगाथेत व्यक्त केली. म्हणूनच जागतिक महिला दिनी एका आगळे वेगळे कार्य करणाऱ्या शिक्षकेचा गौरव करताना आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. त्यांच्या कार्यास आधुनिक केसरी परिवाराच्या वतीने मनःपूर्वक शुभेच्छा.. अभिनंदन..!

**शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड**
**छत्रपती संभाजीनगर, मो :9423051246**





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

रोज सकाळी लवकर उठणे, फिरायला जाणे किंवा काही व्यायाम करणे, रोज एखाद्या चांगल्या ग्रंथाचे वाचन करणे, घरातील छोटीमोठी कामे करणे, आपला थोडा वेळ दुसऱ्यासाठी देणे या सारख्या सवयी आपल्याला जाणीवपूर्वक जोपासाव्या लागतील. पण त्या आपल्या आयुष्यात कायमस्वरूपी चांगला बदल घडवून आणतील. जसे चांगल्या सवयी जोपासणे हे आपल्या हातात असते, तसेच काही वाईट सवयी लागल्या असतील तर त्या सोडणे पण आपल्या हातात असते. फक्त त्यासाठी मनाचा निश्चय करावा लागतो. एकदा एक श्रीमंत सावकार होता. पण तो अतिशय कंजूष होता. थोडा दानधर्म करावा असे त्याला वाटत असे. पण त्याच्या हातून पैसा सुटत नव्हता. कोणाला द्यायची इच्छाच होत नव्हती. शेवटी तो एका साधुमहाराजांकडे गेला. त्यांना त्याने आपली व्यथा सांगितली. साधुमहाराजांनी त्याला दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले. ते उन्हाळ्याचे दिवस होते. तरी साधू महाराज अंगावर एक गरम कांबळे ओढून बसले होते. ते घामाने डबडबले होते. तो सावकार आला तेव्हा त्याला हे पाहून आश्चर्य वाटले. तो म्हणाला, महाराज तुम्हाला बरे वाटत नाही का ? एवढ्या गर्मीत आपण कांबळे का घेतले आहे ? तेव्हा साधू महाराज म्हणाले की काय करू ? माझी पुष्कळ इच्छा आहे. पण त्या कांबळ्याने मला धरून ठेवले आहे. तेव्हा सावकार म्हणाला, असे कसे होईल महाराज ? कांबळे तुम्हाला कसे धरून ठेवेल ? ज्या क्षणी तुम्ही ठरवाल , त्या क्षणी तुम्ही कांबळे फेकून देऊ शकता. हे ऐकल्यावर साधू महाराज म्हणाले, ' अगदी तसेच तू ज्या क्षणापासून मला द्यायचे आहे असे ठरवशील , त्या क्षणापासून तू देऊ शकशील. तुला कोणी रोखू शकणार नाही. ' फक्त चांगली गोष्ट करण्याचा आणि वाईट गोष्ट सोडण्याचा निश्चय करणे आधी आवश्यक आहे. आपण ठरवले तर अशा रीतीने आपल्या वाईट सवयीचा त्याग करू शकतो. ते आपल्याच हातात आहे.



## आनंदी पहाट

# सौंदर्याचा आत्मिक आनंद मिळणे आवश्यक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या दैनंदिन जीवनात देखील आपण नेहमीच सौंदर्याला पाधान्य देत असतो. ते मिळवण्यासाठी विविध प्रकारे प्रयत्नशील असतो. या सौंदर्याची व्याख्या करणं शक्य असलं, तरीही त्याची प्रचिती प्रत्येकाला स्वतंत्ररित्या येत असते. व्यक्ति तितक्या प्रकृती, त्यामुळेच प्रत्येकाला सौंदर्याची प्रचिती निरनिराळ्या प्रकारे येत असते. सौंदर्याचा शोध कधी संपतच नसतो. आपल्या घराच्या सजावटीत तर अगदी मुख्य प्रवेशद्वारापासून प्रत्येक वस्तूंमध्ये, कामामध्ये आपण घेतलेला सौंदर्याचा शोध प्रदर्शित झाला पाहिजे. या सौंदर्याच्या प्रचीतीमुळेच आपल्या घराचं अंतर्गत संरचनेचं काम हटके होऊ शकतं. मोर फक्त भरून आलेल्या ढगांसाठी नाचत नाही. त्याप्रमाणे कलावंत केवळ मैफिलीसाठी फुलत नाही. ह्या दोन्हीतील सौदर्य जाणणारा एक तिसरा साक्षीदार असावा लागतो. एक सावध जाणकार हवा असतो. अंतर्गत संरचना आणि सजावट करताना उपयुक्तता, सौदर्य ह्या दोन्ही बाबींना अधिक महत्व असतं. या दोन्हींचा मिलाफ झाल्यामुळेच आपल्या घराचं अंतर्गत सजावटीचं काम पूर्णत्वास जाऊ शकतं. आपल्या शारीरिक गरजा भागवण्यासाठी उपयुक्तता आणि मानसिक आनंद देण्यासाठी सौदर्य महत्वाचं असतं, हे आपण समजून घेतलं पाहिजे. आपण केवळ शारीरिक गरज म्हणून गृहसजावट या विषयाकडे बघत असतो, पण मानसिक, आंतरिक आणि आत्मिक आनंद मिळवण्यासाठी निराळा विचार किंवा प्रयत्न करतोच, असं नाही. सौंदर्याचा आत्मिक आनंद मिळवण्यासाठी आपल्याला कल्पकतेच्या माध्यमातून आणि सौंदर्यदृष्टीच्या सहाय्यानं अंतर्गत संरचना साकारण्याची जरूरी असते. यावेळी आपल्याला गरज असते आपल्या सजगतेची, वैचारिक प्रगल्भतेची, नाविन्याची, सौदर्यदृष्टीची, कल्पकतेची, नवलाईची. ह्या सर्व बाबींच्या माध्यमातून आपल्याला अपेक्षित आनंद मिळवणं शक्य होऊ शकतं.



आधुनिक केसरी

**डोले अंतरंग | पुण्याईचा ||**
ज्याच्या मनी वसे | सकाम विचार ||
त्याचा सदाचार | शुद्ध कैसा ? ||१||
दान-धर्मासाठी | नाही पुढे आला ||
शांती सुख त्याला | लाभे कैसे ? ||२||
सेवाधर्म ज्याने | जाणला न कधी ||
लाभे मृत्यू आधी | नर्क येथे ||३||
निष्काम भावना | अंगी जोपासता ||
पांडुरंग त्राता | होई त्याचा ||४||
पुण्यवंता लाभो | सत्कर्माचा संग ||
डोले अंतरंग | पुण्याईचा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

षोडशीं स्वर्णवस्त्रां त्वां राजराजेश्वरीं पराम् ।
श्रीललिताम्बिकां देवीं चन्द्रहासे कृपां कृताम् ।।
स्वर्णिम वस्त्र लेवलेल्या तुला षोडशी,
राजराजेश्वरी, परा, चंद्रहासावर कृपा केलेल्या
श्रीललिताम्बिका देवीला मी वंदन करतो.
|| इति चन्द्रहासविरचितं श्रीललिताम्बिकावंदनम् ||



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**सद्गुरु शरणहिं उबरै, होय स्वतन्त्र भवधार । माया दुस्तर तरन है, जासों विधि हरि हार ।।०२।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/०२ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** सद्गुरूंना शरण गेल्याने मानवाचा उद्धार होतो. स्वतंत्र, मनमुखी व्यक्ती प्रकृती-प्रवाहात ( भवधारेत ) वहावत जातो. प्रकृतीला, मायेला पार करणे अती कठीण आहे. मायेच्या पाशात ब्रह्मा, विष्णू आणि महेश तिघेही अडकून पराजित झाले आहेत, तिथे साधारण व्यक्ती बद्दल काय बोलावे ? म्हणून या संसार सागरातून पार होण्यासाठी दीन-अधीन बनून सद्गुरू शरणागत होऊन ब्रह्मविद्येच्या वैज्ञानिक साधनेद्वारे जीवन काळातच ईश्वर साक्षात्कार करणे हाच सर्व मानव मात्राचा धर्म आहे.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

मित्रांनो आपण आजकाल पहातो वाचन संस्कृती कमी कमी होत चालली आहे. हे सभ्य सुसंस्कृत समाजाचं लक्षण नाही. सध्या समाजात प्रसार माध्यमांचं पीक वारेमाप निघालं आहे. त्यामुळे वाच करण्यासाठी कुणाला वेळ नाही. ऊत्तोमत्तम लेखन व ते वाचायला वाचक वर्ग तयार व्हावा असे मला मनापासून वाटते. काय वाचावे साधंसरळं रसाळ मनाला आवडेल,ज्या वाचन संकल्पनेत माझ्या आयुष्यात हळूहळू का होईना बदल होईल असे वाचन असावे.आपल्या आयुष्याला दिशा दाखवणारे लिखाण असावे. परस्पर संबंध अधिक प्रमाणात द्रुढ होतील असे वाचन असावे.ज्या लिखाणाने समाजातील दुही निर्माण होईल,तेढ निर्माण होईल,एकमेकांच्या विषयी दुरावा निर्माण होईल. असे वाचन,श्रवण करणे हे समर्थाच्या मते निंदनीय आहे. समाजात बंधूभाव वाढीस लागावा अशी अपेक्षा आहे. संत साहित्याचा अभ्यास करत असताना प्रत्येक संतांचे मत हेच आहे. असे दिसते. ज्या ग्रंथामध्ये पध्दतशीर आणि तर्कशुद्ध अध्यात्म सांगितले आहे असेच ग्रंथ वाचावेत.

# मला जनप्रियत्व फार आवडते

आधुनिक केसरी



इथून जाणाऱ्या मंडळींना निरोप देताना मला खरोखरच फार वाईट वाटते. पुन्हा आपली भेट होईल की नाही ते काही सांगता येत नाही. तुम्ही सर्वांनी एकमेकांशी अत्यंत प्रेमाने वागा. प्रेमाने जग जिंकता येते. तुम्ही माझ्यापासून जनप्रियत्व शिका. मला जनप्रियत्व फार आवडते. कारण जो लोकांना आवडतो, तोच भगवंताला आवडतो. जो निःस्वार्थी असेल त्यालाच जनप्रियत्व येईल. जो भगवंताच्या इच्छेने वागेल त्यालाच जनप्रियत्व येईल. आपण आपल्यासाठी जे करतो ते सगळ्यांसाठी करणे, हे भगवंताला आवडते. आपण आपल्यापुरते न पाहता सर्व ठिकाणी भगवंत आहे असे पहावे. प्रत्येकाला आपण हवेसे वाटले पाहिजे. असे वाटण्यासाठी लोकांच्या मनासारखेच वागले पाहिजे किंवा त्यांना आवडेल तेच बोलले पाहिजे असे नाही. प्रेम करायला कशाचीही जरूरी लागत नाही; पैसा तर बिलकूल लागत नाही, हे मी माझ्या अनुभवावरून सांगतो. जगात कुणी कधी भोगली नसेल एवढी गरिबी मी भोगली आहे. अशा गरिबीमध्ये राहूनही माझे अनुसंधान टिकले, मग तुम्हाला ते टिकवायला काय हरकत असावी ? मी जर काही केले असेल तर मी कधीही कुणाचे अंतःकरण दुखवले नाही. तेवढे तुम्ही सांभाळा. जो जो कोणी मला भेटला, तो तो मी आपलाच मानला. मी नुसता खेळ मांडला आणि तो खेळलो; त्यामुळे त्याचे सुखदुःख मला कधी बाधले नाही. नाम घ्यायची इच्छा पूर्ण झाली नाही म्हणून मी पुन्हा जन्मास आलो. मला तुम्ही सगळे रामरूप दिसत आहात. मला जे सांगायचे असेल ते मारुतीरायाला सांगावे म्हणजे ते मला कळते. माझा मनुष्य कुठेही असला तरी तो माझ्याकडेच येणार. मला दुश्चित्तपणा अगदी आवडत नाही. ज्यांनी माझी निंदा केली त्यांना तर मी कोण हे कळले नाहीच; पण ज्यांनी माझी स्तुती केली त्यांना मी कोण आहे हे त्याहून कळले नाही. प्रत्येकाला वाटते की आपल्याला लोकांनी चांगले म्हणावे, मी मात्र वागायचा तसाच वागेन; हे कसे शक्य आहे ? नाम घेतल्याने आपले सर्व अवगुण आपल्यालाच कळून येतील याबद्दल खात्री बाळगा आणि अंतःकरणपूर्वक नाम घ्या. एक भगवंताचे नाम घट्ट धरावे, त्यामधे अती उत्कटता ठेवून एकतानता करावी आणि स्वतःला पूर्ण विसरून जावे. 'मी नाम घेतो' हे देखील विसरून जावे. हाच खरा परमार्थ होय. नामामधे एकतानता होण्यासाठी भगवंताच्या साक्षित्वाने वागा; हवे-नकोपण टाकून द्या; राम कर्ता ही भावना ठेवा; विषय मालकीने भोगा; आपला गुण भगवंताकडे लावा; लहान मूल होऊन देवाकडे जा; रामाला आपले सुखदुःख सांगा; देहभोगाला कंटाळू नका; काळजी 'घ्या' पण काळजी 'करू' नका आणि निर्भय बना आणि अशा रीतीने जिवंतपणी आपले मरण पहा. **आजचे बोधवचन आहे - जिथे नाम आहे तिथे मी आहे म्हणून खचित समजा. श्रीराम समर्थ**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

येर येरा कांचणी भेटे । आगी उठे तेथूनी ॥२॥
तुका म्हणे कापूं नाकें । पुढें आणिकें शिकविती ॥३॥
वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती । जाणा त्या निश्चितीं देव नाहीं ॥१॥ भाडेकरी वाहे पाठीवरी भार । अंतरींचें सार लाभ नाहीं ॥ध्रु.॥
देवपूजेवरी ठेवूनियां मन । पाषाणा पाषाण पूजी लोभें ॥२॥
तुका म्हणे फळ चिंतिती आदरें । लाघव हे चार शिंदळीचे ॥३॥
पवित्र सोंवळीं । एक तीं च भूमंडळीं ॥१॥
ज्यांचा आवडता देव । अखंडित प्रेमभाव ॥ध्रु.॥

जागतिक
महिला
दिन विशेष

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, ८ मार्च २०२३



# कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या स्त्री शक्तीला सलाम !

## स्त्री शक्तीचे मंथन

८ मार्च प्रत्येक वर्षी महिला दिन म्हणून आपण जगभर मोठ्या आनंदाने साजरा करतो. महिलांचा सत्कार, त्यांना रणरागीणी, चंडीमाता, कालीमाता, जगजननी,



डॉ. दीपाली उमाळे, वाशी नवी मुंबई

सहरिणी, अशा एक नाही अनेक रूपांच्या उपमा दिल्या जातात. स्तुती सुमनांचा वर्षाव त्यांच्यावर केला जातो पण पुढे काय महिला शक्तीचा जागर खरंच यावर चिंतन करण्याची गरज हा एक दिवसाची प्रचिती नसून, आयुष्य भराचा सोहळा आहे. देवाने घडवतानाच पुरुषाला कष्ट करण्यासाठी जास्त पिळदार, कुटुंबाच सौरक्षण करण्यासाठी दणकट शरीर बहाल केलं तर स्त्रीला नवीन जीवाचे संगोपन करण्यासाठी नाजूक पण कणखर मायाळू असं मन देऊन तीची निर्मिती केली ही मूळ गोष्ट आपण समजून घेत नाही आणि स्त्री पुरुष असं बरोबरी आणि तुलना करत राहतो. महिला ही अबला नाहीच मुळी ती जन्मताच सबला आहे, स्वावलंबी आहे आठव्या ते नवव्या महिन्यातच ती चालायला लागते वात्सल्याचा प्रतीक बनून आई-वडिलांना प्रेम देते भातुकलीचा संसार देखील ती किती टापटीप व देखना थाटते पुढे शाळा कॉलेज स्वतः जबाबदारीने शिक्षण पूर्ण करून लग्न करून दुसऱ्याच्या घरी जाते तेथे पण नंदनवन फुलवते, तिच्यावर वाढणाऱ्या जबाबदाऱ्यां न संपणाऱ्या अक्षय अशाच असतात. सासरची काळजी, माहेरचा ओलावा टिकून ठेवणे, ऑफिस ची कसरत, नवऱ्याच्या कसोटीत उतरण, मातृत्व, ही तारेवरची कसरत करता करता सबलीकरणाच्या नावाखाली चक्रव्यूहात ती अडकत जाते. रिटायरमेंट हे फक्त पुरुषांनाच असतं स्त्रीला कधी ते नसतंच मुळी. ती जिवंत असेपर्यंत तिच्यावर फक्त अपेक्षांचाच ओझं असतं. प्रत्येक पातळीवर स्वतःला सिद्ध करण्यासाठी झुंज देत असते वयाच्या अकराव्या वर्षी मासिक पाळीच्या चक्रात ती अडकली जाते पुढे हे आयुष्यभर चक्र सुरूच राहतं शिक्षण लग्न मुलं अर्थार्जण संगोपन या बेड्या मधे स्वतःला बंदिस्त करते. तिला या बदल्यात काय मिळतं ? लग्नानंतर स्वतःचं नाव पण तिला बदलावं लागतं! स्वतःचं अस्तित्व मिटवावं लागतं, स्वतःच्या रक्ता मासाच मुलं पण तिचं नाव लावत नाही, फक्त उपरेपणाच, माहेरी तिचं अस्तित्व पुसलं जात न सासरी ते स्वीकारलं जात, त्यावर स्त्रियांवर मीमांसा करणारे लोक, जोक मारणारे लोक, स्त्रियांवर मीम्स बनवणारे लोक हे तर तयारच असतात तिच्यावर हसायला. ती कुठल्याच बाबतीत कमकुवत नाही पण तिच्यावर असणाऱ्या जबाबदाऱ्यांच्या ओझामुळेच ती स्वतःला वेळ देऊ शकत नाही. जर खरच प्रत्येक नवऱ्याला आपल्या बायकोचा अभिमान असेल! जर प्रत्येक मुलाला आईची कदर असेल! तर तुम्ही तिला तुमच्याच घराची जबाबदारी पेलायला मदत करा. तिच्यावर हसणं थांबवा, तिचा पण आदर करा. तिला थोडं मोकळं सोडा, तिला पण श्वास घेऊ द्या, कधीतरी तिला पण आईत जेवायला द्या, मैत्रिणीच्या घोळक्यात तिला पण वावर करू द्या. ती संभोगाची वस्तू नसून, एक निरागस सुंदर, देवाने पूर्ण वेळ घेऊन, स्त्री ही विश्वात बनवलेली एक मतेची, त्यागाची, संयमाची, धीराच प्रतीक आहे त्याला जपा मित्रांनो. मैत्रिणींनो आजच्या दिनी मी तुम्हाला एवढंच सांगते ते स्वत्व जपा, स्वतः स्वतःसाठी वेळ काढा, प्रत्येक दिवस आनंदात जगा, तुमचे छंद जोपासा, तुमच पण अस्तित्व आहे समाजात हे पण प्रत्येकाला कळू द्या. हेच खरं सबलीकरण आहे माझ्या शब्दात.

## पूर्णांगिनी

नवरा बायको, दोन मुलं वा एक मूल अशी साधारण कुटुंबाची हल्ली रचना आढळते. संयुक्त कुटुंब पद्धती आता कमी होऊ लागली आहे. या आगोदर कोणत्याही कारणाने जोडीदाराचा मृत्यू झाला तर त्या बाईला



डॉ.सोनिया कस्तुरे सांगली

आणि तिच्या मुलांना सर्वस्वी सासरच्या किंवा माहेरच्या लोकांवर अवलंबून राहावे लागत असे. एका बाजूला तिची ते त्यांच्या परीने जबाबदारी उचलताना दिसत होते. दूसऱ्या बाजूला तिला कुणाकडूनही मदत न मिळाल्याने तिची खूप वाईट अवस्था होत असे. आता ही काही ठिकाणी हे पाहावयास मिळत आहे. सावित्रीजोतीबांनी शाळेची सुरुवात केली त्या काळात जे स्त्रीयांचे हाल होते ते आता कमी झाले आहे. तेव्हा पेक्षा बराच बदल झालेला आहे. त्यावेळी मुलींचे शिक्षण खूपच कमी असायचे अगदी वाचायला येण्या इतपतच होते. हल्ली मुलींचे माध्यमिक तसेत उच्च माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण चांगले आहे. त्यांचे स्वाभिमान, आत्मभान जागृत होताना दिसत आहे. अडथळे कमी झालेले नाहीत वा पुरुषसत्ताक/ पितृसत्ताक व्यवस्थेत खूप काही अफलातून बदल झालेले दिसून येत नाहीत, तरीही शिक्षणाने इच्छाशक्ती व आत्मविश्वास वाढला आहे असे म्हणता येईल. सावित्रीजोतीबांच्या आणि बाबासाहेबांच्या योगदानाचे हे फलित आहे. हे विसरुन चालणार नाही. कुणावरही अवलंबून न राहता स्वावलंबी होण्याची इच्छा प्रबळ होताना दिसते आहे. त्या प्रबळ ईच्छाशक्तीला सहकार्याची जोड म्हणावी तशी मिळत नाही. सगळेच अलबेला आहे असे नाही पण जात्यापासून काम्पुटर, स्मार्ट फोन पर्यंतचा तिचा प्रवास अनेक अडथळ्यांच्या शर्यतीतही उठावदार झाला आहे.ला आईची कदर असेल! तर तुम्ही तिला तुमच्याच घराची जबाबदारी पेलायला मदत करा. तिच्यावर हसणं थांबवा, तिचा पण आदर करा. तिला थोडं मोकळं सोडा, तिला पण श्वास घेऊ द्या, कधीतरी तिला पण आईत जेवायला द्या, मैत्रिणीच्या घोळक्यात तिला पण वावर करू द्या. ती संभोगाची वस्तू नसून, एक निरागस सुंदर, देवाने पूर्ण वेळ घेऊन, स्त्री ही विश्वात बनवलेली एक मतेची, त्यागाची, संयमाची, धीराच प्रतीक आहे त्याला जपा मित्रांनो. मैत्रिणींनो आजच्या दिनी मी तुम्हाला एवढंच सांगते ते स्वत्व जपा, स्वतः स्वतःसाठी वेळ काढा, प्रत्येक दिवस आनंदात जगा, तुमचे छंद जोपासा, तुमच पण अस्तित्व आहे समाजात हे पण प्रत्येकाला कळू द्या. हेच खरं सबलीकरण आहे माझ्या शब्दात. जोडीदाराचा अचानक मृत्यू झाल्यावर अथवा शेतकरी कुटुंबात व इतर व्यवसायात जोडीदाराने अनेक अडचणींना तोंड देताना आलेल्या मानसिक तणावाने स्वतःचे जीवन संपवलेले असले तरी या महिला हिंमतीने जगणं उभे करताना दिसतात. कोविडच्या काळात अनेक जणींनी जोडीदार गमावला. अशा एकल स्त्रीया न खचता पुर्णांगीनी होऊन आई व बापाची भूमिका निभावताना दिसतात. शिवाय विधूर पुनर्र विवाहासाठी कुमारीच शोधताना दिसतात. विधवांच्या पर्यायाचा विचार पुनर्रविवाहासाठी विधूर करीत नसतील तर त्यांना त्या आगोदरच्या आपत्यासहित स्विकारणे तर दूरची गोष्ट. अगदीच अपवाद म्हणून कुठेतरी हाताच्या बोटावर मोजण्या इतके आपत्यासहित विधवेशी लग्न करणारे दिसतात. फुलेंनी त्यांच्या काळात सुरु केलेले विधवा पुनर्रविवाह अजूनही प्रत्यक्षात उतरताना दिसत नाही. पण विधवा बायका स्वबळावर ताठ मानेने जगताना दिसतात. किंवा काही महिला लग्न न करता अथवा लग्न राहून गेलेल्या स्वतःच्या हिंमतीवर जगताना दिसतात अशांनाच मला पुर्णांगिनी म्हणायचे आहे. माझ्या मते कर्तव्यतत्पर, निस्पृह, निष्कपट, निःस्वार्थी, परोपकारी, धेय्याला समर्पित, जगण्याची आस असलेले, मृदू पण तितकेच कठोर आणि कणखर ते नेहमी सुंदर! माझ्या आयुष्यात खऱ्या अर्थाने सुंदर असलेल्या अशा अनेक स्त्रीया आहेत. यांचे जोडीदार तसे नावापुरतेच जोडीला होते. काही करकोळ गोष्टी सोडल्या तर मुलं जन्माला घालण्यातच जोडीदाराचा काय तो सहभाग. अन्यथा संसाराचा गाडा या माऊलींनीच पुढे ओढत नेला. जोडीदार सोडून गेल्यावरही कोणत्याही प्रसंगाला बळी न पडता, सामाजिक व्यवस्थेला शरण न जाता, प्रामाणिक आणि तत्वनिष्ठ जगण्यावर त्यांनी मनापासून प्रेम केले.

## बंधन

बंधन या शब्दाचे खूप वेगवेगळे अर्थ असू शकतात. बंधन म्हणजे मर्यादा, बंधन म्हणजे कुंपण किंवा चौकट . बंधन म्हणजे वचन. बंधन म्हणजे नातं. असे कितीतरी वेगवेगळे अर्थ बंधन या शब्दाचे होऊ शकतात. पण, तुम्ही बंधन कोणत्या दृष्टिकोनातून पाहता हे फार महत्त्वाचं असतं. खरं सांगायचं म्हटलं तर बाळाच्या जन्माच्या आधी पासूनच त्यांची नाळ आईशी बांधली गेलेली असते त्यामुळे ते नातं ते बंधन,



सिमा देशमुख अमरावती

तेव्हाच सुरू झालेलं असतं. म्हणजे ,माणूस जेव्हा जन्माला येतो, त्याची सुरुवातच ही गोड नात्याने एका बंधनाने सुरू होते. तेव्हापासून त्या बाळाला फक्त आईचं हि आपल्या जवळची आहे असं त्याला वाटत असतं. कारण लहान बाळाला सर्वात आधी त्याची आई ही जवळची असते. तिचा स्पर्श , तिचे लाड करणं, संगोपन कारणं यातून कळत नकळत आई आणि लेकराच नातं जन्माला येत असतं. जगात सर्वश्रेष्ठ आहे आई लेकरच नातं . याला कुठेच तोड नाही.असे किती तरी नाते एका स्त्री मुळे आपल्या आयुष्यात येत असतात. आणि जसजसा माणूस मोठा होत जातो तेव्हा त्याच्या जीवनात अनेक नातें निर्माण होतात . त्यात बहीण भाऊ, बाप लेक असे अनेक नातें असतात . थोडक्यात काय ? एका नात्याच्या बंधनापासून अनेक नाती तयार होतात . एका छोट्याशा राखी च्या धाग्याने बहीण-भावाचं नातं हे मजबूत होतं. म्हणून त्याला कदाचित रक्षाबंधन असं म्हटले जाते. लग्नानंतर जेव्हा मुलगी सासरी जाते तेव्हा तिच्या पदराची गाठ तिच्या आयुष्यात येणाऱ्या एका नवीन व्यक्तीशी बांधली जाते.

गाठ म्हणजे बंधन शालू आणि शेल्याची ची गाठ म्हणजे साता जन्माची गाठ किंवा लग्नाची रेशीमगाठ आपण म्हणतो. आणि या पवित्र नात्यावर स्त्री आपला संसार थाटत असते. फक्त या बंधना वर अनेक ऋणानुबंध बांधले जातात. बंधन म्हणजे एकमेकांशी बांधले जाणे. बंधन म्हणजे एकमेकाला समजून घेणे. परंतु या बंधनांचा जेव्हा अतिरेक होतो , बंधनाचा त्रास होतो, तेव्हा ते बंधन आपल्या अवती भवती ते एक काटेरी कुंपण बनून जातं .तेव्हा त्यात बंधनात प्रेम नसतं . जेव्हा स्त्री वर एखादे नाते लागलं जातं तेव्हा ते बंधन नको वाटतं. समाजात अश्या किती तरी महिला आहेत ज्या अजूनही काही जाचक बंधनांमध्ये अडकलेल्या आहेत . काही ठिकाणी महिलांना अजूनही बंधनात किंवा अती धाकात ठेवतात .आणि ज्यावेळेस ही बंधन नकोशी होतात . मग काही स्त्रिया ते तोडण्याचा प्रयत्न करतात . तेव्हा त्या स्त्रीला मुक्त विचार सरणीची किंवा जास्त आधुनिक विचाराची आहे ! असे अनेक लेबल तिच्या नावाला लावले जातात .बंधन असावे पण ते कुणाला त्रास देणारे असू नये. थोडंफार बंधन असावं, अति स्वातंत्र्य मिळाल्यास स्वैराचार नसावा. आजची स्त्री मात्र हुशार चपळ आहे .सर्व नाते संबंधांना सांभाळणारी आहे. म्हणूनच ती आपल्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक नात्याला बंधनाला अगदी व्यवस्थित सांभाळते. मग ते बंधन न राहाता तिच्या आयुष्याचा एक भाग होऊन जातं.

## महिला दिन: एक चिंतन!

आज सर्वत्र महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. महिलांचे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. प्रत्येक क्षेत्रात महिला कार्यरत आहेत. महिला स्वतःला पूर्णपणे झोकून देऊन आपले काम उत्कृष्टपणे पार पाडत आहेत. आपले काम बिनचूक व्हावे यासाठी खूप मेहनत घेताना त्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. बुद्धिमत्ता, कौशल्य, कर्तृत्व सिद्ध करताना महिला कुठेही कमी पडत नाहीत. कुटुंबातील कोणताही निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य तिला नसते. घरातील मोठ्या माणसांवर तिला कायम अवलंबून राहावे लागते. ग्रामीण भागातील महिला आजही पुरुषांच्या समोर येत नाहीत, संवाद साधणे तर दूर! अशा बहुसंख्य महिलांना महिला दिनाचे काय कोडकौतुक कसे असणार ? एक विचार गांभीर्याने करायची वेळ आहे तो म्हणजे अशा महिलांसाठी आपण काही करू शकतो का ? महिलांना सबल करण्यासाठी जागृती करणे आवश्यक आहे. सुशिक्षित बहुतांश महिलानाही निर्णय घेण्याची मोकळीक नसते, अधिकार नसतो. फार तर त्यांना सल्ला विचारला जातो. लग्नानंतर अनेक नाती निभावताना मनाला मुरड घालून वागावे लागते. थोडा जरी विरोध केला तरी कुटुंबातील इतरांची तळपायाची आग मस्तकात जाते. त्यामुळे महिलांनी परिश्रमपूर्वक उभारलेली घडी विस्कटायला वेळ लागत नाही. प्रत्येक नात्यातील स्त्रीला गृहीत धरले जाते. तिला काही भावना आहेत, हौस याकडे सोईस्कर दुर्लक्ष केले जाते. अनेक स्त्रियांना मन मारुन, साऱ्या भावना बाजूला ठेवून सर्वांसाठी राबावे लागते तेव्हा तिचा 'चांगली महिला' असा गौरव होतो. नुकतीच एक कथा वाचण्यात आली ती आजच्या परिस्थितीत परिणामकारक ठरु शकते. एका नवविवाहितांचा संसार सुरू होतो. पती कंपनीत नोकरीला असतो. त्याच्या साऱ्या वेळा सांभाळताना तिची दमछाक होते परंतु पतीला त्याचे काही नसतो उलट 'तू घरीच असते. असे कोणते कामाचे डोंगर तू उपसतेस ?' असे सातत्याने ऐकवत असतो. कालांतराने तिला मुलगा होतो. त्याचेही तिला सारे पाहावे लागते मात्र पतीचे तेच तुणतुणे वाजत असते. मुलगा मोठा होतो. तोही कंपनीत नोकरीला लागतो. वडिलांचे ऐकून तोही आईली तसेच सुनावत राहतो. कालांतराने त्याचे लग्न होते पण आईला आराम मिळत नाही. सूनही नोकरी करणारी असली तरी ती प्रगत विचाराची असते. सासूची होणारी धावपळ जाणून ती जमेल तशी सासूला मदत करते. तिचे मन, भावना जपण्याचा प्रयत्न करते. सासूची निपुण पाककला पाहून ती सासूला घरच्या घरी नवीन व्यवसाय करायला सुचवते पण सासरा आणि पती तिला कडाडून विरोध करतात परंतु तो विरोध न जुमानता सासू तो व्यवसाय सुरू करते. सूनही तिला भरपूर मदत करते. कालांतराने तो व्यवसाय भरभराटीला येतो. तेव्हा सासूला खूप आनंद होतो. माझी क्षमता शेवटी सुनेने ओळखली ही भावना तिला प्रोत्साहित करते. अशाप्रकारे एका महिलेची क्षमता दुसऱ्या महिलेने ओळखून सून असूनही सासूला प्रोत्साहन दिले ही बाब निश्चितच गौरवास्पद नि अनुकरणीय आहे. सासू, सून यांनी त्यांच्या नात्यामध्ये असलेली परंपरागत कटुता विसरुन एकमेकींना मदत केली, सहकार्य केले तर निश्चितपणे नात्यातील गोडवा वाढण्यास मदत होईल. असा गोडवा प्रत्येक कुटुंबात निर्माण झाला तर महिला दिनाचा गोडवा अजून वाढेल.फक्त प्रत्येकाने थोडे पुढे येणे आवश्यक आहे. **- सौ. संध्या पांडे, वाकड, पुणे.**

### जागर स्त्रीत्वाचा

**महिला शक्तीचा जागर क्षणोक्षण करी उजागर**
**स्त्रीत्वाची तुलना करण्या दगडालाही फुटतो पाझर**

**ब्रम्हांड साकारताना दिव्य तेजांची पाखर**
**मातृत्व सत्वाशी जोडी नाळ जशी दुधात पडते साखर**

**अंबे माय, माऊली, जननी विश्वदाईनी, जगजनार्दनी**
**शृंगारिकता जगकल्याणात अनंतातील रूप सौदामिनी**

**तिच्या चुलीवरच्या भाकरीत बळ शब्दांचे झाले अजरामर**
**भूत,भविष्य,वर्तमानात आहे चौफेर पूर्वसंचिताचा सागर**

**मेघ गर्जनेचा कडकडाट उदो उदो करिती भ्रमर**
**गर्भातील संवेदना जागृत इतिहासातील पान अमर**

**नारी क्षमतेचा,योग्यतेचा करावा नेहमीच आदर**
**स्त्री म्हणून जन्मास येणाऱ्यांना अहोभाग्याने मिळते उदर.**

**सौ. पयोष्णी तु. सरोदे, बँगलोर**

### जागर नारीचा

**सांभाळून घर,संसार, नोकरी, उंचाविले स्थान**
**स्वतःचे समाजात ....**
**मातृत्वाचे ममत्त्व सांभाळून**
**घेतले नारी शक्तीचा पूर्णत्व....**
**घडविला इतिहास राणीलक्ष्मीनं**
**बांधून पाठीला बाळ..**
**जिजाऊ ने घडविला शिवराय महान...**
**पत्करून अधिकार्याचे अधिकार स्वीकारले देशाचे**
**पंतप्रधान पद धन्यत्या इंदीरानं....**
**अंतरीक्षात जाऊनी भुमिका**
**चावलानं निर्मिले नवे आकाश...**
**उतार वयातही प्रतिभानं भुषविले राष्ट्रपती पद ....**
**भारत कोकीळा नावाने उंचावले जगी नाव धन्य**
**त्या आशानं.... किती करावे जागर तुझ्या गुणांचं**
**सांभाळित धुरा संसारातं होवून कधी माय , कधी**
**बाप.... ना सोडीले क्षेत्र असे कोणते**
**आता तु कार्य करण्यास.... तरीही मनी खंत एकच**
**अजूनही आहेस अबला अत्याचारात ...**

**शशिकला भडके, नागपूर**


# मोदी यांचे आवाहन

आधुनिक केसरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील कॉर्पोरेट विश्वाला गुंतवणूक वाढवण्याचे आवाहन केलं आहे. ते म्हणाले की, कॉर्पोरेट जगताने गुंतवणूक वाढवावी आणि अर्थसंकल्प 2023-24 मध्ये दिलेल्या संधींचा लाभ घ्यावा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (7 मार्च) 'आर्थिक क्षेत्र' या विषयावर अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला संबोधित केले. मोदी म्हणाले की, सरकारने भांडवली खर्चाची तरतूद 10 लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवली आहे, जी आतापर्यंतची सर्वोच्च आहे. मी देशाच्या खाजगी क्षेत्राला आवाहन करतो की सरकारप्रमाणेच त्यांनीही आपली गुंतवणूक वाढवावी जेणेकरुन देशाला त्याचा जास्तीत जास्त फायदा मिळू शकेल, असे मोदी म्हणाले. यावेळी त्यांनी कर आणि देशाच्या अर्थव्यवस्थेबाबत अनेक गोष्टींवर भाष्य केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, जीएसटीमुळे कर प्रक्रियेत बरीच सुधारणा झाली आहे. एकेकाळी सगळीकडे चर्चा व्हायची की भारतात कर किती जास्त आहे. आज परिस्थिती पूर्णत: वेगळी आहे. जीएसटीमुळे, आयकर कमी झाला, कॉर्पोरेट कर कमी झाला, यामुळे भारतातील कर खूप कमी झाला. परिणामी नागरिकांवरील बोजा कमी होत आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, 2013-14 मध्ये आपला एकूण कर महसूल सुमारे 11 लाख कोटी होता, 2023-24 च्या आर्थिक वर्षात एकूण कर महसूल अंदाजे 33 लाख कोटींपेक्षा जास्त असू शकतो. म्हणजेच भारत कराचा दर कमी करत आहे, तरीही त्याचं संकलन वाढत आहे. प्रकल्पाच्या नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये अभूतपूर्व गती आली आहे. विविध भौगोलिक आणि आर्थिक क्षेत्रांच्या प्रगतीसाठी काम करणाऱ्या खाजगी क्षेत्रालाही आपल्याला जास्तीत जास्त पाठिंबा द्यायला हवा, असेही मोदी म्हणाले. या वेबिनारमध्ये पंतप्रधान मोदींनी व्होकल फॉर लोकलची माहिती दिली. ते म्हणाले की, आत्मनिर्भरता व्होकल फॉर लोकल हा आमच्यासाठी आवडीचा मुद्दा नाही. भविष्यावर परिणाम करणारी ही समस्या आहे. व्होकल फॉर लोकल आणि आत्मनिर्भरतेचं व्हिजन ही राष्ट्रीय जबाबदारी आहे. ते पुढे म्हणाले की, 'भारत आर्थिक शिस्त, पारदर्शकतेसह वाटचाल करत आहे, त्यामुळे आपणही मोठा बदल पाहत आहोत. आर्थिक समावेशाशी संबंधित सरकारच्या धोरणांमुळे कोट्यवधी लोक औपचारिक आर्थिक व्यवस्थेचा भाग बनले आहेत. आज काळाची गरज आहे की भारताच्या बँकिंग व्यवस्थेतील ताकदीचे फायदे तळागाळापर्यंत पोहोचले पाहिजेत ही काळाची गरज आहे. ज्याप्रमाणे आम्ही एमएसएमईला पाठिंबा दिला, त्याचप्रमाणे भारताच्या बँकिंग प्रणालीला अधिकाधिक क्षेत्रांनी सहकार्य करावे. 8-10 वर्षांपूर्वी बुडण्याच्या मार्गावर असलेली बँकिंग व्यवस्था आता फायद्यात आहे. सध्याचे सरकार सतत धाडसी निर्णय घेत आहे, धोरणात्मक निर्णयांबाबत अगदी स्पष्ट आहे, आत्मविश्वास आणि खात्री आहे.

# पंजाब पुन्हा पेटतोय! सरकारने गुडघे टेकले ?

आधुनिक केसरी



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

**भारतीय लोकशाहीत राजकारणाला वेगळे वळण लागले आहे.राजकीय नेते सत्ता व भ्रष्टाचारातून पैसा मिळविण्यासाठी कोणत्याही स्थरापर्यंत जाऊ शकतात!कारण भारतात भ्रष्टाचारी व देशद्रोही राजकीय नेत्यांना फाशीची शिक्षा दिली जात नाही.त्यामुळे भ्रष्ट,देशद्रोही प्रवृत्तीत वाढ होत चालली आहे.काँग्रेसचे नेते पवन खेडा यांनी पंतप्रधानाबद्दल अपशब्द वापरले,याबद्दल या पक्षाला खंत तर वाटली नाही,उलट पक्षाच्या नेत्यांना विमानतळावर 'मोदी तेरी कब्र खोदेंगे' अश्या घोषणा दिल्या. देशातील राजकारणात परिवर्तन करण्याचे व भ्रष्टाचार मुक्त करण्याचे उद्देशाने आम आदमी पक्षाचा जन्म झाला.पण या पक्षाचे मंत्री,भ्रष्टाचाराच्या आरोपावरून जेलमध्ये जात आहेत.**

दिल्लीचे उपमुख्यमंत्री सिसोदिया यांना दारू घोटाळाप्रकरणी अटक झाली. केजरीवाल यांनी आमचे मंत्री दिल्लीत चांगले काम करत असल्याने ती कामे होऊ नयेत, म्हणून मोदी सरकारने अटक केली,अश्या शब्दात पाठराखण केली.या अटकेवरून आम आदमी पक्षाचे नेते सी.बी. आय.आणि पंतप्रधान मोदींच्या नावाने बोट मोडत आहेत.सिसोदिया हे तर दारू धोरणाचे समर्थक आहेत. त्यांनी राजघाटावर जाऊन म.गांधीजींच्या स्मारकाला वंदन केले.दारू धोरण राबविणे आणि भ्रष्टाचार करणे दोन्ही शब्द गांधीजींच्या आदर्श विचारात तरी बसतात काय ?मग तेथे कश्याकरिता गेले ?ही गांधीजींच्या विचाराची थट्टा आहे. केजरीवाल भ्रष्टाचाराचे समर्थन करतात,याचेच आश्चर्य वाटते! ते भ्रष्ट नेत्यांना शहीद भगतसिंहाचे शिष्य, भारतरत्न पुरस्कार दिला पाहिजे,अशी जेंव्हा भाषा वापरतात, यातून आम आदमी पक्षाचे चरित्र,चेहरा,समोर येवू लागलेला आहे. यात सिसोदियाला नव्हे, तेलंगणा व पंजाबच्या मुख्यमंत्र्याच्या खूर्चीला धोका निर्माण झाला आहे. यात दारू घोटाळ्यात तेलंगणा मुख्यमंत्र्यांच्या मुलीची चौकशी झाली. तसेच दिल्लीचे दारू धोरण पंजाबमध्ये लागू करण्यात आले.तेंव्हा तेथेही याबाबत सी.बी. आय. चौकशीची मागणी केली जात आहे. राजकीय नेत्यावर भ्रष्टाचाराचा आरोप झाला की त्यांनी राजीनामा द्यावा,असे नैतिकतेचे तत्वज्ञान देणारे केजरीवाल आता राजकारणात गेल्यानंतर सरड्याप्रमाणे रंग बदलत आहेत. त्यांनी त्यावेळी भ्रष्ट मंत्री नेत्यांची यादी जाहीर केली होती.'राजकारण हे चिखल आहे,त्या जाऊ नका'असा सल्ला ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिला होता.तो सल्ला त्यांनी मानला तर नाहीच उलट त्यांनी गुरुला म्हणजे अण्णालाच सोडून दिले.केजरीवाल यांनी अण्णा हजारेंच्या आंदोलनात फायदा उचलला आहे.दिल्लीतील आम आदमी सरकारला भ्रष्टाचाराची शासकीय यंत्रणेने चौकशी,तपास,अटक करु नयेच त्यांचे म्हणणे दिसतेय! आम आदमीचे मंत्रीभ्रष्ट अथवा निर्दोष आहेत ? याबाबतचा न्याय निवाडा करण्याचा त्यांना परवाना दिलेला आहे काय ? मंत्री व त्यांचा कारभार स्वच्छ आणि पारदर्शक असेल तर न्याय संस्थेत दाद मागावी!

भ्रष्टाचारावर पांघरण घालण्यासाठी या प्रकरणाला राजकीय वळण देण्यात येत आहे. आम आदमीपक्षाचे पूर्वाश्रमीचे मित्र कुमार विश्वास यांनी केजरीवाल यांचेवर खलिस्तान चळवळीच्या गटाशी जवळीक असल्याचा गंभीर आरोप केलेला आहे इतकेच नव्हे,ते पंजाब वेगळे राष्ट्र होवून पंतप्रधान होण्याचे स्वप्न पहात आहेत! अश्या गंभीर आरोपाचा विश्वास यांचा व्हिडीओ आहे.केजरीवाल २०१७ मध्ये हे खलिस्तान नेत्याच्या घरी थांबलेले होते, असाही आरोप आहे.याबाबत केंद्रिय गुप्तचर यंत्रणेने चौकशी का केली नाही. ता कुमार विश्वास यांचे आरोपात सत्यता वाटत आहे. केजरीवाल मनसूबे औरच आहेत!दिल्लीत कृषी कायद्याच्या विरोधात आंदोलन शेतकरी आंदोलन झाले होते.तेंव्हा खलिस्तान चळवळीची लोकांनी घुसखोरी केली होती,त्यांना कोण रसद पुरवित होता ? पंजाबमध्ये काँग्रेस व अकाली दलाचा १९६२ ते २०२२ पर्यंत प्रभाव होता!हे पक्ष राज्याच्या सत्तेत अनेक वर्षे होते. पंजाब जनतेने भाजपा पक्षाला कधीच स्विकारले नाही. माजी मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदरसिंग यांनी पंजाब राज्य हे पाकिस्तान सीमेलगत असून राज्यात राष्ट्र विरोधी शक्तींचा प्रभाव वाढत असल्याची भीती व्यक्त केली होती. पण काँग्रेसने त्याकडे दुर्लक्ष केले.पण त्यांना पक्षातील अंर्तगत वादातून मुख्यमंत्री- पदावरूनच काढून टाकले. २०२२ च्या पंजाब विधानसभा निवडणुकीत आम आदमीने काँग्रेसचा पराभव करून सत्ता मिळविली. त्यानंतर खलिस्तान चळवळीने डोके वर काढले आहे. आज पंजाब जळतोय राष्ट्रविरोधी शक्ती अधिक सक्रीय होत चालली आहे.हे राष्ट्रासाठी घातक आहे,याची आम आदमी,काँग्रेस व विरोधी पक्षाला चिंता नाही. केवळ २०२४ मध्ये केंद्राच्या सत्तेतून पंतप्रधान मोदी यांना घालविणे,हाच एकमेव कार्यक्रम आहे.देश खड्यात गेला तरी चालेल पण केंद्रात सत्ता मिळाली आली पाहिजे,या तयारीलाविरोधी पक्ष कामाला लागलेला आहे.

भारतीय स्वातंत्र्यात,हिंदु संस्कृतींचे रक्षण करण्यात शीख समाजाचे मोठे योगदान आहे.हा समाज राष्ट्रप्रमी लढवय्या!शूर!पराक्रमी आहे,यात वादच नाही.शहीद -ए भगतसिंह यांचे बलिदानातून पंजाब पवित्र राज्य निर्माण झाले याचा अभिमान वाटतो.उपलब्ध माहितीनुसार स्वातंत्र्याच्या लढ्यात १२१ जणांना फाशी दिली गेली,त्यात ९३ शीख होते.तर २६४६ स्वातंत्र सैनिकांना जन्मठेपीची शिक्षा झाली,त्यात २१४१ शीख होते.पण समाजातील काही राष्ट्रविरोधी प्रवृत्तींनी १९७०मध्ये शीख बांधवाच्या मनात हिंदु समाजाविषयी



व्देष निर्माण करण्याचा प्रयत्न केला.१९७१ गजनसिंग चौहानने अमेरिकेतील वृत्तपत्रात खलिस्तान राष्ट्राची जाहिरात देऊन देणगीचे आवाहन केले होते.१९८० मध्ये खलिस्तान राष्ट्रपरिषदेची स्थापना झाली.खालसा या अर्थ पवित्र असा होतो.१९७० ते १९९५ या मध्ये पंजाबमध्ये खलिस्तान चळवळीने उग्र स्वरूप धारण केले होते. याला हिदुं विरोधात पंजाबी शीख असा रंग देण्यात आला होता. पंजाब- मधील दहशदवादी गटाला आळा घालण्यासाठी श्रीमती इंदिरा गांधी यांनी दमदमी टाकसाळचे प्रमुख जर्नेलसिंघ भिंद्रानवाले याला समर्थन दिले,त्यामुळे भिंद्रानवाले यांची राजकीय महत्वाकांक्षा वाढत गेली,व त्याने काँग्रेसचा डोक्यावर असलेला हात झटकला व तो खलिस्तान चळवळीची मुख्य नेता झाला.काँग्रेसच्या आशीर्वादातून भिंद्रानवाले भस्मासूर तयार झाला.त्यानेच स्वतंत्र खलिस्तान राष्ट्राची मागणी करत हिंसक आंदोलन सुरु केले.भिंद्रानवाले व त्याच्या समर्थकांनी धार्मिक स्थळाचा आश्रय घेतला होता.त्यांनी मोठ्या प्रमाणात शस्त्र होती. तेथून ते पाकच्या संपर्कात करत होते,अशी गुप्तचर विभागाची माहिती होती.हे कारण देत श्रीमती इंदिरा गांधी सरकारने 'ऑपरेशन ब्लू स्टार' मोहिमे अतर्गत सुवर्ण मंदिरावर ६ जून १९८४ मध्ये लष्कर कारवाई केली.यात भिंद्रानवाले व त्याचे साथीदार ठार झाले.सैन्य कारवाईमुळे नाराज झालेल्यांनी हातात शस्त्रे घेतली. त्यातून पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची ३१ ऑक्टोबर १९८४ मध्ये हत्या केली. तसेच लष्कर प्रमुख अरूण वैद्य,मुख्यमंत्री बेअंतसिंग यांची हत्या केली गेली.श्रीमती गांधी यांचे हत्येनंतर दिल्लीत दंगल झाली.तेंव्हा काँग्रेस पक्षाच्या समर्थकांनी शीख समुदायाला लक्ष्य केले.यात हजारो निष्पाप शीख बांधवाचा बळी घेतला गेला.याचे राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पातळीवर पडसाद उमटले.यावरून शीख बांधवात असंतोष पसरला होता.तर अमेरिकेत स्थायिक कायद्या अभ्यासक गुरूपतसिंग पन्नू याने २००७ मध्ये S FJ (शीख फॉर जस्टीज) नावाची संघटनेची स्थापना करून व स्वतंत्र खलिस्तानची मागणीला बळ देण्यास सुरुवात केली.इतकेच नव्हे, संघटनेचे पाकमध्ये लाहोर कार्यालय उघडले गेले.

पंजाबमध्ये दहशदवादी कारवाया चालू होत्या.१९८६- १९८७ मध्ये तत्कालिन केंद्रिय गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी पंजाबमधील शासन दहशदवाद्यांचा बिमोड करण्यासाठी पाऊले उचलली,त्यातून पंजाबमध्ये दहशदवादी कारवाया थांबल्या होत्या.या पंजाबमध्ये शांतता निर्माण करण्याचे श्रेय चव्हाण यांनाच आहे.पंजाब- मध्ये खलिस्तान चळवळीत १९८० ते १९९५ पर्यंत एकूण २१ हजार ५३२ जणांना प्राण गमवावे लागले. यात ८ हजार ९० फुटरवादी, ११ हजार ७९६ सामान्य नागरीक, तर १ हजार ७ ४६ सुरक्षा अधिकारी व कर्मचार्यांचा समावेश आहे. अमेरिकेतील एस. एफ. जे. प्रमुख गुरूपतसिंग हा आजही भारतातील चळवळीला प्रोत्साहन देण्याचे आजही काम करत आहे.तोच स्वतः २०२२ च्या पंजाब विधानसभा निवडणुकीत आम आमदीला आर्थिक मदत केल्याचे सांगतो आहे.त्यानंतर पंजाब अभिनेता व कार्यकर्ता दीप सिध्दू याने 'वारिस पंजाब दे' संघटनेची स्थापना केली होती.त्याने२६ जानेवारी २०२१ लाल किल्ल्यावर खालसा पंथाचा ध्वज फडविला होता.तो २०२२ मध्ये रस्त्याच्या अपघातात मृत पावला.त्यानंतर २०२२ मध्ये अमृतपालसिंघ या संघटनेचा प्रमुख बनला. संघटनेची सूत्रे विद्रोही जनर्लेसिंग भिंद्रानवाले यांची रोडे गावी देण्यात आलेली आहेत.तो स्वतः खलिस्तान नेता भिंद्रानवाले याचा शिष्य मानतो.

**क्रमश**

# करुया सन्मान नारीशक्तीचा

आधुनिक केसरी

**जगभरात ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. स्त्रीशक्तीचा आदर आणि सन्मान करण्याचा हा दिवस.स्त्री समानतेचा आपण कितीही गप्पा मारत असलो तरी आजही स्त्रियांना आपले हक्क आणि मागण्यांसाठी संघर्ष करावा लागतो.पूर्वीपासून आपल्या समाजात पुरुषप्रधान संस्कृती आहे.या संस्कृतीमध्ये स्त्रियांना पूर्वापार दुय्यम स्थान दिल्याचे आढळून येते.स्त्रियांना मन ,भावना आणि स्वतंत्र विचार असतात. याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते.स्त्रिया बुद्धिमान,कर्तृत्ववान ,धाडसी आणि पराक्रमी असतात. हे आपण विसरुन जातो. स्त्री कधीच अबला नव्हती. तिला पुरुषी मानसिकतेने अबला ठरविले. धर्म ,रुढी ,परंपरा कर्मकांड यात अडकलेल्या समाजाने स्त्रियांना मोकळा श्वास घेऊ दिला नाही. पुरुषी वर्चस्व गाजविण्याच्या लालसेतून स्त्रियांच्या हक्क आणि अधिकारांची पायमल्ली केली. त्यातून तिचे कर्तृत्व नाकारण्याची परंपरा पुढे येत राहिली.**

कोंबडं कितीही झाकलं म्हणून ते बांग द्यायचे थांबत नसतं. त्याप्रमाणे स्त्रियांना कितीही संधी नाकारली म्हणून त्यांचे कार्य आणि कर्तृत्व झाकले जात नाही. आज समाज शिकला, सुसंस्कृत , सुशिक्षित झाला असला तरी स्त्रियांवरील अन्याय अत्याचार थांबलेले नाहीत. स्त्रिया म्हणजे चूल आणि मूल हा समाजात रुजलेला विचार बदलत असल्याचे दिसून येत आहे. रुढी परंपरामुळे ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडता येत नव्हते. त्या काळात सावित्रीबाईंनी मुलींना शिकविण्याचे धाडस केले.सावित्रीबाईंमुळे महिलांना शिक्षणाची कवाडे खुली झाली. धाडसी आणि पराक्रमी असणाऱ्या जिजाऊसाहेबांनी कठीण प्रसंगी शिवरायांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून स्वराज्याचा रथ हाकला. मेरी झांशी नही दूंगी अशी गर्जना करणाऱ्या राणी लक्ष्मीबाई यांनी इंग्रजांशी निकराने लढा दिला. अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या राज्यात लोकोपयोगी कामे करुन लोकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. महाराणी ताराराणी, महाराणी येसूबाई ,माता रमाई अशा कर्तृत्ववान महिलांनी असामान्य कार्य करुन स्त्री शक्तीचा परिचय करुन दिला. एवढेच काय अलीकडील काळातील इंदिरा गांधी यांनी देशाचे नेतृत्व खंबीरपणे करुन आपला वेगळा ठसा उमटविला. मदर तेरेसा यांनी मानवतेची सेवा याची शिकवण दिली. कल्पना चावला सारख्या जिद्द महिलेने अंतराळात सफार करण्याचे स्वप्न पाहिले आणि सत्यात उतरविले. अशी कितीतरी पराक्रमी स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले. मग त्यांना अबला कसे म्हणता येईल ? स्त्री जेवढी हळवी, कोमल असते. तेवढीच कणखर, स्वाभिमानी आणि लढाऊ बाण्याची असते.संकटकाळी वीजेसारखी उसळून त्यावर मात करण्याची शक्ती तिच्याच असते.. पुरुषांप्रमाणेच स्त्रीला सुद्धा तितकेच किंबहुना जास्त महत्त्व आहे. आजही सुशिक्षित म्हणवल्या जाणाऱ्या समाजाकडून स्त्रियांचा मानसिक शारीरिक छळ केला जातो. लग्नात हुंडा दिला नाही, मुलगीच जन्माला घातली अशा अनेक कारणावरुन स्त्रियांचा छळ केला जातो. या जाचाला कंटाळून अनेक स्त्रिया आत्महत्येचा मार्ग निवडतात. अशा वेळी वाटते स्त्रियांना जगण्याचा अधिकार नाही का ? गावच्या सरपंच पदापासून ते देशाच्या राष्ट्रपती पदापर्यंत मजल मारुन महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. रेल्वे ते आकाशात विमान चालविण्यापर्यंत महिलांनी झेप घेतली आहे. पोलिस ,एस.टी वाहक,आता तर लष्करातसुद्धा देशसेवा करण्याची संधी महिलांना प्राप्त झाली आहे. मेधा पाटकर यांच्यासारख्या अनेक महिला समाजासेवेसाठी आपले योगदान देत आहेत. पी.टी.उषा, साईना नेहवाल, मिताली राज, मेरी कोम यांनी खेळात कौशल्य सिद्ध करुन आपल्या शक्तीची जाणीव करुन दिली आहे. आजही अनेक तरुण महिला समाजकारण राजकारण, शिक्षण, शेती सहकार यात उत्तम काम करीत आहेत. स्त्रियांना खुर्चीत बसविले म्हणजे सन्मान झाला असे नव्हे तर प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत त्यांना सहभागी करुन घेतले तरच ख-या अर्थाने समान संधी दिल्यासारखे होईल. काही ठिकाणी आपण पाहतो स्त्रिया फक्त सहीच्या मालक असतात.तर निर्णय घ्यायला पुरुष असतात. याला स्वतंत्र बाण्याच्या आणि अभ्यासू स्त्रिया अपवाद असू शकतात. कणखर स्त्रिया आपल्या कार्यशैलीने स्वतंत्र ओळख निर्माण करतात. कुटुंबाचा पाया म्हणजे स्त्री. कुटुंबाचा आधार म्हणजे स्त्री घराचे घरपण म्हणजे स्त्री . कुटुंबाचा, समाजाचा आणि राष्ट्राचा उद्धार करण्याची क्षमता आणि ताकद स्त्रीमध्ये असते. फक्त महिला दिनापुरताच स्त्री शक्तीचा गवगवा नको. तर स्त्रियांना सुद्धा आनंदी आणि भयमुक्त वातावरणात जगण्याचा हक्क आहे याची जाणीव समाजाला पदोपदी व्हायला हवी.

**लक्ष्मण जगताप, बारामती.**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, ८ मार्च २०२३

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१९०

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●WEDNESDAY 08 MARCH 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-190 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-5


# निसर्ग कोपला : पावसाचा धिंगाणा; स्वप्नांची होळी

## हातातोंडाशी आलेला घास हिरावला; रबीला मोठा फटका; आर्थिक मदतीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा.बाळासाहेब बोराडे**

**जालना : जिल्ह्यात होळीच्या दिवशी सायंकाळच्या सुमारास अचानक वातावरणात बदल होऊन वाऱ्यासह ढगांचा गडगडाट आणि विजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस बरसला आणि काही क्षणात होत्याचं नव्हतं झालं. ऐन सुगीच्या दिवसात रब्बीचा हंगाम चालू असताना हाती आलेला घास अवकाळी पावसाने हिरावून घेतला. त्यामुळे शेतकऱ्यांचे ज्वारी, गहू,हरभरा, कांदा, द्राक्षे, आंबा, डाळींब, मोसंबी, फुलशेती आणि भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.पावसाने निसर्गाच्या लहरीपणामुळे धिंगाणा घालत वादळी वाऱ्यासह शिमगा खेळल्यामुळे क्षणार्धात शेतकऱ्यांच्या स्वप्नाची होळी झाली आहे.रब्बीस मोठा फटका बसल्याने तात्काळ आर्थिक मदत द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.**





वातावरण बदलाची माहिती हवामान विभागाकडून मिळाली परंतु सुगीचे दिवस असल्याने पिकांची कापणी, सोंगणीची कामे चालू होती. मजुरा अभावी उघड्यावर पडलेला माल शेतकऱ्यांस सुरक्षित ठिकाणी हलवता आला नाही.त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. जालना जिल्ह्यात सर्वच तालुक्यात द्राक्ष, डाळिंब, मोसंबी,ज्वारी, गहू, तूर, हरभरा,मका भाजीपाला व फुलशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ढगाळ वातावरण आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे आंब्यांचा मोहर गळून पडला आहे. ऐन उन्हाळ्यात सुगीच्या दिवसात अचानकपणे वातावरणात बदल झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. योग्य मोबदल्या आभावी कापूस,सोयाबीन घरात पडून असल्याने शेतकरी आधीच हवालदील असून.

परत रब्बी हंगामात अवकाळी पावसाने शेतकऱ्यास झोडपून काढले. त्यामुळे पिकाचे नुकसान होऊन होतातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. राजकीय नेत्यांच्या भूलथापा आणि निसर्गाच्या लहरीपणाचा सामना शेतकऱ्यांस करावा लागत आहे. शेतात उभी असलेली व काढणीस आलेली पिकं वादळी वाऱ्यामुळे भुईसपाट झाली आहे. त्यामुळे रब्बी हंगामाला मोठा फटका बसला आहे. एका बाजूस शेतकऱ्यांनी कष्टाने पिकवलेल्या मालाला भाव मिळत नाही तर दुसऱ्या बाजूस निसर्गाचा उद्रेकही थांबायला तयार नाही. त्यामळे चौही बाजूने कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. अवकाळी पावसामुळे रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासनाने तात्काळ आर्थिक मदत द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

### पिकांचे तातडीने पंचनामे करा; मुख्यमंत्र्यांचे निर्देश

राज्यामध्ये अनेक जिल्ह्यांत अवकाळी पावसामुळे पिकांना फटका बसला आहे . मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सकाळी मुख्य सचिव तसेच जिल्हाधिकाऱ्यांशी बोलून राज्यातील परिस्थितीची माहिती घेतली . तसेच तातडीनं नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत . दरम्यान, राज्यभरात काल ठिकठिकाणी अवकाळी पावसानं हजेरी लावली आहे . शेतकऱ्यांना तातडीनं दिलासा मिळाला पाहिजे . संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या सरकार पाठीशी आहे . यादृष्टीनं महसूल यंत्रणेनं लगेच कामाला लागावं आणि पंचनामे करावेत, असेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत . ठाणे, पालघरसह राज्यातल्या महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस झाला . वाशीम, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पैठण, गंगापूर परिसरातील अनेक तालुक्यात वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसानं ऐन काढणीला आलेल्या पिकांचं नुकसान झालं आहे . मुंबई, ठाण्यासह उत्तर मध्य महाराष्ट्रावर ढगाळ वातावरण असल्यानं बऱ्याच ठिकाणी आणखी अवकाळी पावसाची शक्यताही वर्तवण्यात आली आहे . त्यादृष्टीनं मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला आवश्यक त्या सूचनाही दिल्या आहेत .








# माळवाडी 'गाव विकणे आहे'

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे रात्रंदिवस कष्ट करूनही शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही. सध्या कांद्याला मातीमोल भाव मिळत आहे. आंदोलने करूनही सरकार लक्ष देत नाही त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. त्यामुळे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी व कर्जफेडीसाठी देवळा तालुक्यातील माळवाडी ग्रामस्थांनी चक्क गावच विक्रीला काढले आहे. मौजे माळवाडी येथील ग्रामस्थांनी सरकारच्या धोरणाला निषेधार्थ 'गाव विकणे आहे' असा फलक ग्रामपंचायत कार्यालयासमोर लावला आहे. ग्रामस्थांनी राज्य सरकारला गांव विकत घेण्याचे आवाहन केले आहे. ग्रामस्थांनी एकत्र येत गाव विक्रीसंदर्भात ठराव केला असून शासनाकडे गांव विक्रीबाबतचा ठराव पाठविण्यात येणार आहे. जिल्ह्यात या फलकाची जोरदार चर्चा असून फलकाने खळबळ उडवून दिली आहे. गावची लोकसंख्या २ हजार असून साडेपाचशे हेक्टर शेती आहे. ग्रामस्थांचा उदरनिर्वाह शेतीवर आहे. गावकऱ्यांनी वर्षभर राब राब राबायचे. उत्पन्न काढायचे आणि ते मातीमोल भावात विकायचे. त्यातून उत्पादन खर्चही निघत नाही. आत्महत्या करण्यापेक्षा गांव विकून, किंवा बाहेरगावी जाऊन व्यवसाय करून सुखाने जीवन जगता येईल ही ग्रामस्थांनी भूमिका मांडली आहे. आमच्या गावावर जी वेळ आली आहे ती इतर शेतकऱ्यांवर येऊ नये म्हणून सरकारने शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव द्यावा अशी मागणीही ग्रामस्थांनी केली आहे.

# कालिचरण महाराज यांची शनिवारी धर्मजागरणसभा

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** तिथीप्रमाणे होणाऱ्या शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त शिवसमर्थ प्रतिष्ठानतर्फे कालीपुत्रकालिचरणमहाराज यांची जाहीर हिंदू धर्मजागरण सभा आयोजित करण्यात आली आहे. येत्या शनिवारी (दि. ११ मार्च) सायंकाळी ७.०० वाजता सनसिटी रस्ता, भाजी मंडई शेजारी, सिंहगड रस्ता, पुणे येथे हिंदू समाजाचा आवाज बुलंद करण्यासाठी ही हिंदु धर्मजागरण सभा होणार आहे, अशी माहितीप्रतिष्ठानचे संस्थापक दीपक नागपुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी शिवसमर्थ प्रतिष्ठानचे संघटक, शिवशंभू चरित्र अभ्यासकनीलेशभिसे, सदस्य मंगेश बुजवे, सुनील भगरे, विक्रांत ढवळे उपस्थित होते. नीलेश भिसे म्हणाले, "या सभेचे आकर्षण म्हणजे श्रद्धेय कालीपुत्र कालीचरण महाराज त्यांच्या खड्या आवाजात शिवतांडव स्तोत्र म्हणणार आहेत. या सभेसाठी पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटीलप्रमुख पाहुणे असणार आहेत. प्रतिष्ठानच्याअध्यक्षामंजुषानागपुरे यावेळी उपस्थित असतील. प्रतिष्ठानतर्फे आयोजित शिवजयंती महोत्सवाचे हे अठरावे वर्ष आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राचा आणि विचारांचा जागर अधिक जोमाने व्हावा आणि हिंदू समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी हिंदू बांधवानी संघटितपणे उभे राहावे, हा या सभेमागील उद्देश आहे.

# रंगांची उधळण: धूलिवंदन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** वातावरणातील बदल,पावसाची रिपरिप, हवेत गारवा आणि तरुणाईच्या सळसळत्या उत्साहाला साद घालत भोकरदन तालुक्यातील राजुर येथे होळी व रंगपंचमी मोठ्या उत्साह साजरी करण्यात आली. मागील दोन वर्षांपूर्वी कोरोनामुळे होळी आणि धुलीवंदनवर सरकारने अनेक निर्बंध लादले होते त्यामुळे नागरिकांना रंगपंचमी साजरी करता आली नव्हती.यावर्षी मात्र राजुर येथे होळी आणि रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सकाळी पारंपरिक पद्धतीने ग्रामस्थांनी ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक काढली होती. यामध्ये सामील होऊन समाज बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. राजुर करांनी रंगाची उधळण करत मोठ्या उत्साहात धुळवड साजरी केली. या रंगपंचमीला पाण्याचा अपव्यय टाळू नागरिकांनी कोरड्या व नैसर्गिकरित्या बनवलेल्या रंगाचा वापर केला. सकाळपासूनच गावातील तरुण घडाघटने बाहेर पडून आपल्या मित्रांना रंग लावत धूलिवंदनाच्या शुभेच्छा देत होते. धूलिवंदनांचा सण महिला आणि बच्चे कंपनीने सहभाग घेऊन मोठ्या उत्साहात साजरा केला.




# तीचा सन्मान उंचावण्याची गरज

आधुनिक केसरी

**ज्या काळात मुली परीक्षांना कशा प्रकारे सामोरे जातात हे पाहण्यासाठी पुण्याच्या विश्रामबाग वाडयाच्या भोवती दोन हजारांपेक्षा अधिक लोक जमा झाले होते. त्यावेळी मुलींच्या गुणवत्तेचे प्रतिबिंब हजारोंच्या समोर घडले होते. मुलीच्या गुणवत्तेवर झालेल्या शिक्कामोर्तबामुळे आणि या देशातील परिवर्तनावाद्याच्या लढाईमुळे आज भारतात मुलींच्या शिक्षणाचा आलेख उंचावला आहे. आज लाखो मुली शिक्षणातील विविध क्षेत्रात परीक्षा देत स्वतःला सिध्द करता आहेत.त्यांचे यश हे या देशातील धुरिणांच्या पेरणीचे आहे. आज हे चित्र आनंददायी असले तरी आणि स्त्री शिक्षणाचा आलेख उंचावलेला असला तरी शिक्षणाचा अपेक्षित परिणाम समाजमनावर होताना दिसत नाही.**

स्त्रियांच्या गुणवत्तेला पेलण्याची मानसिकता पुरूषी समाजमनात अद्याप साध्य झालेली नाही. आज आपल्या समाजात स्त्री शिक्षणाचा विचार जेव्हा केला जातो त्यामागील मानसिकतेचा विचारही महत्वाचा आहे. आज त्यांचे शिक्षण होत असताना देखील स्त्रियांशी होणारे भेदभाव अधिक

चिंताजनक आहे. शिक्षणाने स्त्री सक्षम होत असताना समाजमनाने तीचे कर्तृत्व स्वीकारण्याची हिम्मत दाखविण्याची गरज आहे. स्त्रिने आज अनेक क्षेत्र पादाक्रांत केली आहे, तीने गरूडझेप घेतली आहे. तिने स्वतःला सिध्द केले आहे अशा परीस्थितीत तीला सोबत घेऊन प्रवास सुरू ठेवला समाजाचा विकासा झपाटयाने झालेला अनुभवास येईल. विवाह करताना देखील मुलापेक्षी मुलगी कमी शिकलेली पाहिजे. मुलापेक्षा मुलींचे वेतन अधिक असेल तर स्वीकारण्याची मानसिकता समाजमनात नाही. स्त्रियांना नेहमीच गृहितच धरले जाते. प्रशासनात देखील स्त्रीयांचे कर्तृत्व आणि अधिकार स्वीकारणे पुरूषी मानसिकतेला जड जाताना दिसते. सर्व दूर तिचे सामर्थ्य स्वीकारताना पुरूषी मानसिकता अडचणीचे ठरते. देशातील गुन्हेगारीचा आलेख आजही उंचावला आहे आणि त्यात सर्वाधिक अन्याय महिलांवर होतो आहे.महिला अत्याचाराचा आलेख उंचावताना पाहिला की शिक्षणाने जी सक्षमता येण्याची गरज होती ती अद्यापही येऊ शकली नाही हे समोर आले आहे. समाजात आजही हुंडाबळीची संख्या मोठी आहे. हुंडाबळी जी जाते ती स्त्रीच असते. आत्महत्या, बलात्कार यासारख्या घटनेत तीचात बळी जात असतो. तिचाच वेगवेगळ्या प्रकारे छळ केला जात असतो. समाजमन तिला स्वीकारताना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देताना अद्यापही मागे सरते आहे. ती माणूस नाही ही इतिहासातील मानसिकता 21 व्या शतकात देखील आहे का ? आपण बदललो आहे पण ज्या वेगाने मानसिकतेत बदल घडण्याची गरज आहे. तिला माणूस म्हणून स्वीकारण्याची गरज आहे . आज जो काही थोडया फार प्रमाणात बदल घडताना दिसतो आहे ते फार वेगाने घडले आहे असे म्हणता येणार नाही. बाहेर अत्याचाराचे प्रमाण कमी दिसत असले तरी कौंटुबिक हिंसाचार प्रकारात स्त्रींयांचा छळ मोठया प्रमाणात होत असल्याचे चित्र आहे. हा आलेख उंचावतो आहे म्हणजे नेमके का घडते आहे ? हा मागे देखील पुरूषी मानसिकता आहे याचाही विचार करण्याची गरज आहे. आज साक्षरता उंचावली आहे. मात्र आपल्या देशात स्त्री शिक्षणाचा मार्ग इतक्या सहजपणे रूंदावलेला नाही. कधी एकेकाळी आपल्या देशातील मद्रास इलाखा हा सर्वाधिक साक्षर इलाखा मानला जात होता. मात्र ती साक्षरता केवळ एक टक्का होती हे लक्षात घ्यायला हवे. ही एक टक्का म्हणजे त्याकाळी सर्वाधिक साक्षरता .अशा परीस्थितीतून आज आपण गाठलेला साक्षरतेचा आलेख निश्चित कौतूकास्पद आहे.भारतीय इतिहासातील 1883 ला पहिली भारतीय स्त्री पदवी हाती घेऊन विद्यापीठातून बाहेर पडली.एका सर्वेक्षणानुसार 1886 ला संपूर्ण भारतात अवघ्या 45 स्त्रीया कला महाविद्यालायत शिकत होत्या.आपणास स्वातंत्र्य मिळाले त्यानंतरच्या जनगणनेच्या आलेखावर नजर टाकली तर 1951 मध्ये स्त्री साक्षरतेचे प्रमाण अवघे 7.87 टक्के इतके होते. महाराष्ट्राचा विचार करता महिलांच्या साक्षरतेचा 2011 चा आलेख 75.87 टक्के इतका आहे. ज्या महात्मा फुले आणि सावित्रीने प्रचंड संघर्ष करत महाराष्ट्राच्या भूमीत स्त्री शिक्षणाचा पाया घातला त्या भूमीत अद्याप स्त्री साक्षरतेचे प्रमाण 100 ट्कके पर्यंत जाऊ शकले नाही याचाही विचार करण्याची गरज आहे. राज्यात प्राथमिक स्तरावर दाखल होणा-या मुलींचे प्रमाण समाधानकारक आहे मात्र त्याचवेळी गळतीचे प्रमाणही माध्यमिक स्तरावर अधिक आहे.प्राथमिक स्तरावर 0.5 टक्के, उच्च प्राथमिक स्तरावर .52 टक्के आणि माध्यमिक स्तरावर 13.99 टक्के मुलींची गळती होते आहे. स्त्रीयांच्या शिक्षणाचा आलेख उंचावलेला असला तरी समाज मानसिकता उंचावण्यात यश आले नाही. स्त्री भृणहत्येचा प्रकार मोठया प्रमाणावर घडता



आहेत. मुलींना जन्म नाकारला जात आहे.पुरूषांच्या मानसिकतेबरोबरच स्त्रीयां देखील आपल्या पोटी मुलगी नको असे म्हणून भृण हत्या घडवल्या जात आहे. आजही शिकलेली पतीपत्नीला आपल्या वंशाला दिवा हवा म्हणून जे प्रयत्न करतात ते पाहिले , की आपण अजूनही कितीतरी मागास आहोत हे समोर येते. त्याचे परिणाम आज आपण भोगत आहोत. समाजात मुलांना विवाहासाठी मुली मिळत नाही. मुले लग्नासाठी धावपळ करत आहेत. अलिकडे तर सोलापूरात मुलांना लग्नासाठी मुली मिळाव्यात म्हणून मोर्चाही काढला गेला आहे. स्त्री भृण हत्येचा परिणाम आता स्पष्टपणे दिसू लागला आहे. असेच घडत राहिले तर उद्याचा दिवस प्रकाश नव्हे तर अंधाराची छाया घेऊन येईल. आपल्याला स्त्री जन्म का नको आहे असा प्रश्न विचारला गेला तर त्याची उत्तरे शास्त्रीय नाहीत. आपण तीला जन्म नाकारणे हे समाजाच्या विकासाला बाधा आणणारी घटना आहे हे लक्षात घ्यायला हवे. शिक्षण झाले असले तरी त्या शिक्षणातून मानसिकतेचे परिवर्तन झालेले आपल्याला अनुभवास येताना दिसत नाही.अलिकडे या संदर्भातील अत्यंत कायदे कडक करूनही यात फार मोठी घट होताना दिसत नाही. स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे असे मानले जाणारी मानसिकता दिवंसेदिवस उंचावतच आहे. येथील द्रष्टया महापुरूषांच्या अधक प्रयत्नानंतर अनेक स्त्री व्देष्ट्यांची धुंदी उतरवली गेली होती. अर्थात हे इतक्या सहजतेने घडले नव्हते यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न झाले होते. कायद्याने दिले असले तरी येथील पंरपरा आणि धर्ममार्तंडानाही आजही स्त्री साक्षरता आणि तीच्या पराक्रमाची गाथा नको आहे.त्यामुळे तीच्यावरील अत्याचाराच्या प्रमाणात दिवसेंदिवस अधिक वाढ होते आहे. तीच्यावरील होणा-या अत्याचारास तीच कशी जबबादार आहे आहे हे सांगण्यात अनेकाना पुरूषार्थ वाटतो आहे.स्त्रीला इतिहासात ज्या मार्गानी बंधिस्त करण्याचा प्रयत्न केला आहे त्यापेक्षा वेगळे मार्ग आज अवलंबले जात असले तरी तीला ज्या ज्या मार्गाने बंधिस्त करता येईल ते सारेच अवलंबले जाणे पसंत केले जात आहे. आपण अजूनही भारतीय स्त्री राष्ट्रपती झाली असे मानत ती सक्षम झाल्याचा पुरावे देत असलो तरी अपवादाला नियम समजून पुढे जाणे घातक ठरणार आहे. आज घटनेच्या अधिकारामुळे गावोगावी महिला राजसत्तेवर आल्या आहोत पण निर्णय प्रक्रियेत तीच्यापेक्षा तिच्या पतीचाच वरचष्मा अधिक आहे. त्याचा हस्तक्षेप होतो आहे.तीला स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे अधिकार कायद्याने नव्हे तर पुरूषी मानसिकतेने देण्याची गरज आहे. आज आपण महिला दिन साजरा करत आहोत. तीचा सन्मान उंचावण्याची गरज आहे. महिलांनी जगातील सर्वच क्षेत्र पादाक्रांत केली आहे. स्त्री प्रशासन, संशोधन ,राजकारण,सांस्कृतिक, वैदयकिय, पत्रकारिता,कायदा यासाऱख्या अनेक क्षेत्रात स्थान मिळवले आहे. तीने स्वकर्तृत्वाच्या जोरावर सर्व क्षेत्रात भरारी घेतली आहे. मात्र तीच्या कर्तृत्वाचा स्वीकार करण्याइतकी सक्षमता पुरूषांच्या मानसिकतेत निर्माण करण्यात अपयश आले आहे. स्त्री पुरूष समानतेचा विचार केवळ करून चालणार नाही तर त्याकरीता समाजमनात त्या विचाराची बीजे खोलवर रूजायला हवीत. **संदीप वाकचौरे**



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०


# सक्षम महिला



आधुनिक केसरी

**महिलादिनानिमीत्यानं विचार मांडतांना एक विचार हाही मनात येतो. खरं तर तो संभ्रमाचे विचार आहे. कारण आज महिलांकडे पाहिलं तर महिला सक्षम आहे. त्याची उदाहरणं द्यायची झाल्यास नक्कीच देता येतील. कारण आज कैसर विल्यमसारखी महिला अंतराळात पोहोचलेली आहे.**

प्रतिभा पाटील सारखी महिला देशाच्या राष्ट्रपती बनल्या. किरण बेदी सारखी महिला राजकारणात सक्रिय झाली. तसंच इंदिरा गांधींसारखी महिला भारताची पंतप्रधान झाली. सोनिया गांधीसारखी महिला कॉँग्रेसची अध्यक्षा. अशी कितीतरी उदाहरणं देता येतील महिलांच्या सक्षमीकरणांची. यावरुन वाटतं की खरंच महिला सक्षम आहे. आजचा काळही असाच महिलांच्या सक्षमीकरणाला अनुकूल आहे. आज महिलांनी आपला स्वतःचा





विकासच केला नाही तर ती आयतोब्या असलेल्या व स्वतःला पुरुष समजणाऱ्या माणसाला पोषतो. आजही ठोंब्यासारखा बलदंड असलेला पुरुष हातपाय गळल्यागत महिलांसमोर गुलामागत वागतो व आजही घरातील स्नुषा चांगल्या निघाव्या, म्हणून विधात्याकडे साकडे घालणाऱ्या भरपूर सासवा जगात आपल्याला पाहायला मिळत आहेत. आजही महिला पुरुषांना आपल्या पत्नीच्या हातचे कळसुत्री बाहुले म्हणून घरात वावरावं लागतं. संसार करावा लागतो. त्यामुळं महिला सक्षमच वाटते. काल ठीक आहे की महिला सक्षम नव्हती. तिला साधा शिक्षणाचा अधिकार नव्हता. सतत तिच्यावर अत्याचार होत होता. बलात्कार तर वारंवार व्हायचा. घरात, दारात आणि बाहेरही. पुर्वीच्या काळातील महिलांवरील अत्याचाराबाबत सांगायचं झाल्यास पुर्वी बालविवाह व्हायचा. वधू कमी वयाची व वर जास्त वयाचा. यात वर वयानं कितीतरी मोठा असल्यानं मरुन जायचा. मग त्या घरात त्या वधूची साडेसाती सुरु व्हायची. साडेसाती म्हणजे एकाच घरातील सारी मंडळी या तरुण असलेल्या विधवेवर अत्याचार करीत सुचायची. तो बलात्कारच असायचा. परंतू त्यावर आवाजही उठवता येत नव्हता महिलांना. कारण ती सक्षम नव्हती. तसेच कायदेही तसे सक्षम नव्हते. विधवा विवाह बंदी होती.

आज काळ बदलला आहे. महिलांना शिकता येतं. उच्च शिक्षण घेता येतं. महिलांना आपला बालविवाह रोकता येतो. त्यांना विधवा विवाह करण्याची अनुमती आहे. विनाघुंघट कुठेही जाता येतं. कुठंही केव्हाहीपर्यंत विहार करता येतं. एवढंच नाही तर एक पती असतांना तो जर बरोबर वागत नसेल तर वेळप्रसंगी बदलवता येतो किंवा पती असतांनाही बिनधास्तपणे पर पुरुपांसोबत हिंडता येतं. कारण त्यांना कायद्याच्या संरक्षणाचं कवच आहे. मग असे असतांना त्या महिला स्वतःला का कमकुवत समजतात तेच कळत नाही. त्याचं कारण आहे येथील संस्कृती. आपली संस्कृती महान आहे. त्या संस्कृतीला विशिष्ट असं वलय आहे. महिलांबाबतीत सांगायचं म्हणजे ही संस्कृती सक्षम आहे महिला बाबतीत. या भारतीय स्त्री संस्कृतीला त्यांचा पुर्वइतिहास माहित आहे. तो पुर्वइतिहास म्हणजे दुर्गा, काली अवतारांची. त्यातच त्यांना हेही माहीत आहे की या संस्कृतीनं गार्गी, मैत्रेयीच्या रुपात शास्त्रार्थही केला होता व त्या महिला संस्कृतीनं पुरुषांच्या बरोबरीला खांद्याशी खांदा लावला. महिला कमकुवत नाहीच आणि कोणीही तिला कमकुवत समजून घेवून भूल करु नये. ती कमकुवत सारखी वागते तेही आपल्यासाठीच. तिलाही वाटते की हा देश माझा आहे. माझ्या देशाचा अपमान होईल मी जर अशी संस्कृतीला धरुन वागले नाही तर. हाच हेतू ठेवून महिला वर्ग वागत होता काल. आजही वागतात. परंतू त्या महिला वर्गाच्या तशा वागण्याचा फायदा हा मध्यंतरीच्या पुरुष जातीनं घेतला व त्यांच्यावर विशेष अशी बंधनं घातली व त्यांना गुलामागत वागवलं. यात त्यांनी पुर्ण संस्कृती स्त्रियांना सोपवून दिली. त्यांनी काय खावं, काय प्यावं याबाबतही बंधनं घातली. डोक्यावर पदर असावा. लुगडंच घालावं अशी बंधनं. आज बऱ्याच महिला पुढे गेल्या आहेत. राजकारण, अर्थकारण व देशाची धुरा सांभाळत आहेत. आज महिलांनी ओळखलं आहे की आपण जर आवाज उचलला नाही आणि असेच दबत राहिलो तर येथील पुरुष वर्ग आपल्यावर विनाकारणचा अत्याचार करतो. म्हणून त्या सक्षम बनल्या आहेत. आजही ज्या घरी मुली विवाह करुन जातात. त्या घरी मुली आपल्या मनानुसार नवरोबाला वागायला लावतात. जर नवरोबा तसे वागत नसतील तर त्यांना इंगाही दाखवायला त्या मागे राहात नाहीत किंवा पाहात नाहीत. जर नवरोबा व सासूसासरे चांगले असतील तर मुली चांगल्या वागतात. सांस्कृतीक परंपरेनं वागतात. परंतू जर नवरोबा चांगले नसतील तर मात्र अशावेळी त्या संस्कृत्यांनाही गहाण टाकतात. त्यानंतर कोणी नावबोटं ठेवो की अजून काही त्या घाबरत नाहीत. त्या मुली डोक्यावर पल्लूही ठेवत नाहीत. कोणतीच व्रतवैकल्ये पाळत नाहीत.

महत्वपुर्ण गोष्ट ही की महिला ही आज कमकुवत नाही. तिला कोणीही कमकुवत समजू नये. ती कालही कमकुवत नव्हती. कालही ती दुर्गा रुपात वावरुन माजलेल्या महिषासूराचा विध्वंस करीत होती. आजही ती अशाच माजलेल्या महिषासूराचा विध्वंस करण्यास सक्षम आहे. तरीपण आजही अशा काही स्त्रिया आपण पाहतो की त्यांना पाहिलं की महिला कमकुवत जाणवते. अशा महिला आजही देशात ब-याच आहेत की ज्या आजही अत्याचार सहन करतांना दिसतात. आजही त्यांच्या डोक्यावर पदर दिसतो. घुंघटही दिसतो. आजही त्या महिलांवर घरादारात अत्याचार होत असतो. त्यांना मनमोकळे पणानं वागता येत नाही. ब-याच स्त्रियांना आजही कुठेही केव्हाही मनमोकळे पणानं फिरता येत नाही. सतत भिती आणि भितीच तसंच भितीदायक वातावरणही दिसतं. त्यांच्या आचरणातून आजही त्यांचं दुय्यम स्थान दिसून येतं. आज महिला दिन आहे. महत्वाचं म्हणजे आजपासून तरी महिलांनाही चांगलं वागवावं. त्यांनाही सामाजिकता प्रदान करावी. त्या मान ठेवतात म्हणून त्यांच्याकडून जबरदस्तीनं प्रथांचं पालन करुन घेवू नये. तेव्हाच महिलादिनाचं सार्थक होईल एवढंच सांगावेसे वाटते.

# तिला कळते सारे काही

आधुनिक केसरी



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

स्त्री रूपच मुळी निराळं. तिच्या हृदयातील मायेचा आणि ममतेचा कोपरा किती अलवार सारं काही सांभाळून घेत असतो. एक स्त्री अगदी काहीही करू शकते. देवाने तिला बहूरूपी शक्तीच अर्पण केली आहे. सामर्थ्यशाली तिचे कर्तृत्वाचे हात हे प्रत्येक क्षणी काही ना काही करण्यासाठी झटत असतात. तिच्यातील संघर्ष आणि त्या संघर्षाने जिंकण्याची कहाणी आज आपणासमोर किती अनेक उदाहरणात आहे. स्वतःसह इतरांच्या जगण्यातही उमेदीचं बी रूजवणाऱ्या आणि त्यासाठी अफाट राबणाऱ्या स्त्रिया आपल्या आजूबाजूला दिसतात. तिच्या रोजच्या कामाची प्रशंसा होतं नाही तिचं कौतुक होतं नाही. तरीही दुसऱ्याच्या आनंदात स्वताःचा आनंद मानून ती पुढे चालत राहते. समजूतदारपणाने सारे नातं टिकवते. ऑफिसच्या फाईल पासून ते किचनच्या मसाल्यांपर्यंत सारं बारीकसारीक ती सांभाळत राहते. एकाचवेळी दोनपेक्षा जास्त कामं ती सांभाळत असते. एका पुरूषाला निर्माण करण्याचे आणि सांभाळण्याचे कार्य तिला आपसूक जमते. नवनिर्मितीची शक्ती देवाने तिच्यात रूजवली आहे. तिचं जितकं नाजूक मन तितकेच कणखर धैर्य तिच्यात असते. बाई जरी पारिजातकासम वाटली तरी, तलवारीच्या पात्यासमही ती वेळेप्रसंगी वागत असते. आज स्त्री पुरूष परस्परांच्या खांद्याला खांदा लावून काम करत असले तरी, अजूनही अनेक ठिकाणी स्त्रियांना डावललं जातं. पुरूष मनाला प्रत्येक क्षेत्रात आपले अधिपत्य गाजवायचे असते म्हणूनच तो तिला आपल्यापुढे जावू देऊ पाहत नाही. पण म्हणून सगळे पुरूष असे असतात असे नाही. काही बोटावर मोजण्याइतके सोडले तर तिला पुढे नेऊ पाहणारेही आहेत. प्रत्येक नाण्यांची दुसरी बाजूही असतेच. म्हणूनच तर सावित्री घडली, आनंदी डॉक्टर झाली. यांच्यामागे असणारी प्रेरणा आपण विसरून चालणार नाही. स्त्रिया या आजच्या समाजात वावरत असताना बोलत्या नाही तर कर्त्या होणं फार आवश्यक आहे. स्त्रियांना वाटतं. आपल्याकडे कसले अधिकार आणि कसली सत्ता ? पण जी आणि जेवढी सत्ता आहे तिच्यात तर पुढे असणं आवश्यक आहे. त्यातले अधिकार ओळखता आले पहिजे. शिक्षिका, राजकीय पद, कंपनी, बँका अशा ठिकाणी काम करणाऱ्या स्त्रियांकडे जशी सतूता आहे. तशीच रानात काम करणाऱ्या स्त्रीकडेही आहे. संसाराचं एक चाक सांभाळणाऱ्या स्त्रीकडेही सत्ता आहे. याच स्त्रिया पुढे भारताचे भविष्य घडवतात. सामर्थ्य आणि क्षमता असलेल्या कोणत्याही स्त्रीला चिरडलं जामारं नाही. केवळ स्त्री आहे म्हणून तिच्यावर बंधने पडणार नाहीत. आणि स्त्री म्हणून जेव्हा तिच्या स्वातंत्र्याला तिलांजली द्यावी लागणार नाही. तेव्हा स्त्रिया या खऱ्ा अर्थानै कर्तृत्वान होतील आणि तेव्हाच खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा होईल. आपल्या हक्काला ओळखणे तिने शिकले पाहिजे. स्वताःसाठी जिद्दीने उभं राहीलं पाहिजे. एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीला मदतीचा हात देणे गरजेचे आहे. निंदेने पाय ओढण्यापेक्षा प्रेरणेचा हात द्या निश्चितच बदल समाजात घडून येईल. काळ कितीही पुढे जाऊ देत पण सारखे दुसरे कोणी घडणे अशक्यच दुसऱ्यांच्या मनातील गोड गूज तिला किती सहज कळते. म्हणूनच तर मातृत्वाचा हक्कही देवांने तिला दिला. समाजातील तिचे रूप पुजनीय आहे. हे एका दिवसापुरते मर्यादित न ठेवता. प्रत्येक क्षणी मनी ही जाण असणे आवश्यक आहे.



# गृहिणीची महती



सौ. सुनिता रोझेकर
98674 67925

आधुनिक केसरी

**न गृह गृहमित्याुर्गृहिणी गृहमुच्यते । गृहं तु गृहिणीहीन कान्तारादतिरिच्यते ।। म्हणजेच गृहिणी शिवाय घराला शोभा नाही, घराला घरपण नाही. ती शुचिता, शुद्धता देते. सद्गुणी गृहिणी.... गृहिणीविना त्या घराला घर का म्हणावे? त्याहून अरण्य सुखदायी ठरेल.. स्त्री ही गृहितीपण सांभाळताना अनेक भूमिका निभावते, ती सुग्रास भोजन तयार करून कुटुंबातील व्यक्तींचे उत्तम पोषण करत असते. गृहिणींच्या कामामुळे कुटुंबाच्या आर्थिक स्थितीला हातभार लागतो. देशाच्या अर्थव्यवस्थेतही त्यांचं योगदान मोठे आहे. ती तीन वर्गांना सेवा देत असते. पहिला वर्ग जेष्ठ नागरिक, जे देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देऊन निवृत्त झालेले असतात.**



दुसरा वर्ग तरूणांचा, जे जीडीपी मध्ये हातभार लावतात. तिसरा वर्ग असतो बालकांचा. जे देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावणार.. तांत्रिक भाषेत त्याला ॲक्स्ट्रॅक्ट लेबर असे म्हणतात. अशी ही अन्नपूर्णा, गृहलक्ष्मी, लक्ष्मी पण वेळप्रसंगी आपली साठवलेली पूंजी काढते. भारतीय संस्कृतीत स्त्रीला पूर्वीपासूनच सन्मान दिला आहे. सुवासिनी आणि कुमारिकांचा धार्मिक विधीत, यथोचित आदरपूर्वक सन्मान केला जातो. तो याचसाठी की, प्रत्येक स्त्री च्या अंतर्यामी एक सुप्त शक्ती वास करते. ती उर्जा तिला जन्मजातच मिळालेली असते आणि दुर्गेचा सूक्ष्म अंश तिच्यामध्ये आहे.धरती प्रमाणे सोशिक, समंजस, धीरगंभीर आहे, धरा आणि स्त्री मध्ये एक महत्त्वपूर्ण साधर्म्य आहे. ते म्हणजे जननक्षमता धरती सर्व निर्माण करते, तर स्त्री ही आपल्या कुटुंबाचा वंश वाढवते... म्हणून ती कुटुंबाचा आधार आहे. ती संस्कृती, परंपरेला पुढे नेते. हेच तिचे आद्य कर्तव्य आहे. नव्या जून्या पिढीचे एकत्रीकरण केले तर चांगलेच.. नव्या जुन्या गोष्टी, विचार, तत्व यांचा समन्वय साधला गेला तर खूपच उत्तम. संस्कृतीची समृद्ध, संपन्न परंपरा जपली जावी या देशात प्राचीन काळापासूनच स्त्रीला समान अधिकार दिले जात होते, गार्गी, मैत्रेयी या स्त्रीयांना किवाडामागून शास्त्रार्थ सांगण्यास अनुमती मिळाली. स्त्री सुद्धा पुरुषांच्या बरोबरीने हुशार आहे, तिला अधिकार देण्यात यावा, असे सांगण्यात आले. एवढेच नव्हे तर, वैदर्भीय कन्या लोपामुद्रा हिच्याशी अगस्ती ऋषींनी विवाह करून, तिच्या मागण्यांसाठी काही काळ कष्ट, त्याग करावे लागले. विंध्याचलाचा दर्प भंग करणारे महर्षी होते ते. त्यांना आपण ललितास्वरूपिणी असून आपणही शिव स्वरूप व्हावे असे सांगितले, त्याचे पालनही त्यांनी केले. अशा असंख्य कथा या संस्कृतीत आहेत. स्त्री घराचा आधारस्तंभ आहे. असे यासाठी व म्हटले जाते, ते सोशिक, सहनशील आहे. ईश्वराने असे का घडवले, कारण ती प्रसववेदना सहन करून, कुलापत्य प्राप्त करून देते. प्रसूती हा तिचा पुनर्जन्मच आहे. इथे सोशिकपण दिसून येते. **यत्र नार्यस्तु पूज्यते ।रमन्ते तत्र देवताः ।।** ज्या ठिकाणी स्त्री चा आदर, सन्मान केला जातो, त्या ठिकाणी प्रत्यक्ष देवताच वास करतात. तर जिथे तिची उपेक्षा, अवहेलना केली जाते, तिथे देवी कोप, रोष ओढवला जातो. ती ही गृहलक्ष्मी च आहे. तिच्या भाळी असलेला, कुंकवाचा टीळा हा तिच्या सकारात्मक उर्जेचे प्रतीक आहे. तीच उर्जा संकट वा कठीण प्रसंगी अंतःप्रेरणेनेघराला तारून नेते. मनगटावरील कंकणाकृती कांकण म्हणजे बांगडी ही सामर्थ्य, धारिष्ट्य दाखवून देते. समाजात बोलण्याचा प्रघात आहे. बांगड्या भरा हे उपहासाने बोलणे आहे. वेळप्रसंगी ती एकाचे दोन हात करायला कमी करणार नाही. रस्त्यावर नेहमी आईवरून अश्लील भाषा वापरली जाते. वाईट वाटते. याला कुठेतरी आळा बसला पाहिजे.

आजकाल दूरदर्शनवर मालिकांमध्ये स्त्री चीच शत्रू स्त्री, खलनायिका नायिकेचा अमानूष छळ करताना दाखवले जाते. हे घराघरातील वातावरण बिघडवण्याचे लक्षण आहे. समाजमनावर, पुढील पिढीवर याचा विपरीत परिणाम होईल, याचा विचारच केला जात नाही. पणजी, आजी नेही कौटुंबिक जवाबदारी उत्तम पार पाडली. आई सासू ने आपले करिअर उत्तम सांभाळून, प्रापंचिक जवाबदारी तसेच मुलांसाठी खाल्लेल्या खस्ता, संघर्ष, या गोष्टी दाखवल्या तर पुढील पिढीवर वेगळा परिणाम दिसून येऊ शकेल. आठ मार्च जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. त्याचे अवचित्य साधून अनेक चांगल्या गोष्टीचे कार्यक्रमाचे आयोजन करत, प्रत्येक स्त्रीकडून आपापल्या परीने प्रयत्न केला जावा, असे वाटते. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने हा लेख प्रपंच धन्यवाद.

# आधुनिक काल में नारी का बदलता जीवन



डॉ. ज्योती रा. रामोड
संपर्क क्र. 9673774269

आधुनिक केसरी

**आप सभीको महिला दिन बोहत शुभकामनांऐ। नारी का सम्मान करना एवं उसके हितों की रक्षा करना हमारे देश की सदियों पुरानी संस्कृति है। यह एक विडम्बना ही है कि भारतीय समाज में नारी की स्थिति अत्यन्त विरोधाभासी रही है। एक तरफ तो उसे शक्ति के रूप में प्रतिष्ठित किया गया है तो दूसरी ओर उसे 'बेचारी अबला'भी कहा जाता है।**

इन दोनों ही अतिवादी धारणाओं ने नारी के स्वतन्त्र बिकास में बाधा पहुंचाई है। प्राचीन काल से ही नारी को इन्सान के रूप में देखने के प्रयास सम्भवतः कम ही हुये हैं। पुरुष के बराबर स्थान एवं अधिकारों की मांग ने भी उसे अत्यधिक छला है।अतः वह आज तक 'मानवी' का स्थान प्राप्त करने से भी वंचित रही है । सदियों से समय की धार पर चलती हुई नारी अनेक विडम्बनाओं और विसंगतियों के बीच जीती रही है। पूजा, भोग्या, सहचरी, सह धर्मिणी, माँ, बहन एवं अर्धांगिनी इन सभी रूपों में उसका शोषित और दमित स्वरूप । वैदिक काल में अपनी विद्वत्ता के लिए सम्मान पाने वाली नारी मुगलकाल में रनिवासों की शोभा बनकर रह गई।

मानसिक चिंतन - सदियों से ही भारतीय समाज में नारी की अत्यन्त महत्वपूर्ण भूमिका रही है। उसी के बलबूते पर भारतीय समाज खड़ा है। नारी ने भिन्नभिन्न रूपों में अत्यधिक महत्वपूर्ण भूमिका निभाई है। चाहे वह सीता हो, झांसी की रानी, इन्दिरा गाँधी हो, सरोजनी नायडू हो ।किन्तु फिर भी वह सदियों से ही क्रूर समाज के अत्याचारों एवं शोषण का शिकार होती आई हैं ।उसके हितों की रक्षा करने के लिए एवं समानता तथा न्याय दिलाने के लिए संविधान में आरक्षण की व्यवस्था की गई है। महिला विकास के लिए आज विश्व भर में 'महिला दिवस' मनाये जा रहे हैं ।संसद में 33 प्रतिशत आरक्षण की मांग की जा रही है ।

इतना सब होने पर भी वह प्रतिदिन अत्याचारों एवं शोषण का शिकार हो रही है। मानवीय क्रूरता एवं हिंसा से ग्रसित है। यद्यपि वह शिक्षित है। हर क्षेत्र में महत्वपूर्ण भूमिका निभा रही है। तथापि आवश्यकता इस बात की है कि उसे वास्तव में सामाजिक, आर्थिक एवं राजनीतिक न्याय प्रदान किया जाये।समाज का चहुँमुखी वास्तविक विकास तभी सम्भव होगा ।

सदियों से नारी को एक वस्तु तथा पुरुष की संपत्ति समझा जाता रहा है। पुरुष नारी को पीट सकता है, उसके दिल और शरीर के साथ खेल सकता है, उसके मनोबल को तोड़कर रख सकता है, साथ ही उसकी जान भी ले सकता है। मानो कि उसे नारी के साथ यह सब करने का अघोषित अधिकार मिला हुआ है। मगर यह भी सच है कि अनेक नारियों ने हर प्रकार की विपरीत और कठिन परिस्थितियों का डटकर सामना करते हुए उन पर विजय प्राप्त की और इतिहास में अपना नाम अमर कर दिया।

आज की बदली हुई तथा अपेक्षया अनुकूल परिस्थितियों में नारियां स्वयं को बदलने और पुरुष-प्रधान समाज द्वारा रचित बेड़ियों से स्वयं को आजाद करवाने हेतु कृतसंकल्प हैं। अब प्रश्न यह है कि नारी कितना बदले और क्यों? इसी बात का विवेचन हम इस शोधलेख में करेंगे।नारी जाति का इतिहास और उसमें देखे गए बदलाव अत्यंत महत्वपूर्ण है।

**1. वैदिक काल**

वैदिक काल की नारियों ने पुरुषों के समकक्ष स्थिति का आनंद लिया। वैदिक काल की महिलाएं शिक्षित होती थीं। उनका विवाह परिपक्वता की वय में ही होता था तथा उन्हें अपने वर को चुनने की आजादी होती थी। महिलाओं की स्थिति समाज में काफी ऊंची थी और उन्हें अभिव्यक्ति की पूर्ण स्वतंत्रता प्राप्त थी। वे धार्मिक क्रियाओं में भाग ही नहीं लेती थीं बल्कि, क्रियाएं संपन्न कराने वाले पुरोहितों और ऋषियों का दर्जा भी उन्हें प्राप्त था।'उस समय महिलाएं धर्म शास्त्रार्थ इत्यादि में पुरूषों की तरह ही भाग लेती थी।

"गृहणी, अर्धांगिनी कह कर संबोधित किया जाता था। पुत्र - पुत्री के पालन - पोषण में कोई भेदभाव नहीं किया जाता था।'' उपनयन संस्कार और शिक्षा प्राप्त करने का अधिकार भी स्त्रियों को पुरूषों की भांति समान रूप से प्राप्त था। तत्कालीन युग में महिलाएं सार्वजनिक जीवन में भाग लेती थी। ''अस्पृश्यता, सती प्रथा, पर्दा प्रथा तथा बाल विवाह जैसी कुप्रथा का प्रचलन भी इस युग में नहीं था।''

भारतीय समाज के वैदिक काल में नारी को पुरूषों के समाज में शिक्षा, धर्म, राजनीति और सम्पत्ति के अधिकार एवं सभी मामलों में समानाधिकार प्राप्त थे। इसके बाद धीरे-धीरे नारी को प्रदत्त अधिकारों में हा्रस बढ़ता गया और नारी को प्रदान अधिकारों, शिक्षा, स्वतंत्रता, धार्मिक अनुष्ठानों आदि से वंचित किया जाने लगा। जिससे वह पूर्ण रूप से पुरूषों पर आश्रित हो गयी।

**2. मध्यकाल**

मध्यकाल में स्त्रियों की स्थिति में गिरावट आई।बालविवाह, पुनर्विवाह पर रोक, बहु- विवाह, राजपूत महिलाओं द्वारा जौहर, देवदासी प्रथा जैसी कुरीतियों के माध्यम से नारी जाति का शोषण आरंभ हो गया। नारियों को पर्दे के पीछे कैद कर दिया गया। इसके बावजूद अनेक नारियों ने संघर्ष करते हुए राजनीति, साहित्य, शिक्षा और धर्म के क्षेत्र में विशिष्ट उपलब्धियां अर्जित कर सम्मान पाया। रजिया सुल्तान, गोंड रानी दुर्गावती, रानी नूरजहां, शिवाजी की माता जीजाबाई जैसी महिलाओं ने नारी जाति को गौरव प्रदान किया। मीराबाई ने भक्ति रस की धारा बहाई और वे इतिहास मे अमर हो गई । मध्यकाल में कन्या जन्म के अशुभ माने जाने के संकेत मिलते हैं। सदैव लड़कियां पैदा करने वाली स्त्री को घृणा से देखा जाता था। स्त्री को कुछ सम्मान पुत्र की माता बनने पर मिलता था। परन्तु इस्लाम के भारत में आने के बाद सुरक्षा, विवाह, दहेज आदि प्रश्नों ने कन्या जन्म को सामाजिक अप्रतिष्ठा का विषय बना दिया। अतः कन्या शिशु हत्या की परम्परा प्रारम्भ हुई।स्त्रियों की सुरक्षा व अप्रतिष्ठा के प्रश्न ने कन्या शिशुहत्या आंकड़ों में बृद्धि की। इस युग के आते ही स्त्री के दिव्य गुण धीरे-धीरे उसके अवगुण बनने लगे, साम्राज्ञी से वह धीरे-धीरे आश्रिता बन गयी। जो स्त्रियां वैदिक युग में धर्म और समाज का प्राण थीं, उन्हें श्रुति का पाठ करने के अयोग्य घोषित किया गया। वैदिक युग का दृष्टिकोंण स्त्री के प्रति दिव्य कल्पनाओं तथा पुनीत भावनाओं से परिवेष्टित था, जो धीरे-धीरे पूर्णतयाः बदल चुका था। यह युग तो जैसे स्त्रियों की गिरावट का युग था। ''उनके मानसिक तथा आत्मिक विकास के द्वारों पर ताले लगा दिए गये। उनकी साहित्यिक उन्नति के मार्ग पर अनेकों प्रतिबंध लगा दिए गये।

**3. अंग्रेजी काल**

महिलाओं के पुनरोत्थान का काल ब्रिटिश काल से शुरू होता है। ब्रिटिश शासन की अवधि में हमारे समाज की सामाजिक व आर्थिक संरचनाओं में अनेक परिवर्तन किए गए। ब्रिटिश शासन के 200 वर्षों की अवधि में स्त्रियों के जीवन में प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अनेक सुधार आये। औद्योगीकरण, शिक्षा का विस्तार, सामाजिक आन्दोलन व महिला संगठनों का उदय ने स्त्रियों की दशा में बड़ी सीमा तक सुधार की ठोस शुरूआत की।

अंग्रेजी राज में नारियों की स्थिति में धीमी गति से सुधार आना आरंभ हुआ। नारियों को शिक्षा पाने का अवसर मिला। राजा राममोहन राय ने सती प्रथा के उन्मूलन तो ईश्वरचंद्र विद्यासागर ने विधवा विवाह के पक्ष में बड़ा योगदान दिया। रानी लक्ष्मीबाई ने अंग्रेजों के विरुद्ध लड़ाई लड़कर आपणा बलिदान दिया।आजादी की लड़ाई में अनेक महिलाओं जैसे डॉ. एनी बेसेंट, विजयलक्ष्मी पंडित, अरुणा आसफ अली, सुचेता कृपलानी और कस्तूरबा गांधी ने महत्वपूर्ण योगदान दिया। सुभाष चंद्र बोस की सेना की एक कैप्टन लक्ष्मी सहगल थीं।इस प्रकार के कार्य से समाज को प्रेरणा दी।

**4. स्वतंत्र भारत**

आजादी के बाद सन् 1950 में जब देश को संविधान मिला तो उसमें स्त्रियों को सुरक्षा, सम्मान और पुरुषों के समान अवसर व अधिकार मिले किंतु अशिक्षा, पुरातनवादी सोच तथा कमजोर सामाजिक ढांचे के कारण नारी जाति उन अवसरों और अधिकारों का पूर्ण रूप से लाभ न उठा पाई ।अपने बचपन में वह पिता, जवानी में पति तथा वृद्धावस्था में पुत्र पर निर्भर रही। पति के घर में प्रवेश करने के बाद उसकी अर्थी ही बाहर निकलती रही। पुरुष के आधार पर नारीका जीवन चलता रहा। स्वतंत्रता में नारी की स्थिति का उपरोक्त चित्रण किया गया है। महिलाओ की स्थिति में क्रांतिकारी परिवर्तन आया है। वह अपने घर की चार दीवारी तक सीमित न रहकर खुले वातावरण में कभी भी, कही भी आ जा सकती है। आज स्त्रीयों का काम करने का मुख्य उद्देश्य धनोपार्जन एवं समय का सदउपयोग है। स्त्रीयां मानसिक उन्नती के साथ शारीरिक उन्नती पर भी ध्यान दिया है।

**नारी का विकासात्मक मार्ग**

आजाद भारत के इतिहास को नारियों की गौरव गाथा से दूर नहीं रहना था। इंदिरा गांधी 1966 में देश की प्रथम महिला प्रधानमंत्री बनीं। सुचेता कृपलानी यूपी की मुख्यमंत्री, किरण बेदी प्रथम महिला आईपीएस, कमलजीत संधू एशियन गेम्स में प्रथम गोल्ड पदकधारी, बेछेंद्री पाल एवरेस्ट पर प्रथम भारतीय महिला, मदर टेरेसा को नोबेल पुरस्कार, फातिमा बीबी प्रथम महिला जज सुप्रीम कोर्ट, मेधा पाटकर सामाजिक कार्यकर्ता जैसी अनेक महिलाओं ने पुरुषवादी समाज की सोच को गलत बताते हुए अपनी बुद्धिमत्ता, नेतृत्व क्षमता और सामर्थ्य का परिचय दिया और इतिहास में अपना नाम स्वर्णाक्षरों में अंकित करवा दिया। स्वतंत्रता की रजत जयंती के बाद का समय विकास का स्वर्ग साबित हुआ। देश में कम्प्यूटर तथा अन्य टेक्नोलॉजी के विकास, टीवी युग का प्रादुर्भाव, आधारभूत संरचना के साथ बड़े उद्योगों की स्थापना ने देश में विकास के कीर्तिमानों की नई इबारत लिख दी। बॉलीवुड, फैशन और मनोरंजन की दुनिया में क्रांतिकारी परिवर्तन आया। नारियों तक इस नवविकास की बयार पहुंची और उनकी स्थिति में काफी महत्वपूर्ण बदलाव आया।



आज नारियां पुरुषों से किन्हीं भी मायनों में कम और घर की दीवार में कैद नहीं हैं। वे उच्च शिक्षित हैं, डॉक्टर, इंजीनियर, वैज्ञानिक व अंतरिक्ष यात्री हैं तथा हर तरह के उच्चतम पदों पर भी आसीन हैं। वे अपने वस्त्रों व जीवनशैली के साथ अपने जीवनसाथी का चुनाव करने के लिए स्वतंत्र हैं। उनकी सुरक्षा एवं हित रक्षा के लिए संविधान में लगभग 34 एक्ट प्रभावी हैं।नारियों ने साबित कर दिया है कि वे पुरुषों के समकक्ष नहीं, बल्कि उनसे बेहतर हैं।

आज भारतीय नारी चार दीवारी से निकल कर अपने अधिकारों के प्रति सजग हो गयी है। शिक्षित होकर विभिन्न क्षेत्रों में वो अच्छा प्रदर्शन कर रही है। नारी को भोग्या मानने वाले पुरुष प्रधान समाज में नारी ने प्रमाणित कर दिया की वो भी इस पुरुष प्रधान देश में अपना लोहा रख सकती है। आज उसकी प्रतिभा और दृष्टिकोन पुरुष से पीछे नहीं है। साहित्य, चिकित्सा ,विज्ञान , अनेक ऐसे क्षेत्र है। जिसमें नारी ने अपनी प्रतिभा प्रदर्शीत की है। केवल पुरुष का क्षेत्र मानने वाले पुलिस विभाग में मुस्तैदी से अपना कार्य कर रही है। और पुरुष से पीछे नहीं है।

यदि पति और पत्नी दोनों काम पर हैं, तो उनकी आय दोगुनी हो जाती है। वे अपने बच्चों को बेहतर शिक्षा और चिकित्सा सुविधाएं दे सकते हैं। एक महिला जो आर्थिक सुरक्षा का आनंद लेती है, वह परिवार में हंसी खुशी ले आती है। पूरा परिवार पृथ्वी पर स्वर्ग का स्थान बन जाता है| नया भारत कई बदलावों से गुजर रहा है। सामाजिक परिवर्तन हर जगह दिखाई देता है। देश में महिलाओं की स्थिति में बदलाव सकारात्मक रूप से हो रहा है। समाज की जो भी रूढ़ियां, नियम या परंपराएं होती हैं, वे सारी की सारी गलत नहीं होती हैं। अतः जो भी बदलाव हों, वे तर्कसंगत होने चाहिए और उसमें दूसरों के हितों का अतिक्रमण नहीं होना चाहिए। नारी को समय, स्थान, अपने परिवार, अपनी परिस्थिति और क्षमता के अनुसार ही उपयुक्त बदलाव को अपनाना होगा। भारत में शताब्दियों की पराधीनता के कारण महिलाएं अभी तक समाज में पूरी तरह वह स्थान प्राप्त नहीं कर सकी हैं जो उन्हें मिलना चाहिए। वही हमारी सभ्यता और सांस्कृतिक परम्पराओं और शिक्षा के प्रसार तथा नित्यप्रति बद रही जागरूकता के कारण भारत की नारी आज भी दुनिया की महिलाओं से आगे है। पुरुषों के साथ हर क्षेत्र में कंधे से कंधा मिलाकर देश और समाज की प्रगति में अपना हिस्सा डाल रही है ।

यह दुनिया पल-पल बदलती रहती है। नारियों को भी स्वयं को मौजूदा परिस्थितियों के अनुसार लगातार बदलते रहना होगा। यह तय है कि नारी कोई वस्तु या दया की पात्र नहीं है।बिना नारी के विकास के यह समाज अधूरा है। जैसे पत्नी-पति की अर्धांगिनी है, ठीक इसी प्रकार नारी समाज का अद्धांग है। आधे अंग के अस्वस्थ तथा अविकसित रहने पर पूरा अंग ही रोगी और अविकसित रहता है।

आज हम देखते हैं कि भारत के स्त्री समाज में तेजी से जागृति आ रही है। पुरुषों ने भी नारी के महत्त्व को समझना शुरू कर दिया है। थोड़े ही समय में भारतीय नारी ने यह सिद्ध कर दिया है कि भारत की नारी संसार की किसी भी जाति अथवा देश की नारी से विद्या, बुद्धि, सौन्दर्य और वीरता में कम नहीं है।

आज भी हमारे देश में महिलाओं की संख्या में वृद्धि हो रही है। महिला आरक्षण बिल तथा सशक्तीकरण बिल ने महिलाओं में जागरूकता एवं शक्ति सम्पन्नता पैदा की है। नारी की वजह से आज परिवार की आधारशिला टिकी हैं| इसलिए किसी भी इंसान को नारी को कम नहीं देखना चाहिए| हर एक इंसान को नारी का सम्मान करना चाहिए| अगर हमारे देश में नारी और पुरुष इन दोनों को समान रूप से देखा जायेगा तो विश्व के सभी विकसित देशों में से एक होगा|

**" जब बढ़ेगा नारी सम्मान**
**तभी होगा भारत का कल्याण "**

# नुसते देवी बनवून पूजा करू नका



सौ. मिलिंदा पवार
संपर्क क्र. 97309 09359

आधुनिक केसरी

**देवी म्हणून पूजा स्त्रीची करू नका, पण माणूस म्हणून तीला जगू द्या.  ती आई आहे, ती बहीण आहे, ती मुलगी आहे, ती मैत्रीण आहे, ती पत्नी आहे, ती सून आहे, ती सासू आहे. आणि याचा आम्हाला अभिमान आहे पण ती स्त्री आहे म्हणून तिला फक्त देवी समान न वागवता तिला माणूस म्हणून पण जगण्याचा अधिकार द्या. आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याचे पहिले उद्दिष्ट म्हणजे महिलांना समान अधिकार देणे. स्त्री-पुरुष समानता निर्माण करणे हे आहे. आज पुरुषांबरोबर स्त्रिया देखील सर्व क्षेत्रात बरोबरीनेच नाहीतर एक पाऊल पुढे जावून उल्लेखनीय कामगिरी बजावत असून देखील स्त्री आजही सुरक्षित नाही हे खेदाने सांगावे लागेल.**

लैंगिक शोषण, अत्याचार, भ्रूणहत्या, हुंडाबळी या गोष्टींमुळे स्त्रियांचा मुलींच्या मनात भीतीची  असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. मुलीचा जन्म झाल्यावर तिचा तिरस्कार केला जातो, स्त्रियांचा **अपमान केला जातो.**

**गेली सांगून ज्ञानेश्वरी**
**जरा जपून चाल ग पोरी**
**माणसा परास मेंढरं बरी**
**माणसा परास मेंढरं बरी.**

असेच म्हणावे लागेल असे वाटत आहे माणूस स्त्रीला ती माणूस आहे तिला जगण्याचा तिच्या मनाप्रमाणे वागण्याचा पुरुषांप्रमाणे हक्क आहे हे मान्य अजूनही का करत नाही ?

इतिहास सांगून गेला आहे प्रत्येक पुरुषाच्या, महान व्यक्तींच्या आयुष्यामध्ये आणि यशात स्त्रियांचा मोलाचा वाटा आहे.

शिवरायांच्या स्वराज्य स्थापना करण्यामागील प्रेरणास्थान असणाऱ्या माता  जिजाऊ स्वातंत्र्य चेतना देणाऱ्या राणी लक्ष्मीबाई आणि स्त्री शिक्षणासाठी झटणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या सर्व स्त्रियांचा भारत घडवण्यामध्ये स्त्रियांना घडवण्यामध्ये मोलाचा वाटा आहे.

**ज्याला स्त्री आई म्हणून कळली तो जिजाऊचा शिवबा झाला,**
**ज्याला स्त्री बहीण म्हणून कळली,**
**तो मुक्ताई चा ज्ञानदेव झाला ,**
**ज्याला स्त्री मैत्रीण म्हणून कळली,**
**तो राधेचा श्याम झाला आणि**
**ज्याला स्त्री पत्नी म्हणून कळली,**
**तो सीतेचा राम झाला !**

जागतिक महिला दिन ८ मार्च हा दिवस जगभरात साजरा केला जातो तो महिलांच्या कर्तृत्वाची ग्वाही आहे. याच दिवशी मार्च 1908 रोजी न्यूयॉर्कमध्ये वस्त्र उद्योगातील हजारो स्त्री कामगारांनी रूटगर्स चौकात जमून प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस व कामाच्या जागी सुरक्षितता या मागण्या केल्या होत्या. 1910 साली कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत मार्च 1908 रोजी आंतरराष्ट्रीय अमेरिकेतील स्त्री कामगारांनी केलेल्या कामगारांच्या स्मरणार्थ मार्च महिना हा जागतिक महिला दिन म्हणून कलारा इटकिन यांनी मांडलेल्या ठरावानुसार तो ठराव पास होऊन हा महिला दिन साजरा करण्यात येऊ लागला.

2023 या वर्षाचे जागतिक महिला दिन थीम मराठी मध्ये ही आहे इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी फोर जेंडर इक्वलिटी म्हणजेच" लैंगिक समानतेसाठी नावीन्य आणि तंत्रज्ञान" कोरोना काळात आरोग्य सेवा, कामगार, इनोव्हेटर इत्यादी म्हणून जगभरातील मुली आणि स्त्रियांचे योगदान महत्वपूर्ण होते महिलांनी कोविड-19 च्या संकटात सुद्धा केलेले कार्य गौरवस्पद आहे म्हणूनच म्हणावेसे वाटते.

**स्त्री म्हणजे आदिशक्ती ,**
**स्त्री म्हणजे प्रभूची भक्ती,**
**झाशीची राणी तू ,**
**मावळ्यांची भवानी तू,**
**प्रयत्नांना लाभलेली उन्नती तू**
**आजच्या युगाची प्रगती तू**
**आजच्या युगाची नारीशक्ती तू**
**तुझ्या कर्तुत्वाला सलाम !**

जागतिक महिला दिनाचा मुख्य उद्देश म्हणजे महिलांना त्यांचे अधिकार प्राप्त होणे. पण हे उद्दिष्ट साध्य झाले आहे का  ?नक्कीच नाही जग आधुनिक झाले आहे, स्त्रिया ही आधुनिक झाले आहेत पण तरीही अजूनही त्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जाते .आपल्या देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधान, आयएस ऑफिसर हे सर्व पदे महिलांनी भूषवून ती खंबीरपणे पार पाडले असून देखील अजूनही तळागाळातील स्त्रियांना त्यांच्या छोट्या छोट्या हक्कांसाठी न्याय मागता येत नाही. सध्या कार्यरत असणाऱ्या अर्थसल्लागार मंत्री निर्मला  सितारामन यांनी नुकताच अर्थसंकल्प सादर केला. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी आपली कारकीर्द उत्कृष्टपणे पार पाडली. पहिल्या आईएएस अधिकारी किरण बेदी यांनीही खंबीरपणे आपली कारकीर्द पार पाडली आहे .तसेच सध्या कार्यरत असणाऱ्या द्रौपदी मुर्म यादेखील अतिशय कठीण परिस्थितीतून येऊनही राष्ट्रपती पद अतिशय खंबीरपणे सांभाळत आहेत. असे असताना देखील अजूनही आमच्या गावाकडील महिला अजूनही दारुड्या नवऱ्याकडून मार खात असते, अजूनही एखादी सून जाळली जात असते, अजूनही एखादा कोवळा जीव बोहल्यावर चढत असतो तर अजूनही एखाद्या कोवळ्या जीवावर बलात्कार होत असतो हे सर्व पाहून ऐकून मन सुन्न होते. वाटते जसे महाराजांनी चौरंगा करण्याचे शिक्षा दिल्यानंतर स्वराज्यात एकही बलात्कार झाला नव्हता तसेच शिक्षा आताही दिली तर खूप बरे होईल कुठल्या पुरुषाचे आपल्या बहिणीकडे वाईट नजरेने बघण्याचे हिम्मत होणार नाही. पण हे सगळे बोलायला चांगले वाटत असले तरी कृती शून्य आहे. प्रत्येक पुरुषाने स्त्रीला आदर दिला व घरातूनच याची सुरुवात केली तर प्रत्येक मुलगाही प्रत्येक स्त्रीला आदर देइल, सन्मान करेल तसेच प्रत्येक स्त्रीने देखील स्त्रीचा सन्मान केला पाहिजे तर स्त्रीला देखील समाजात मान मिळेल अजूनही एखादी स्त्री विधवा, परितक्या असेल तर स्त्रिया त्यांना समान वागणूक देत नाहीत. हळदी कुंकू समारंभ असताना सामील करून घेत नाहीत या सर्व जुन्या रूढी परंपरांना नष्ट करून प्रत्येक स्त्रीने स्त्रीला समजावून घेतले पाहिजे, तिचा सन्मान केला पाहिजे .

या महिला दिनानिमित्त प्रत्येक स्त्रीने ही शपथ घेतली पाहिजे की मी स्त्रीभ्रूणहत्या करणार नाही आणि मुलगा मुलगी यामध्ये भेदभाव करणार नाही तसेच दुसऱ्या स्त्रीवर होणाऱ्या अत्याचाराकडे दुर्लक्ष करणार नाही. तरच खऱ्या अर्थाने महिला  दिन साजरा होईल.



# आजच्या नारीचा प्रश्न, परावलंबित्व नक्की कोणाचं ?



अंजली औतकार
संपर्क क्र. 8208149689

आधुनिक केसरी

**मी नाही नाही म्हणतांनाही का लादली बंधने....? मी श्वास घेऊ पाहत होते ,अनं का दाबली स्पंदने ...? नाही अहो,' वाचण्या अगोदर इथून जाऊ नका 'स्त्रियांचं नेहमीच रडक गार्हान सांगून सहानुभूती एकत्रित करण्याचा प्रयत्न जराही नाहीये. मग खरं तर स्त्री आणि परावलंबन हा विषय , हा मुद्दा मला मुळीच मान्य नाही आणि मी याचा तीव्र प्रतिकार करते, असं म्हणून मला देखील त्या पंगतीत बसायचं नाहीये ; जिथे एक तर स्त्री पुरुष भेदभाव होतो किंवा एकाची बाजू उचलून धरली जाते.  म्हणून नारीवादी भाषण छापण्याचा माझा जराही हेतू नाही. मग काय मी हे मान्य करते की स्त्रिया आणि परावलंबित्व यांचा निकटचा संबंध आहे ? क्षितिज माहिती आहे का ? हो तेच जमीन आणि आभाळाची मिलन रेषा ...जी आपल्याला कधी सापडतच नाही ,तरीसुद्धा मनाला भुरळ घालायला पुरेशी असते.**

स्त्री आणि परावलंबित्व हा विषय ही मला त्याच क्षितीज रेषेसारखा दिसतो. आपल्यात समाजातील लोकांनी निर्माण केलेली एक विचारहीन कल्पना.

या विषयाकडे वळताना मला काही प्रश्नांपासून सुरुवात करावीशी वाटते,, का खरंच एखादी स्त्री एखादी मुलगी इतकी असक्षम असते की साधं दुकानात जाताना तिच्या मागे पाच वर्षाचे मुल लावून दिलं जातं ? जेव्हा की हे सत्य सगळ्यांनाच माहिती आहे की खरोखर तिच्यासोबत काही वाईट झालं तर ते पाच वर्षाचे मुल काहीच करू शकणार नाही. पण तरीसुद्धा त्याला रक्षक बनवलं जातं आणि त्याच्या मनात हे मानसिकता रुजू केली जाते की स्त्री एक कमजोर व्यक्तित्व आहे आणि तुला तिचं रक्षण करायचंय. मुलगी एक आर्मी ऑफिसर का असू देत ना, तिच्या लग्नाच्या दिवशी तिच्या चार-सहा मैत्रिणी तिला पकडून मंडपात घेऊन जाणार आणि तिलाही हळूहळू चालावं लागणार अगदी नजर खाली रोखून, मी विचारते का ? खरंच या गोष्टीची गरज आहे का ? मुलगा स्वतःच्या वरातीत नाचू शकतो आणि अगदी एखाद्या राजासारखा ताठ मानेने मंडपात बसू शकतो मग तिने का घालावी खाली मान.. लेफ्ट राईट करत सीमेवर तर ताठ मानेने चालते मग इथे, हे बंधन का लादल जाव ? एक लेखक आहे म्हणून नुसत्या काल्पनिक भराऱ्या मारून वाचकांना भुरळ पाडण्याचा प्रयत्न मुळीच करणार नाही,, थोडं तर्कशील पद्धतीने पाहूया. पूर्ण देशाच्या लोकसंख्येत शंभर पैकी ४८% स्त्रिया आहेत. का एखाद्या देशाचा विकास शक्य आहे, हे बोलून की तिथली ४८% लोकसंख्या असमर्थ आहे... ?? हे अगदी त्या क्षितिजासारखंच खोटं आहे. देशाच्या विकासात स्त्रियांचाही समान वाटा आहे. तरी पूर्ण जगातील रियल प्रॉपर्टी पैकी ८० % प्रॉपर्टीवर मुलांचा अधिपत्य आहे तर फक्त २० % प्रॉपर्टीवर मुलींचं. पूर्ण जगात केल्या जाणाऱ्या कामांमध्ये , स्त्री ही पुरुषापेक्षा दुप्पट काम करते. पण तुलनात्मक पद्धतीने स्त्रियांच्या कामाचा दर्जा कमी आखून दिला जातो. जेव्हा की हेही तितकंच महत्त्वाचं असतं त्याशिवाय जे घरातील काम जे महिला करतात त्यांची आजपर्यंत कोणीच त्यांना सॅलरी दिलेली नाही.अग्रेसिव्ह पोस्ट ची म्हणजेच सो कॉल्ड सन्माननीय पोस्ट ची गोष्ट कराल तर न्यायाधीश या पदावर स्थित ९९% व्यक्ती हे पुरुष असतात. ९०% सॅलरी मुलंच उचलतात. पार्लमेंट मध्ये ८० % सीटवर पुरुषांचा अधिपत्य आहे. हे तर झाला मोठ्या बाबी साध्या पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये नुसत्या संविधानुसार आरक्षीत जागा आहेत ,म्हणून स्त्रियांना निवडणुकीत उभं केलं जातं आणि निवडून आल्यानंतर त्यांचा राजकीय हस्तक्षेप झिरो होऊन त्यांचे परिजन व त्यापैकी कोणीही फॅमिली मेंबर असो किंवा त्यांचा नवरा तोच पुढाकार दर्शवतो. ही सृष्टी ज्याने ही निर्माण केली असेल ,त्याने दोघांमध्ये कुठला फरक ठेवलेला नाही आणि जो फरक ठेवलेला आहे तो सुद्धा फक्त यासाठी की आपली रिप्रॉडक्टिव्ह सिस्टीम व्यवस्थित चालावी .त्याचा अर्थ हा मुळीच होत नाही की कुण्याही एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीवर अधिपत्य गाजवण्याचा हक्क मिळतो. शिवाय भारतीय संविधानाने स्त्री आणि पुरुष यांच्या कुठलाच भेदभाव केलेला नाही. मग तरीसुद्धा आपण भेदभाव करतो तर नक्कीच आपण संविधानाची अवहेलना करतो. मिस्टर नारायणा मूर्ती आणि मिसेस सुधा मूर्ती. आजच्या प्रगतिशील भारतात ह्या पावर कपल ला ओळखत नसतील असे फारच थोडके लोक असतील,, जर तुमच्या डोळ्याआड हि नावं गेली असतील तर इंटरनेटवर पाहू शकता.

स्त्री आणि पुरुष एकमेकांना पूरक कसे असावेत त्याचा उत्तम नमुना. त्यांचे सगळे कार्य त्यांच्या आयुष्यातली सक्सेस पाहिली की डोळे बंद करून हे म्हणता येऊ शकतं ,"जेव्हा एक स्त्री आणि पुरुष एकमेकांना हात देऊन मागे किंवा पुढे चालत नाही, तर जेव्हा ते एकमेकांचा हात हातात घेऊन सोबत चालतात" तेव्हा ते पूर्ण जगासाठी एक उदाहरण बनू शकतात.

हो ते आपल्या सगळ्यांपेक्षा खूप महान आहेत पण वेगळे मुळीच नाहीत वेगळेपण आहे त्या त्यांच्या विचारांमध्ये जे आपल्यात कमी. त्या दोघांनी खूप कमी वयात हे मान्य केलं की कुठलीही स्त्री एखाद्या पुरुषावर अवलंबून नसते किंवा पुरुषही स्त्रीवर अवलंबून नसतो! हो निसर्गाने दोघांनाही एकमेकांचे पूरक बनवलं आहे एवढं खरं. डबल स्टॅंडर्ड कशाला म्हणावे हे तर कोणी आपल्याकडून शिकाव, एकीकडे बिडी ओढायला साधे पैसे नसले तरी चालतील पण आपलं साम्राज्य पुढे चालवण्यासाठी वंशाचा दिवा प्रत्येकाला हवा असतो. खरंच या विचारांवर दया येते,  किती संवेदनहीन भावना आहेत आपल्या की, एकीकडे मुलीचं लग्न करून द्यावं लागेल ती एक मोठी जबाबदारी असते म्हणून मुलीला जन्म देण्यासाठी सुद्धा मागेपुढे पाहणारी मंडळी आपल्याला दिसून येते किंबहुना गर्भातच तिची हत्या. तर दुसरीकडे माझ्या प्रॉपर्टीचा माझ्यानंतर मालक कोण असणार म्हणून मुलासाठी आतुर झालेली. संविधानाने वडिलांच्या प्रॉपर्टीत मुलगा आणि मुलगी दोघांचाही समानता दिलेली असतानाही मुलीला फक्त लग्नाच्या वेळी  त्या प्रॉपर्टी पैकी ५% रक्कम हुंडा म्हणून दिली जाते आणि बाकी उरलेल्या ९५ टक्क्यांवर मुलांचं अधिपत्य असतं. मला इथे परत एकदा प्रश्न उपस्थित करावासा वाटतो की , जर मुलगा आणि मुलीला प्रॉपर्टी मध्ये समान वाटा मिळाला, तर तिला सासरी जाऊन किमान" फायनान्शिअली 'तरी इतरांवर अवलंबून असण्याची गरज आहे का ? माहेरी म्हटलं जातं की मुली परक्या घरी जायचं आहे आणि सासरी म्हटलं जातं की ही परक्या घरून आली आहे ...तीच तर जणू घरच नाही. साधी तिच्या नावाची नेमप्लेट सुद्धा घरावर लावली जात नाही,, अशा बऱ्याच छोट्या छोट्या गोष्टींमधून आपण नेहमी एका स्त्रीला सांगत असतो की या सगळ्या तिच्या जबाबदाऱ्या आहेत हक्क तर तिचा कशावरच नाही. मग कशावर हक्कच नाही ,,,तर ती आहे अवलंबून पुरुषांवर आणि मग कधीच न संपणारा हा वर्तुळाकार विषय इथेच मोठा होत जातो जेव्हा स्त्री सुद्धा स्वतःला परावलंबित समजते. ठीक आहे एका नव्या जीवाला जन्म देणं ही तिची जबाबदारी असू शकते किंवा निसर्गाने मुद्दाम तिला दिलेली एक संधी. पण जन्म झाल्यानंतर त्या मुलाला चालणं बोलणं शिकवण्यापासून त्याची प्रत्येक जबाबदारी उचलणं का फक्त स्त्रियांचच काम आहे ? का स्वतःच्या मुलांचं पालनपोषण करण्यास असमर्थ असणारा पुरुष या कामासाठी स्त्रियांवर अवलंबित नाही ?

स्वतः तर दररोज थाटात ऑफिसला जाणार पण नेमकं हेच विसरतो की जॉब त्याच्या बायकोचा ही आहे. पण तिचा टिफिन बनवून देणे म्हणजे पुरुषात्वावला मान खाली घालण्यासारखं वाटतं आपल्याला.

दुहेरी मानसिकतेची हद्द तर  तेव्हा ओलांडली जाते जेव्हा आपल्या विचारात मुलगी तर आपल्याला नोकरी करणारी हवी, पण समजा तिने तिच्या पगारातून काही पर्सेंट तिच्या आई-वडिलांना द्यायची बोलणी केली ,तर मग संबंध नाकारले जातात. मी विचारते मुलांची आई वडील जबाबदारी असतात तर मुलींचे का असू शकत नाहीत ? दुसरा यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे तिला हे विचारण्याची गरज का पडावी तिचे पैसे !तिची मर्जी !तिचा हक्क ! पण तुम्ही या मानसिकतेतून तिची मुक्तता ही होऊ देत नाही. सासू-सासऱ्यांची सेवा करणे हे तर प्रथम कर्तव्य असतं. म्हणूनच तर आज कालची सो कॉल्ड संस्कारी पिढीतील मुलं लग्नाच्या पहिल्या रात्रीच बायकोला ठणकावून सांगतात ,,की माझ्या आई वडिलांचा जराही अनादर होता किंवा त्यांना कुठल्याही गोष्टीची कमतरता भासतात कामा नये ., कारण मी त्यांच्यावर खूप प्रेम करतो. हो तर मग प्रेम करतोस तर बाबांना सकाळचा चहा वर्तमानपत्र संध्याकाळच्या त्यांच्या मेडिसिन्स,आईला देवपूजेसाठी फुलांपासून ते गुडघे त्रास देतात म्हणून तेल लावण्यापर्यंतचे काम का स्वतः करत नाहीस ? यासाठी तर तो स्त्रियांवर अवलंबून असतो ?  आईला साधा स्मार्टफोन गिफ्ट म्हणून दिला, किंवा शॉपिंग साठी पैसे दिले म्हणून स्टेटसला स्वतःची महानता मिरवणारी आजकालची तरुण पिढी हेच विसरते की आईला या गोष्टींमधून एकच भावना देत आहात कि ती तुमच्यावरही अवलंबून आहे. जेव्हा की तुमचा पूर्ण आयुष्य तिच्यावर डिपेंड असतं. विषय आपला तो नाही पण रस्त्यावर रेप झाला म्हणून किमान कॅण्डल मार्च तरी काढला जातो किंवा शिक्षा नाही होत  गोष्ट वेगळी असली तरी सुद्धा पोलीस स्टेशनमध्ये जाण्याची तसदी तरी घेतली जाते. पण तीन पैकी दोन मुलींवर दररोज त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्याच घरात बलात्कार होतो त्याचा सदा विषयी काढला जात नाही. का शारीरिक वासणेला भागवण्यासाठी पुरुष स्त्रियांवर अवलंबून असतात असतं नाही . प्लीज याला विरोधाभासी म्हणून असं म्हणू नका की शारीरिक गरजा दोघांच्याही असतात कारण संपूर्ण जगातला प्रॉस्टिट्यूट रेशो पाहिला तर स्त्रियांचीच संख्या आघाडीवर येते . मग हा असे म्हणा की हा व्यवसाय त्यांची मजबुरी असतो पण का मग पुरुष स्वतःची वासना भागवण्यासाठी त्यांच्यावर अवलंबून नसतो ? मी लेखक आहे तर यमक कुठेतरी जुळतातच आणि या सगळ्या विषयाला धरून माझा मोठा प्रश्न उद्भवतोच. किती हे परावलंबित्व पुरुषांचं ? या गोष्टीला विरामाकडे नेताना भारतावर जेव्हा इंग्रजांनी राज्य केलं तेव्हा त्यांनी भारतातील जनतेला मृत्युदंड नाही दिले किंवा कुणालाही संपवण्याचा प्रयत्न नाही केला. तर त्यांचे जात ,वर्ण, लिंग, भेद यावरून द्वेष निर्माण करून एकमेकांत भांडण लावून दिली. ते शक्तिशाली आणि आपण कमजोर आहोत अशी मानसिकता आपल्या मध्ये रूढ करवून दिली. आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तेच काम फक्त संख्येने जास्त असणाऱ्या पुरुषांनी महिलांविषयी केलं. त्यांच्या मनात ही मानसिकता रुजवून दिली की त्या पुरुषांपेक्षा कमी आहेत किंबहुना पुरुषांवर अवलंबित आहेत. जेव्हा की त्यांनाही हे चांगलंच माहिती आहे अगदी इंग्रजांसारखंच की हे खरं नाहीए . तेव्हा या विरोधात खूप मोठ्या मोठ्या क्रांती झाल्या आणि आज स्त्री-पुरुषांच्या बाबतीतही ह्या क्रांती टाळण्यासाठी एक खूप छान मार्ग अवलंबला जातो तो म्हणजे फिजिकल  व्होयलेंस. कधी कुण्या स्त्रीने मान वर काढण्याचा प्रयत्न केला की तिच्यावर अत्याचार करून तिचा आवाज दाबला जातो .वाईट तर तेव्हा वाटतं जेव्हा एखाद्या स्त्रीने जरी या सगळ्या व्यापातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला तरी सुद्धा ती मजबूर असते कारण वेगळी होणार किंवा घटस्फोट घेणार तर समाजात नाचक्की होणार माहेरच्या लोकांची मान खाली जाणार आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे तिच्या मुलांचं काय होणार ?? छान पद्धत आहे ना मॅनिपुलेशनची. आणि ह्या सगळ्या मानसिकता स्त्री ह्रदयात पेरण्याचं काम अगदी लहानपणापासून केलं जातं. आता कसं सांगण्याची गरज नाही कारण तुम्ही स्त्री असा किंवा पुरुष लहानपणीपासून घरात घडत असणाऱ्या छोट्या छोट्या गोष्टींमधून काय काय परिणाम तुमच्यावर झाले याचा विचार केला की सगळी उत्तर आपोआप मिळतील. फक्त खेळण्यांमध्ये मुलींना घरघर भांडे देऊन त्यांचं काम घर सांभाळण्याचा आहे हे शिकवण आणि मुलांना सुपरमॅन बुलेट सारखे अग्रेसिव्ह गेम खेळवून त्यांचं मोठेपण दाखवणं असो की आपल्या सण समारंभात रक्षाबंधनाला भावाच्या हातावर राखी बांधून भावाचं बहिणीला रक्षणाचे वचन देणं असो. इथे सुद्धा प्रश्नच उभा राहतो लहान असो किंवा मोठा का करावा भावाने रक्षण, तो खूप महान आहे म्हणून ? की स्त्री स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम नाही म्हणून ?  ह्या छोट्या छोट्या गोष्टींमधून आपण आपल्या पुढच्या पिढीला हाच संदेश देत आहोत की स्त्री आणि पुरुषांमध्ये भेदभाव तर असतो एक कमी तर एक जास्त असतो नकळत आजच्या जगातली मॉडर्न मानसिकता असणारे आपणही ह्याच रूढी परंपरा फॉलो करत आहोत. आणि ही सायकल कधीही न संपण्यासारखी वाटते म्हणून ही आपली नैतिक जबाबदारी असली पाहिजे की या विचारांना कुठेतरी वाचा फोडावी. वर मी जे काही लिहिलं त्यात माझा हा उद्देश मुळीच नव्हता की स्त्री एक दुर्बल घटक आहे आणि पुरुष त्यांच्यावर अत्याचार करतात मला सांगायचं होतं, किंवा असंही म्हणत नाही की पुरुषच स्त्रियांवर अवलंबून असतात स्त्रिया सर्व गोष्टीत सक्षम. तर याचा पूर्ण अर्थ असा होता की एकमेकांचे पूरक असू शकतात स्त्री आणि पुरुष , कोणी मोठा किंवा लहान असूच शकत नाही.

# महिलांवरील हिंसाचार: अंत नसलेली शोकांतिका



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**आज जगभरात स्त्रियांवरील अत्याचार ही हृदयद्रावक शोकांतिका झाली आहे. स्त्रियांवरील अत्याचाराचा कळस गाठणाऱ्या घटना देशभरात घडत आहेत. 'लिव्ह इन रिलेशनशिप' या धर्तीवर श्रद्धा वाळकर आणि आफताब हे दोघे एकत्र रहात असताना , आफताब याने श्रद्धाचा निर्दयी खून करून तिचे अनेक तुकडे करून त्याची अनेकप्रकारे विल्हेवाट लावून आपला गुन्हा लपवण्याचा प्रयत्न आफताब याने केला. मानवतेला काळिमा फासणारी ही घटना स्त्रियांच्या शोकांतिकाचा आक्रोश दर्शवत आहे. लिव्ह इन रिलेशनशिपमधील श्रद्धाची इतक्या क्रूरतेने, निर्दयीपणे , शांत डोक्याने, हत्या करणाऱ्या विकृत आफताबला श्रद्धा ही केवळ खेळणे समजून तिला संपवून त्याने पशुत्वाचे दर्शन घडवले आहे.**

पोलिसांचीआफताबबरोबर 'लिव्ह इन'मध्ये राहत असलेल्या श्रद्धाला तो सातत्याने मारहाण करायचा. त्याची परिणती तिच्या हत्येत झाली. हे वाचल्यानंतर संपूर्ण देश हादरला. यासारख्या अनेक घटना देशात घडत आहेत. दिल्लीमध्ये पुन्हा श्रद्धा वालकर हत्याकांडाची पुनरावृत्ती झाली आहे. एका तरुणाने आपल्या प्रेयसीचा खून करुन मृतदेह ढाब्याच्या फ्रीजमध्ये ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या खूनानंतर तरुणाने दुसऱ्या तरुणीसह लग्नही केलं. प्रेयसीने लग्नाला विरोध केल्याने हा खून केल्याची माहिती तपासात समोर आली आहे. पण ही केवळ एक घटना नाही.श्रद्धा वालकर आणि निक्की यादव यांच्या हत्याकांडाने संपूर्ण देश हादरला आहे. खुनाच्या या दोन्ही घटना ताज्या असताना राजस्थानातील नागपूरमध्ये अशाच प्रकारची आणखी एक घटना उघडकीस आली आहे. येथील एका तरुणाने आपल्या प्रेयसीची हत्या करून तिचे तुकडे विविध ठिकाणी टाकून दिले आहेत. मृत महिलेचं नाव गुड्डी असून ती विवाहित आहे. मृत महिलेच्या कुटुंबीयांनी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

भारतातच नव्हे तर संपुर्ण जगात महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये संपूर्ण देशभरात महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वेगाने वाढले असून, देशात ३पैकी १ महिला शारीरिक किंवा लैंगिक शोषणाचा बळी ठरत आहे. यात सहा राज्ये आघाडीवर आहेत.देशभरात महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असतानाच गेल्या वर्षभरात पॉक्सो कायद्यातंर्गत लैंगिक अत्याचारासंदर्भात जे गुन्हे दाखल झाले त्यातील ९९ टक्के गुन्हे हे अल्पवयीन मुलीं संदर्भात होते अशी धक्कादायक माहिती राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरोच्या ( NCRB )अहवालातून समोर आली आहे. दरम्यान, महिला अत्याचारात महाराष्ट्र चौथ्या स्थानी आहे. नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हेने ( एनएफएनएल-५ ) ६२ हजार ३८१ महिलांवर केलेल्या संशोधनाच्या आधारावर स्टेटस् ऑफ इंडियाने ही आकडेवारी जाहीर केली आहे. अनेक प्रकरणांमध्ये महिला या पती किंवा कुटुंबातील अन्य सदस्यांच्या हिंसाचाराचा बळी ठरत असल्याचे समोर आले आहे.सहा राज्यांमध्ये १८ ते ४९ वय असणाऱ्या विवाहित महिलांचा त्यांच्या पतीकडून शारीरिक किंवा लैंगिक छळ झाल्याचे उघड झाले असून, हे प्रमाण २९.३ टक्के आहे. याशिवाय शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागातील महिलांवरील वैवाहिक हिंसाचाराचे प्रमाण अधिक असल्याचे समोर आले आहे. कर्नाटकामध्ये महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यापाठोपाठ बिहार, मणिपूर, तामिळनाडू, तेलंगणा, उत्तरप्रदेश यांचा क्रमांक लागतो. महाराष्ट्रातही हे प्रमाण २५.२ टक्के आहे.

काय आहे वास्तव ? शहरी भागात २४ टक्के महिलांना, तर ग्रामीण भागात ३२ टक्के महिलांना पतीच्या हिंसाचाराचा सामना करावा लागतो. तब्बल ७० टक्के महिलांना त्यांच्या पतीकडून दारू प्यायल्यानंतर मारहाण करण्यात आली, तर २३ टक्के महिलांना नवऱ्याने दारू न पिताही मारहाण केली आहे. भयानक म्हणजे ७७ टक्के महिलांवर शारीरिक किंवा लैंगिक हिंसाचार झाला आहे. पण, त्यांनी त्याबद्दल कोणालाही सांगितलं नाही किंवा कुणाचीही मदत मागितली नाही.या आकडेवारीनुसार हे सिद्ध होते, की महिला समाजातच काय; पण सात फेरे घेतलेल्या पतीसमवेतही सुरक्षित नाहीत. त्यामुळे गेल्या काही वर्षांत विवाहीत महिलांचे पतीविरूद्ध तक्रार करण्याचे प्रमाण वाढले आहे. विवाह संस्था धोक्यात आल्याचे हे चित्र आहे. भारताची घटना आणि त्यात नमूद केलेल्या न्यायदानाची प्रक्रिया पाहता गेल्या २५ वर्षांत काही प्रमाणात बदल झाले असले तरी तसेच सरकारने महिला सुरक्षेसाठी ठोस पावलं उचलली असली तरी कायद्याची भीती न बाळगता असे गुन्हे घडत आहेत. कायद्याच्या चौकटीतील महिलांसाठी असलेले विशेष कायदे , महिलांसाठी राबवण्यात येणाऱ्या अनेकविविध उपाययोजना न्यायालय राबवत आहे. महिलांना सुरक्षितता देण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र, तरीही महिलांबाबत असलेली समाजाची मानसिकता अजूनही तशीच आहे त्यात जराही बदल झालेला नाही. आपला देश आजच्या घडीला स्वांतत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत असतानाही आपल्या देशात महिलांना मोकळा श्वास घेता येत नाही. समाजात वावरत असताना मुलींनी, महिलांनी सतत भीतीच्या छायेखाली कधीपर्यंत वावरायचे ?, असा गंभीर प्रश्न सत्यताने उपस्थित केला जात आहे. देश, समाज, घर-कुटुंब इत्यादी सर्वच गुन्ह्यांबाबत पूर्वग्रह, नैराश्य, जडत्व आणि त्यातून निर्माण होणारी निराशा यामुळे घडत असलेल्या गुन्ह्यांबद्दल बोलतो, तेव्हा या गुन्ह्यांबाबत संवेदनशील वृत्ती ठेवली पाहिजे, यावर एकमत होते. दडपलेल्या इच्छा आणि पुरुषप्रधान समाजानेच बनवलेल्या नियमांच्या पकडीमुळे हे गुन्हे घडतात. या वस्तुस्थितीच्या आधारे एक वैज्ञानिक आणि संवेदनशील दृष्टीकोन तयार केला जातो जो खरा आणि मूलभूतही असतो, पण मग समाजात असे गुन्हे कोण खपवून घेतात, असा खेदजनक प्रश्न मनात निर्माण होतो, याचे उत्तर म्हणजे महिला आणि मुले. सामाजिक शक्तीच्या कोणत्या टप्प्यावर महिला येतात हे आपल्या सर्वांनाच चांगले माहीत आहे. या विषमतेची कुरूपता जवळून पाहिल्यावर मनात दुःख आणि संताप दोन्ही आहे की, जगातील जवळपास अर्ध्या लोकसंख्येची फाटलेली हृदये कशी दुरुस्त करायची, ज्यांच्यासाठी आजही समाज हतबल आहे..! कुठे गेला होतास...! हे असहायतेचे, वेदनांचे, त्रासाचे आणि चिंतांचे घर आहे. जो समाज त्यांच्या स्वप्न पाहण्याच्या मूलभूत अधिकाराचा, माणसाच्या मानवी इच्छांना ठेचून राहतो. बरं, हा प्रश्नच समाजासमोर आरसा घेऊन उभा आहे की, या दुःखाच्या ठिकाणांवर अधिक बारकाईने विचार करण्याची आणि समजून घेण्याची आणि त्यावर आतापर्यंत झालेल्या चर्चेचा पुनर्विचार करण्याची किती गरज आहे. कुठेतरी महिलांवरील अत्याचाराची चर्चा झाली की, मन विचित्र पद्धतीने ते सोडू लागते, कारण खेड्या-पाड्यात अशा अनेक घटना घडत राहतात की, अशा हिंसाचाराच्या आणि क्रौर्याच्या घटना मनात संतापासारख्या निर्माण होतात. या अन्यायांची मोजदाद केली, जे मी लहानपणापासून पाहत आलो आहे, ऐकत आलो आहे, तर लिहिताना संध्याकाळ होईल, परंतु काही अत्यंत रागीट क्रौर्य आणि समाजाच्या पूर्णपणे पक्षपाती वागणुकीची नोंद केली, तर दृश्ये अधिक स्पष्ट होतील कारण त्यांच्या पद्धती, श्रद्धा आणि त्यांचे विचार तेथील परिस्थिती ठरवतात. सामाजिक शक्तीच्या कोणत्या टप्प्यावर महिला येतात हे आपल्या सर्वांनाच चांगले माहीत आहे. या विषमतेची कुरूपता जवळून पाहिल्यावर मनात दुःख आणि संताप दोन्ही आहे की, जगातील जवळपास अर्ध्या लोकसंख्येची फाटलेली हृदये कशी दुरुस्त करायची, ज्यांच्यासाठी आजही समाज हतबल आहे..

मी माझ्या बाजूने फारसे वेगळे बोलू इच्छित नाही. सामाजिक वागणूक आणि त्यांचे पूर्वग्रह, धारणा इ. मला फक्त काही घटना आणि लोकांच्या प्रतिक्रिया आणि वर्तन अधोरेखित करायचे आहे की समाजातील शोषितांमध्येही महिलांचे शोषण होते. एकाच संवेदनेत दोघांनाही वेगळ्या पद्धतीने कसे वागवले जाते आणि आम्ही फक्त त्याचे वैशिष्ट्य पाहू शकतो कारण ते संपूर्ण पाहणे कठीण आहे. आता खूप वर्षांपूर्वी घडलं, गावात घरासमोर एक कुटुंब होतं, एक संयुक्त कुटुंब होतं ज्यात अनेक मुलं, स्त्री-पुरुष राहत होते. माझ्या समोर घडलेली ही घटना मला नेहमी आठवत होती, रात्रभर एका बाईचा रडण्याचा आवाज माझ्या घरी येत होता. त्या कुटुंबातील सुनेला मुलाने बेदम मारहाण केली, ही रोजचीच बाब होती, गावात कोणीही ही बाब गांभीर्याने घेतली नाही. हे भारतीय समाजवादी समाजाचे सामान्य वर्तन आहे, त्यांच्या प्रतिष्ठेचा भाग आहे. मी ज्या बाईबद्दल बोलतोय तीची थेट तिच्या नवऱ्यानेच 'हत्या' केली होती, पण गावातले सगळे त्याला अपघात म्हणत राहिले. गावकऱ्यांचा असा विश्वास होता की गरीब माणसाला भांडण करणाऱ्या बायकोचा त्रास होतो, बायको प्रबळ इच्छाशक्तीची होती, मग तो तिला विनाकारण का मारेल ? त्या दिवशीही त्याच भांडणात तो कुठेतरी जखमी झाला आणि त्याचा मृत्यू झाला. हत्येनंतरही पोलीस कसे तरी आले, त्यानंतरही पोलिसांना कोणी बोलावले म्हणून ग्रामस्थ चांगलेच नाराज झाले. बऱ्याचदा अशा गोष्टी खेड्यांमध्ये न्यायाच्या भावनेतून होत नसून परस्पर वैमनस्य आणि वैरातून केल्या जातात. पण या घटनांमध्ये मला एक मुख्य गोष्ट दिसते ती म्हणजे एखाद्या महिलेवर गुन्हा घडला तर तो गुन्हा नसून चूक किंवा अपघात आहे. असं लोक बोलतात खेड्यापाड्यातसह शहरात अशा प्रकारच्या घटना सर्रास



घडतात, त्यांचा जातिभेद आणि सरंजामशाही समाज नेहमीच गुन्हेगारांना वाचवण्यासाठी उभा असतो. येथील महिला पतीविरुद्ध किंवा लैंगिक छळाची तक्रार करण्यासाठी पोलिस ठाण्यात गेल्यास तिचे ऐकले जात नाही, अशी परिस्थिती आहे. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले तरी ते अजिबात अहवाल लिहीत नाहीत, उलट ते फक्त फटकारण्याचे काम करतात कारण तिथे बसलेले लोक असे गुन्हे करत राहतात आणि तो आपला हक्क मानतात. अशा प्रकारे समाजातील ही माणसे आपल्या बंधुभावाला सहकार्य करतात. यात तुम्ही हेही स्पष्टपणे पाहू शकता की स्त्री ही समाजातील दुहेरी सर्वहारा वर्ग आहे कारण ती शोषित आणि वंचितांमध्ये सर्वात जास्त अत्याचारित आहे. आता असे दिसून येते की जर तुम्ही एखाद्या स्त्रीवर गुन्हे करत असाल तर तुम्ही समाजात फार दबदबा असणारा माणूस असण्याची गरज नाही, त्यासाठी तुम्ही पुरुष असणे पुरेसे आहे.

या विषयावर कोणाचेही मत असो, पण या भूमीवर राहून मी सतत जे पाहतोय ते म्हणजे महिलांवरील हिंसाचार ही दुर्बल आणि दुर्बल घटकातील समाजातील एक सामान्य बाब आहे. आपल्या देशात अनेक कायदे अस्तित्वात आहेत, पण ते अंमलात आणण्यासाठी आधी समाज जागृत होणे आवश्यक आहे. आजची सध्याची अविचारी पिढी पाश्चात्य संस्कृतीचे अवलोकन करत भावनिक होऊन अविश्वासू प्रेमापायी कुणासही जुमानत नाही. यातून गंभीर स्वरूपात गुन्हे आढळल्यास अत्याचारा बळी पडलेल्या व्यक्तीला प्रत्यक्ष कारवाईसंदर्भात अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांना महिलांवरील गुन्ह्यांत कारवाई करण्याबाबत अनेक राजकीय नेते, पक्षांची उदासीनता, गुन्ह्यांबाबत उपलब्ध अपरिपूर्ण कायदे, कायद्यात विलंबाने होणाऱ्या शिक्षांच्या अंमलबजावण्या, याबाबतची परिपूर्ण माहिती, त्याचे होणारे परिणाम आजकालच्या पिढीतील तरुणींना, त्यांच्या पालकांना समजावून सांगण्याची गरज आहे. आजकालच्या आधुनिक, प्रगत समाजाची स्वतःची परंपरागत मूल्ये आणि प्रथा आहेत, हा खूप कठीण संघर्ष आहे. त्यासाठी आवश्यक आहे ती जुनी मूल्ये, श्रद्धा आणि प्रथा, मूळ श्रद्धा इत्यादींचे तटस्थ आणि वैज्ञानिक पुनर्मूल्यांकन करण्याची न्याय आणि विज्ञानाच्या दृष्टिकोनातून समाजात या विषयावर बोलत राहणे ही आपली जबाबदारी आहे.

बाकी हे सर्व शतकानुशतके कंडिशनिंग आहे, त्यामुळे खूप वेळ लागेल आणि बरेच अपयश येऊ शकतात, बदलाची दिशा देखील थोडी गोंधळात टाकू शकते. बदलाचा नमुना एक परिपूर्ण नमुना असेल या आशेने आपण खूप निराश होऊ नये कारण जेव्हा गोष्टी खंडित होतात तेव्हा ते एका परिपूर्ण चौकटीत एकत्र बसतीलच असे नाही. गुन्हेगारांना वाचवण्यासाठी त्यांचा जातिभेद आणि त्यांचा सरंजामशाही समाज सदैव उभा राहतो. येथील महिला पतीविरुद्ध किंवा लैंगिक छळाची तक्रार करण्यासाठी पोलिस ठाण्यात गेल्यास तिचे ऐकले जात नाही, अशी परिस्थिती आहे. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले तरी ते अजिबात अहवाल लिहीत नाहीत, उलट ते फक्त फटकारण्याचे काम करतात कारण तिथे बसलेले लोक असे गुन्हे करत राहतात आणि तो आपला हक्क मानतात. अशा प्रकारे समाजातील ही माणसे आपल्या बंधुभावाला सहकार्य करतात.

महिलांवरील लैंगिक अत्याचाराचा पाया समाजात खोलवर रुजलेला आहे. पुरुषांना, त्यांच्या घरातील-कुटुंब समाजाला आणि काही प्रमाणात चित्रपट, मालिका, सोशल मीडियावर बनवलेले अश्लील व्हिडीओ, रील्स, स्त्रियांवर केलेले अश्लील विनोद, स्थानिक भाषांमध्ये बनवलेले स्वस्त आणि अत्यंत अश्लील गाणी, इत्यादींचे प्रशिक्षण समाजतुनच मिळत असते. अशा समाजाकडून आपण कोणत्या अपेक्षा करणार आहात. ? आपण आपल्या देशातील स्वतंत्र नागरिक बनत असताना , देशातील स्वातंत्र्याचा उपभोग घेताना त्या स्वातंत्र्याचा स्वैराचार होणार नाही याचं प्रत्येक नागरिकाने भान ठेवायला हवं. असे असेल तरंच भारतीय कायद्याने, संस्कृतीने लादलेल्या, कृत्रिमता-दांभिकता जोपासणाऱ्या ऊर्ध्वगामी आदर्शांच्या ठिकाणी मानवतेतील पारदर्शिता आणि प्रगल्भतेचा आदर्श ठेवणारी योग्य न्याय देणारी समाजव्यवस्था निर्माण होऊ शकेल.

लिहिताना एका घटनेचा उल्लेख करताना अनेक घटना समोर येतात ज्या महिलांवर झालेल्या अन्यायाचे दस्तावेज आहेत, ज्याकडे कोणीही मागे वळून पाहिले नाही. जगातील सर्व शोकांतिकांमध्ये, ही सर्वात व्यापक आणि दयनीय शोकांतिका आहे, ज्या सातत्याने घडत आहेत. कोणत्याही कालखंडात, या गुन्हेगारीच्या क्रमात इतक्या नवीन घटना सतत घडत असतात की प्रत्येक क्षणी एक नवीन दुःखद इतिहास तयार होतो. . याची जबाबदारी महिलांवर नियंत्रण ठेवणाऱ्या आपल्या समाजाची नाही का ?. आज गरज आहे समाजाच्या विचारांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणण्याची, मूर्खपणाचे सर्व पृष्ठभाग उखडून न्याय आणि वैज्ञानिक तर्काने बघण्याची . समाजाची स्त्रीविरोधी वृत्ती बदलण्याची गरज आहे आणि हे कार्य अविरतपणे सुरू आहे कारण स्त्रीविरोधी ही संपूर्ण परंपरा ही शतकानुशतके चाललेल्या सामाजिक वर्तनाचे फलित आहे. आपल्यासमोर लढाईची खूप मोठी रात्र आहे ज्याची सकाळ आपल्या अपेक्षेइतकी आनंददायी नसेल पण लढू नये हे आपल्यासाठी आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी बेजबाबदार वर्तन आहे, समता आणि समरसतेच्या समाजासाठी अजून बराच पल्ला गाठायचा आहे. नवोपक्रमासाठी मानवी मूल्ये आणि संवेदनशील जगाची वैज्ञानिक आणि द्वंद्वात्मक दृष्टी निर्माण करावी लागेल.यासाठी समाज जागृत व्हायला पाहिजे. प्रत्येकाने जबाबदारीचे भान ठेवले पाहिजे.

# कवितेत उमटलेले आईचे सर्वसाक्षी, सर्वव्यापी प्रतिबिंब



प्रा. शांताराम हिवराळे
संपर्क क्र. 9922937339

आधुनिक केसरी

**मराठी वाङ्मयात आईच्या व्यक्तीमत्त्वाचे विविध पैलू दृष्टीस पडतात.समाज प्रवाह गतीमान असतो.वास्तव बदलत राहते. तसेच आईचे आईपणसुध्दा बदलत गेले.तिच्यात अस्तित्वभान, अस्मितेची जाण,आत्मबळ,आत्मविश्वास, निर्णयक्षमता व करारीपणा आला.संकटांना सामोरी जाण्याची शक्ती आली. ती चार भिंतीच्या बाहेर पडली.मुलीची मैत्रीण झाली.मुलींनासुध्दा आई म्हणजे मनमोकळे करण्यासाठी एक विश्वासाचा आधास्तंभ मिळाला.तर मुलांसाठी ती दीपस्तंभ झाली. बालपणापासूनच ती मुलांना संस्कारक्षम करू लागली.त्यामुळे मुलांच्याघडणीत तिचा वाटा अधिक मोलाचा आहे.**

**" आठवते आई फिरफिरून प्रसन्न शांत तुझे
वदन मुर्तिमंत जणू तृप्त समाधान
विफल ज्यापुढे ज्ञानविज्ञान "**
( सांगाती )

अनिलांच्या "आई" कवितेतून त्याचे प्रत्यंतर येते. ते आईचे ऋण मान्य करून आईला विचारतात की,"असा तुला कोणता परिस मिळाला होता की,ज्याने तू लोखंडाचे सोने केलेस"तू कष्ट उपसलेस,तेढ्या वागणूकी सहन केल्यास,शब्दांचे प्रहार झेललेस पण तुझ्या चेहऱ्यावरची प्रसन्न शांतता कधी नष्ट झाली नाही.

**"आई गेली याचा अर्थ एवढाच
ती घरीदारी नाही मातीच्या कणाकणाशी तद्रूप
होऊन आई विशाल झालीय आणि आकाश
आपल्या अलक्ष हातांनी तिला झेलून वेंगून
राहिलेय..... (दर्पणाचे दीप)**

शंकर रामाणी यांच्या आईचं आकाशाशी जडलेले बावनकशी नातं जाणीव नेणीवेच्या पलिकडचं असचं आहे. आई गेली ते स्वतःशीच पुटपुटले.मातीला माती मिळाली.डोळ्यातून एकही अश्रू आला नाही.एकमात्र खरे की,आकाश मेघाळून आले होते.अवेळी पाऊस आला .तेव्हापासून कवी आकाशाकडे पहात नाही.

**"त्याच रात्री आम्ही पाचांनी एकमेकास बिलगूनी
आईची मायाच समजून घेतली चादर ओढून
आधीचे नव्हतेच काही आता आई देखील नाही
अश्रूंना घालीत अडसर जागत होतो रात्रभर
झालो पुरते कलंदर " (ऐसा गा मी ब्रह्म)**

नारायण सुर्वेची "माझी आई" वेगळी आहे.
ती कारखान्यात काम करणारी कामगार आहे.आपल्या कामावर तिची निष्ठा आहे.दसऱ्याच्या आदल्या दिवशी पाचही जणांना आरास बघायला घेवून जाई. भिंगऱ्या,पेपेटे घेऊन देई.
एक दिवस काय झाले ,तिला गाडीतून आणले .तिचे डोळे उघडे होते.तोंडातून भळभळा रक्त येत होते.आई



कायमची निघून गेली होती.

**" आई नसतांना आता शेतावर फिरतांना
डोळे उदास होतात कडूलिंबाचं झाड वाळून
सुरकत्या पडलेलं तिचं रानातलं गणगोत
झाडालगत कुठे दिसत नाही शिंकाळीची
दोरी,कुठे मुग्यांच्या वाटा नाहीत"
(मौज दिवाळी अंक २००४)**

" आईच्या आठवणी "या कवितेत कितीही ऊन असलं तरी शेतात काम करणाऱ्या ना.धो. महानोर यांच्या आईच्या आठवणी आहेत.वैशाखी उन्हात आई दूरच्या कोरडीच्या शेतात टोपलीत भाकरी,तिचं विळा खुरपं, मातीच्या घड्यात थोड पाणी घेऊन जायची. शेतात तिचा गोतावळा तिच्या भोवती जमा होत असे. धावाधाव करीत दोन कुत्रे यायची. आई त्यांना थोपटीत जवळ बसवून घ्यायची. दोन भाकरीचे तुकडे त्यांना भरवायची. तेल चटणीची भिजलेली भाकरी काढून मुग्यांना टाकायची. शिंकाळी बांधलेल्या मडक्यात थोडं पाणी घालायची.

**हळूवार चोचीनं चिमण्यांचा थवा
पाणी प्यायचा.आई भोवती असं**

गणगोत जमा व्हायचं. भरल्या पोटानं पार हुरळून जायाचं. तेव्हा आईच्या डोळ्यात कोरड्या रानात ही आनंद असायचा.दिवस निघून गेले वाऱ्यावर. आजही आईच्या आठवणींचा पांघर कवीच्या पापण्यांच्या काठावर आहे. आईपणाची कालप्रवाहाप्रमाणे बदलत गेलेली रूपं आपणास कवितेतून अशी भेटत राहतात. ही रूपं अंतर्मुख करणारी अशीच आहेत. 'आई कसे उजविलेस तू जीवनव्रत' हे आईपणाचे न सुटणारे कोडेच आहे. तर आईचं आकाशासारखं विशालपण मंत्रमुग्ध करणारं आहे.' आधीचे नव्हतेच काही,आता आईदेखील नाही. 'ही आई नसण्याची जाणीव करूणार्त अशीच आहे. तर कधी आई कवितेच्या रूपानं अवती भवती आहे असेही सातत्याने वाटत राहते.कधी आईच्या आठवणींचा पांघर कवीच्या पापण्यांच्या काठावर रेंगाळत असतो. आई असते तेव्हा तिचे असलेपण जाणवत नाही.नसते तेव्हा तिचा स्मरणगंध सभोवती दरवळत राहतो.कवितेत उमटलेले आईचे सर्वसाक्षी, सर्वव्यापी प्रतिबिंब मनातही प्रतिबिंबीत होते.

# महिलांनो, मुलींनो तुम्हीच व्हा तुमच्या संरक्षक



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**आज देशात महिलांच्या मुलींच्या बाबतीत तसेच अल्पवयीन मुलींच्या बाबतीत अन्याय अत्याचारांच्या घटना मध्ये दिवसेंदिवस वाढच होत चालली आहे. दररोज कुठे ना कुठे निर्भया सारखी अमानुष कृत्ये घडत आहेत. बलात्कार करून तिला जिवंत जाळणे, एकतर्फी प्रेमातून ऍसिड हल्ला घडवून आणणे यांसारख्या अनेक भयंकर प्रकार हे आजमितीस या समाज व्यवस्थेत डोके वर काढून केले जात आहेत. ज्या मातेच्या पोटी अशी क्रूर प्रवृत्तीची औलादी जन्माला येत असतात. अशा औलादी मुळेच कदाचित त्या मातेला ही आपण असली औलाद पैदासच कशी काय केली म्हणून पश्चाताप करून घेण्याची वेळ येत असेल ही परंतु कोणतीच आई आपल्या लेकरांना असा क्रूर पणा कर म्हणून सांगणारी या जगतावर सापडणार नाही.**

मानसिक संतुलन हलवून बसलेल्या कामवासनाच्या आहारी जाऊन ती ला भोगण्याची भोग प्रवृत्ती आत्मसात करणाऱ्या नालायक प्रवृत्तीच्या नराधमांना ती उपभोगणारी वस्तूच वाटून राहिली आहे का ? अशा या क्रूर प्रवृत्तीला वेळीच ठेचण्याची गरज आहे.अशा प्रकाराला पायबंद घालण्याची जबाबदारी ही तुमची आमची घरात राहणाऱ्या प्रत्येक सदस्याची होऊन बसली आहे.

सद्यस्थिती आपल्या पालकांनी आपल्या पाल्याला चांगले संस्कारित करणे हे एक महत्त्वपूर्ण आव्हान असून हेच चांगले संस्कार उद्याचा घडणारा बलात्कार थांबविणार आहे.आजची मुले ही उद्या त्याच मानसिकतेत तर जाणार नाहीत ना याची काळजी पालकांनी आजच घ्यायला हवी.मोबाईल ही रोजच्या वापरातील गरजेची वस्तु बनली असून तेवढीच ती घातक ठरत आहे.आज ज्या पालकांच्या कृपेने आपल्या पाल्यांच्या हातामध्ये मोबाईल दिले जात असतात तेच त्यास बिघडविणारे ही ठरत आहेत.आज उदभवलेली परिस्थिती ही उद्या बदलायला हवी.त्यासाठी पालकांनी आपल्या मुलांवर चांगल्या संस्कारांची जडण घडण ही शालेय वयातच केली पाहिजे.मोबाईल वेड्या झालेल्या मुलांना जेव्हा आपण हा मोबाईल वापरण्याची संधी उपलब्ध करून देत असतो.तेव्हा तो मोबाईल खरच आपल्या पाल्याच्या दृष्टीने चांगला उपयुक्त ठरतो आहे का याचा विचार पालकांनी केला पाहिजे.अनेक चांगल्या वाईट गोष्टी मोबाईल च्या माध्यमातून दृष्टीस नजर पडत असतात.अशा वेळी नको त्या व्हिडिओ वर आपोआपच क्लीक केले जाते आणि त्यातून हव्यास निर्माण झाला की जे घडायला नको तेच घडत असते.हे कळत नकळत आणि मनावर ताबा न ठेवल्या मुळे घडून ही जाते. अल्पवयीन मुलाकडून अल्पवयीन मुलीवर अत्याचार घडणारा प्रकार आपल्या समोर येत असतो.तीच सवय मोठ्या पणी ही जात नसते.हे बलात्काराचे सत्र असेच सुरू राहते.त्यासाठी मुलांना दिलेला मोबाईल एखाद्याचं आयुष्य तर उद्धवस्त करणार नाही ना याचा पालकांनी विचार केला पाहिजे.मोबाईल मुळे अनेक संपर्क वाढत जाऊन त्यातून ही बलात्काराच्या घटना उदयास येत असतात.

प्रेमाच्या जाळयात अडकत गेलेल्या मुलीला आमिष दाखवीत बलात्कार ही केला जात असतो.अशा वेळी खूप मोठी फसगत होत असते. म्हणून मुलीनी ही जवळीकता सह विशेष दक्षता घेणे महत्वाचे आहे. मुलींनी स्वतः एक अन्यायाला लढणारी आणि आलेल्या कठीण प्रसंगाशी लढणाऱ्या मानसिकतेची बनली पाहिजे.निर्भया तू निर्भय पणे पुढे होऊन सक्षम लढायला हवे आहे. स्वतःचे रक्षण स्वतःला करण्यासाठी स्वतः मध्ये आपल्यावर होत असलेल्या अन्यायावर मात करण्यासाठी स्वतःमध्ये स्वसंरक्षणाची क्षमता निर्माण करायला हवी.हे समाजव्यवस्थेत जन्माला आलेले हैवान आहेत.यासाठी तुला स्वतःला सामना करायला हवा.कारण ही प्रवृत्ती कधी कोठे जन्माला येईल हे काही सांगता येणार नाही.हल्ली नात्यावर ही विश्वास उडत चालला आहे.नात्याला काळिमा फासणाऱ्या घटना ही हल्ली या समाज व्यवस्थेत घडत आहेत.त्यामुळे प्रत्येक ठिकाणी सावधानता बाळगायला हवे.तू जिथे असेल तिथे तुला तुला स्वतःला आपल्यावर कुणी वाईट हेतुने पाळत तर ठेवत नाही ना हे वेळीच ओळखले पाहिजे.त्या पासून दूर राहिला पाहिजे.

आज प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रत्येक महिलेने मुलीने तिच्या स्वतःच्या हिमतीवर उंच भरारी घेतली आहे आज तिला कमविण्याची स्वतःच जीवन जगण्याची नवी उर्मी भेटलेली आहे.परंतु पुरुषत्वाच्या मर्दांगी समोर तिला सामना करीत असताना ती कमजोर बनत चालली आहे



तिच्यावर अवतीभवतीचा परिसर कामावर ये जा करीत असताना तिच्यावर अनेक वाईट नजरा पडत असतात.परंतु तिची नजर लाजत काजत खालीच बघत तिच्या पायाची पाउले ही पुढेच पडत असतात. सर्वकाही तिच्या नजरेला दिसत असतं.परंतु आपण भलं आणि आपलं काम भलं असं म्हणत तिकडे लक्ष न देता ती स्वतः च नित्य नेमानेच काम करत असते.दुर्लक्षित झालेल्या नजरेनेला तिथल्या तिथे जाब न विचारल्यामुळे अनेक वाईट नजरा ह्या तिच्याकडे पाहण्याचं धाडस करत असतात.

तिची अडवणूक करून जबरदस्ती करण्याचे धाडस करतात.त्यामुळे कुणाची ही भीती न बाळगलेल्या अशा नालायक व्यक्तींकडून महिलांवर मुलींवर वाढलेले अन्याय अत्याचार अतिशय भयंकर लाजिरवाणे स्वरूपाचे ठरत आहेत.रोज कुठे ना कुठे देशाच्या राज्याच्या काना कोपऱ्यात, गल्ली बोळात महिलेवर अत्याचार घडतच आहेत.यंत्रणेच्या नावाने शिव्या शाप देणे आंदोलने मोर्चे काढले जात आहेत.परंतु त्याचा परिणाम अत्याचार करणाऱ्यावर काहीच होत नाही.महिलांना मुलींनी स्वतः याबाबत जागरूक राहिला पाहिजे. कारण जे थांबलं पाहिजे ते कोठेच थांबताना दिसत नाही.मला या परिस्थितीत कुणाकडून धोका आहे का हे स्वतः जाणले पाहिजे. वाईट नजरांना इशाऱ्यांना वेळीच ठेचलं पाहिजे.८ मार्च हा सर्वत्र महिला दिन साजरा केला जातो.महिला संरक्षणासाठी जबाबदाऱ्या घेण्याच्या अनेक बाता महिला दिनी मंचावरून मारल्या जातात.परंतु एखाद्या महिलेवर न्याय मिळवून देण्यापेक्षा अत्याचार करणाऱ्या व्यक्तीलाच सोडविण्याचाच प्रयत्न केला जातो.त्यात हल्ली कोणत्या जातीतील महिलेवर मुलीवर अन्याय अत्याचार घडला हे समाज व्यवस्था ही बघत असते. त्यानुसार आवाज उठवायचा की आवाज दाबायचा हा ही प्रकार आमच्याच समाजव्यवस्थेत घडतो आहे.आता महिलेने कमजोर होता कामा नये.महिलाच महिलेची रक्षणकर्ती होऊ शकते.कारण एक महिलाच दुसऱ्या महिलेचे दुःख जाणून घेऊ शकते.महिला संघटनातून स्वतःची ताकद तयार करा.महिलांनो, मुलींनो, निर्भया हो तुम्हीच व्हा तुमचे संरक्षक....!

# महिलांचा विकास मोजण्याचे मापदंड काय ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**महिलांच्या सन्मानासाठी जागतिक महिला दिन आठ मार्चला साजरा करण्यात येतो. या दिवशी महिलांच्या विकासासाचा लेखाजोखा सुद्धा मांडला जातो. परंतू मुळ मुद्दा हा आहे महीलांचे विकास मोजण्याचे मापदंड नेमके काय आहे. महिलांचा विकास झाला की नाही. झाला तर किती झाला. हे कसे ठरवायचे? देशातील अनेक देशात महिलांची स्थिती दुय्यमच होती परंतु आजही काही देश भारतीय महीलांना काही देश मागास समजतात आणि भारतीय लोकही काही देशातील महिलांना मागास समजतात. आता हे नेमकं ठरवायचे कसं? आपापल्या मतानुसार आपण ठरवणार का? आपण आपल्या देशांतर्गत महिलांचा विकास कसा झाला हे कसे ठरवायचे?**

अमेरिकेमध्ये महिलांना पुरुषांप्रमाणे पगार मिळत नव्हता म्हणून त्या रस्त्यावर येतात आणि आंदोलन करतात तर त्या कार्याचा गौरव म्हणून आज जागतिक महिला दिन साजरा करण्यात येतो. परंतु महिलांचा गौरव व सन्मान महिला दिनीची नाही तर रोज व्हायला पाहिजे. महिलांचा सर्वांगीण विकास व्हायला पाहिजे. आता ह्या गोष्टी सर्व ढोबळमानाने व तात्विक बरोबर असल्या तरीही बारकाईने आणि वास्ताविक महिलांचा सन्मान व विकास कसा मोजायचा किंवा तो कसा करायचा याला काही मापदंड आवश्यक असतात. जर मापदंडा मध्ये तंतोतंत आपल्याला महिलेचा विकास बसवता येत नसेल तर काही अडचण नाही परंतु विकास मोजण्याचे दिशादर्शक तरी असायला हवे. अमेरिकेतील महिलांना पुरुषांप्रमाणे एकाच कामाचा मोबदला मिळत नव्हता म्हणून त्या विरोधात आवाज उठवला जातो परंतु भारतीय महिलांना कोणत्याही प्रकारचे संविधानाच्या अगोदर हक्क अधिकार नसतानाही संविधानाने मात्र समान वेतन, समान मत, समान दर्जा, समान संधी या सर्व गोष्टी दिल्या मग प्रश्न येतो हे दिल्यानंतर महिलांचा विकास झाला का ? जागतिक महिला दिन ज्या उद्देशासाठी साजरा केला जातो तो उद्देश साध्य झाला का ? याचे जर उत्तर नाही असेल तर आपण तो कसा करायचा हे बघने आवश्यक आहे. आणि त्या साठी योग्य दिशादर्शकाची गरज असते. भारतात स्त्रियांना स्त्री म्हणून ओळखही नव्हती तर हक्क अधिकार खुप दूरच्या गोष्टी होत्या. स्त्रियांना डोक्यारचा पदर खाली पडू देण्याचा अधिकार नव्हता, चौकट ओलांडून बाहेर जाण्याचा, मत व्यक्त करण्याचा, माणसासोबत जेवन करण्याचा कोणताही अधिकार नसताना आज भारतीय महिला प्रत्येक क्षेत्रात आपले वर्चस्व गाजवत आहे. प्रत्येक क्षेत्रात ठसा उमटवून एक इतिहास घडवत आहे. जगात कुठे च महिलांची अवहेलना झाली नसेल त्या पेक्षा कितीतरी पटीने आपल्या देशात अवहेलना झाली स्त्रीवर अनेक बंधने लादून तिला माणसिक व शारिरीक गुलाम बनवले होते. आजची परिस्थिती पुर्वीच्या परिस्थिती पेक्षा खुप म्हणजे खुपच वेगळी असुन महिलेला मानवाचा दर्जा मिळून सर्व नैसर्गिक व सार्वजनिक सुख सुविधा आणि मानवी हक्क अधिकार बहाल करण्यात आले. मग भारतात महिलांचा एवढा संघर्षमय इतिहास असताना, महिलांना दुय्यम हिन तुच्छ लेखले गेले असताना आज मात्र मुक्त पणे देशात व देशाबाहेर आकाशाला गवसणी घालणाऱ्या भारतीय स्त्रीया आहेत तरीही भारतीय स्त्री च्या नावाने महिला दिन साजरा का साजरा झाला नसेल ? पुरुषांप्रमाणे पगार मिळत नाही म्हणून अमेरीकेतील महिला रस्त्यावर येऊन आंदोलन करतात एवढ्या त्या जागृत आहेत. मग भारतीय महिला जागृत आहेत का असा प्रश्न केला तर अपवाद वगळता भारतीय महिला जागृत नाहीत. देशहीत समाजहीत व विज्ञानवादापासुन अजूनही भारतीय महिला खुप दुर आहेत. महिला शिक्षीत झाली, नोकरी व्यवसाय करून पैसे कमवू लागली, अभिव्यक्त होऊ लागली, पुरुषांप्रमाणे क्रीडा कला साहित्य क्षेत्रातील पाय जरी ठेवत असली तरीही



भारतीय महिला जागृत नाही. आणि शिक्षण व पैसा महिलेचा विकास किंवा सन्मान दाखवत नाही तर विकास व सन्मानाकडे जाण्याचा रस्ता दाखवण्याचे काम शिक्षण आणि पैसा करत असते. विदेशात महिलांना मताधिकारासाठी रस्त्यावर उतरावे लागले, समान पगारासाठी रस्त्यावर उतरावे लागले आणि भारतीय महीलांना दोन्ही गोष्टी मोफत कोणत्याही आंदोलना शिवाय मिळाल्या आहेत, हक्क अधिकार आणि मानवी स्वातंत्र्य न मागता मिळाले. आणि हे सर्व महिलांना संविधानाने दिले. महिलेला देशाचा राजा संविधानाने बनवले असताना महिलांना याची जाणीव नाही, संविधान व हक्क अधिकारा विषयी जागृत नाहीत, संविधानाची व महिला हक्क अधिकाराची पायमल्ली झाली तरी राजकीय वलय वगळता महिला एकही शब्द बोलत नाहीत. महिलांना सक्षम निर्भिड व मानवी स्वातंत्र्य देणाऱ्या संविधानाप्रती आत्मीयता नसेल, संविधानाची जाणीव नसेल आणि संविधान समजून घेण्याची ईच्छा नसेल तर अशा महिलांना जागृत किंवा विकसीत महिला म्हणायचे का ? भारतामध्ये महिलेला देवी म्हणून पुजले जाते परंतु खऱ्या खुऱ्या महिलेवर आजही बलात्कार, कामाच्या ठिकाणी, राहायच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार घडतच असतात. आणि यातही विषेश म्हणजे महिलेवर बलात्कार हे प्रत्येक क्षेत्रामधील नराधम करतात. राजकारण, धर्म, नोकरदार, आणि समाज. परंतु महिला फक्त राजकारणाचे वलय घेऊन इतर धर्मातील व्यक्ती ने बलात्कार केला असेल तर त्याला कठोर शिक्षा व्हायला पाहिजे म्हणून कोणत्याही एखाद्या पक्षाच्या बँनर खाली एकत्र येऊन राजकीय पक्षाचे हित साध्य होईल असे काही आंदोलन करतात परंतु स्वधर्मिय स्वयघोषीत आसाराम सारख्या भोंदु आणि बलात्कारी लोकांसाठी याच महिला रस्त्यावर उतरून बलात्कारी लोकांना समर्थन देतात. जात धर्म बघुन बलात्कारी लोकांचे समर्थन वा विरोध करणे महिला जातीला तरी शोभणारे नाही. कारण बलात्कार हा महिलेवर होत असतो तो जातीवर किंवा राजकारणावर होत नाही. म्हणून महिलेवरील बलात्काराचे समर्थन किंवा बलात्कारी लोकांना वाचवण्यासाठी महिला जर रस्त्यावर येत असतील तर महिलेचा कोणता विकास गृहीत धरायचा. फार कमी महिला ज्याला आपण अपवादात्मक म्हणतो अशाच महिला विकसित व पुढारलेल्या आहेत बहुतांश महिला आजही धर्म अंधश्रद्धा याच्या नावाखाली अज्ञान जोपासले जाते.

अज्ञान जोपासणाऱ्या किंवा धर्माच्या नावाला ढाल बनवून अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या महिलेंचा समावेश विकसित किंवा मागास यापैकी कोणत्या गटात करावी ? महिला दिन साजरा करताना नेमका कोणत्या बाजु तपासायला पाहिजे म्हणजे म्हणजे महिलेचा विकास झाला असे म्हणता येईल तर कोणताही विकास झाला तर त्याचा फायदा देशहितासाठी होत असत. अंधश्रद्धा, पाखंड जोपासून त्याला भावनेशी जोडणे हे तर कोणत्याही विकासाच्या चौकटीत बसणार नाही. आपल्याला महिलांच्या विकासासोबत जर देश हित साध्य करायचे असेल तर आपल्याला महिला विकास मोजण्याचे दिशादर्शक ठरवून महिला विकास दरवर्षी तपासण्याची गरज आहे. जोपर्यंत आपण महिलेचा विकास करू शकणार नाही तोपर्यंत आपल्या देशाचा विकास शक्य नाही हे सत्य आहे. म्हणून आपण जर महिला दिन साजरा करतोय तर महिला विकास त्यांच्या मध्ये येणाऱ्या अडचणी व त्या दूर करण्याचे उपाय शोधून महिलांचा वस्तुनिष्ठ विकास यावर भर दिला तर नक्कीच महिला विकासाचा फायदा देशाला नक्की होईल.

# एक दिवसाचा महिला दिन ?

आधुनिक केसरी

तिनेच घडवायचं तिनेच वाढवायचं
तिनेच हसवायचं अन
तिनेच रडवायचं तिच्याविना
जगण्याला खरंच
अर्थ काही उरणार का ?
एक दिवसाचा महिला दिन
तिच्या मातृत्वा पुढे पुरणार का ?
तिने सारंच सहन करायचं,
घरट्यासाठी मर मर मरायचं,
गरमागरम वाढून ताटात.
शिळंपाकं तिला उरायचं.
तिच्याविना आनंदाचा एक
दिवस तरी सरणार का ?
एक दिवसाचा महिला दिन
तिच्या त्यागा पुढे पुरणार का ?
तिने समाजासाठी झटायचं
केवळ सुख अन सुखच वाटायचं
एवढं सारं करून सुद्धा
तिला विकृतीनेच का गाठायचं
तिच्या सुरक्षित जगण्यासाठी
एक दिवस तरी उरणार का ?
एक दिवसाचा महिला दिन
तिच्या शक्तीपुढे पुरणार का ?
आता दिवस नाही साल व्हावेत
ना कधी नशिबी हाल यावेत
ती सन्मानाने जगण्यासाठी
आता लाखो हात ढाल व्हावेत
मग बघा ती रणरागिणी पुन्हा कधीही
हरणार नाही प्रत्येक दिवसाचा महिला
दिनही तिच्या कर्तृत्वापुढे पुरणार नाही

कवी - सागर ननावरे ,पुणे

# 'ती'

आधुनिक केसरी

तिचे पाय गाडले गेले होते
व्यवस्थेच्या खोल दरीत मनगटाला
होत्या बंधणाच्या गच्च शृंखला
तोंडावर मौनाचा सदैव खडा पहारा
'ब्र' उच्चारण्याची नव्हती हिम्मत
साजशृंगारालाही होती कडेचोट
बंदी शेजेपूरतंच चोरटं स्वातंत्र्य..
बाकी अभिव्यक्त होण्याचे सर्वच
दरवाजे कायमस्वरूपी बंद तिच्या
मूक वेदनेची ही आर्त किंकाळी
घुमली धुरिनांच्या कानात........
ठिणगी पडली, यल्गार पेटला
प्रतिगाम्यावर आसूडाचे
वळ उमटले पुरोगामीत्वाची पहाट
उगवली शिक्षणाची कवाडे
उघडली तिच्या दास्यमुक्तीचा
कैवार घेतलेले मोहनराय, कर्वे,
फुले, आंबेडकर खऱ्या अर्थानं
मसीहा आणि हिरो ठरले..
त्यामुळंच उंबऱ्यात अडलेलं
तिचं पाऊल हिमतीनं पुढं पडलं
चार अक्षरं शिकता आली 'स्व' ला ओळखता
आलं पारतंत्र्याची, गुलामीची जाणीव झाली
अंगार होऊन, प्रस्थापितांनी काबीज केलेलं
एकेक क्षेत्र हक्कानं हिसकावून घेत
बंडाची पेटती मशाल हाती घेऊन
निडरपणे जागल्याच्या भूमिकेत
ती राबते आहे पुढच्या सक्षम पिढ्यांसाठी

-भानुदास धोत्रे
परभणी
7972625086

# महिला दिन एकच दिवस साजरा करायचा का ?



प्रशांत जा. खामकर
९९७०४२३२०४

आधुनिक केसरी

**इतिहास सांगतो आमुचा स्त्रीनेच शत्रू तुडविला, जिजाऊने राजा शिवछत्रपती घडविला; महाराणी ताराबाईने स्वराज्याच्या भूमीत औरंगजेब रडविला; सावित्रीने स्त्री शिक्षणाचा वसा फुलविला. खरोखरच आई,ताई ,पत्नी, मावशी, आत्या,मामी, बहिण अशा विविध भूमिका समर्थपणे सांभाळण्याचे काम स्त्री करीत असते. पूर्वीच्या काळी मातृसत्ताक पद्धती असलेल्या भारत देशामध्ये मध्ययुगीन काळात स्त्रियांची परिस्थिती दयनीय झाली. बालविवाह, पुनर्विवाह करण्याला बंदी, बहुपत्नीत्व, राजपूत महिलांकडून होणारे जोहर, देवदासी सारख्या अनिष्ठ प्रथा यांद्वारे स्त्रीच्या शोषणाला सुरुवात झाली. पडदा पद्धती येऊन महिला पडद्याआड कैद झाल्या.**

अनेक महिलांनी परिस्थितीशी संघर्ष करून मध्ययुगीन कालखंडामध्ये राजकारण, समाजकारण, साहित्य, शिक्षण व धर्म या क्षेत्रात सन्मान जनक कामगिरी केली. शिवबापासून छत्रपती शिवाजी महाराज घडविण्याचा प्रवास म्हणजेच मासाहेब जिजाऊ होय. वडिलांच्या निधनानंतर निजामशाही वाचविण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न करणाऱ्या रजिया सुलताना होत्या. गोंडवनची राणी दुर्गावती, राणी नूर जहान या महिलांनी पराक्रम गाजविला. केवळ चूल आणि मूल एवढ्यावरच बहुजन समाजातील स्त्रियांचे भाव विश्व होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला होता. ब्रिटिश राजवटीत स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा होऊ लागली. महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. विधवांचे पुनर्विवाह घडवून आणले. शिक्षणाची द्वारे खुली झाल्यामुळे महिलांच्या पंखांना बळ प्राप्त झाले. राजाराम मोहन रॉय यांच्या प्रयत्नांमुळे सतीची प्रथा बंद झाली. स्वातंत्र्याच्या चळवळीमध्येही अनेक स्त्रियांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. राणी लक्ष्मीबाई, सरोजिनी नायडू, विजयालक्ष्मी पंडित, प्रीतीलता वड्डेदार, सुचिता कृपलानी, कस्तुरबा गांधी यांसारख्या अनेक महिला स्वातंत्र्यसैनिकांच्या साथीमुळे भारत स्वतंत्र झाला.

स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहून विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी हिंदू कोड बिल मंजूर केले. त्याद्वारे स्त्रीला वडिलांच्या व पतीच्या संपत्तीमध्ये अधिकार प्राप्त झाला. स्त्रियांना हक्काची प्रसूती रजा प्राप्त झाली. 'समान काम,समान दाम'. असा कायदा मंजूर झाला. तरीही पुरातन विचारसरणीमुळे व सामाजिक व्यवस्थेमुळे महिलांना मिळालेल्या या संधीचा फायदा घेता आला नाही.



इंदिरा गांधींच्या रूपाने स्त्रीला सन १९६६ साली देशाचे नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाली. किरण बेदी देशातील प्रथम महिला आयपीएस झाल्या. सुचिता कृपलानी, कमलजीत संधू, बछेंद्री पाल, प्रतिभा पाटील,सिंधुताई सपकाळ यांनी पुरुषप्रधान विचारसरणी झुगारून देऊन आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर इतिहास घडविला. आज एकविसाव्या शतकात महिला कोणत्याही प्रकारे पुरुषांपेक्षा कमी नाहीत. घराच्या चार भिंतीमध्ये स्वतःचे आयुष्य बंद न करता त्यांनी आपले भाव विश्व विस्तारले आहे. कराटे, कुस्ती, जुदो यांसारख्या पुरुषी खेळ प्रकारांमध्ये स्त्रियांनी स्वतःचे सामर्थ्य दाखवून दिले आहे. आज स्त्रीया आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनलेल्या आहेत. असे असतानाही आजही पुरोगामी विचारांच्या भारतामध्ये स्त्रियांवर अत्याचार होण्याच्या घटना घडतात. हुंडाबळी सारखी घटना घडते की, ज्यामध्ये सासूच मुख्य गुन्हेगार असते. प्रेमाची किंमत म्हणून याच स्त्रीच्या शरीराचे तुकडे-तुकडे केले जातात. त्याला लव जिहाद नाव देऊन स्वार्थी व्यवस्था आपली पोळी भाजून घेते. विनयभंग,बलात्कारासारख्या घटना घडतात. महिलांवरील अत्याचाराचे निराकरण करण्यासाठी महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. तरीसुद्धा माणुसकीला काळीमा फासणाऱ्या स्त्री अत्याचाराच्या घटना घडतातच. केवळ स्त्री संरक्षणाचे कायदे करून भागणार नाही. त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. परस्त्रीला मातेचा दर्जा देणारी छत्रपती शिवाजी महाराजांची विचारसरणी समाजमनावर बिंबविणे गरजेचे आहे. केवळ एकच दिवस महिला दिनाच्या निमित्ताने महिलांचा आदर न करता;दररोज महिला दिन समजून महिलांच्या मानसन्मानाची जपवणूक केली पाहिजे.

# तशी लक्ष्मीही दूर गेली!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**भारतीय संस्कृतीत महिलांना अनन्य साधारण महत्त्व आहे. पौराणिक ग्रंथामध्ये स्त्रीचे गुणगौरव केलेले दिसून येते. "यत्र नार्यस्तु पुजंते, रमते तत्र देवता!" या पवित्र संस्कृत विधानाची आपल्याला आता खात्री पटली आहे. आपल्या देशात पुरुषसत्ताक पद्धती आहे, याचा बऱ्याच संधीसाधूंनी विपर्यास केला. स्त्रीला एक भोग्य वस्तू, डावी, गौण, अपशकूनी, अबला अशा आदी उपाध्यांनी तिचे श्रेष्ठत्व मलिन आणि दुबळे केले.**

तिच्या महात्म्याचे दर्शन किंवा अनुभूती एखाद्यालाच होते. हे आपण आज छातिठोक सांगू इच्छितो. महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. संपूर्ण विश्वाच्या पाठीवर इ.स.१९११ साली पहिल्यांदा जागतिक महिला दिन साजरा केला गेला. दिनांक २८ फेब्रुवारी १९०९ रोजी न्यूयॉर्क येथे पहिला महिला दिन साजरा करण्यात आला होता. तथापि सन १९१०च्या आंतरराष्ट्रीय महिला परिषेदत मांडलेल्या सुचनेनुसार ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून निश्चित करण्यात आला. भारतीय संस्कृतीत महिलांना अनन्य साधारण महत्त्व आहे. पौराणिक ग्रंथामध्ये स्त्रीचे गुणगौरव केलेले दिसून येते. "यत्र नार्यस्तु पुजंते, रमते तत्र देवता!" या पवित्र संस्कृत विधानाची आपल्याला आता खात्री पटली आहे. आपल्या देशात पुरुषसत्ताक पद्धती आहे, याचा बऱ्याच संधीसाधूंनी विपर्यास केला. स्त्रीला एक भोग्य वस्तू, डावी, गौण, अपशकूनी, अबला अशा आदी उपाध्यांनी तिचे श्रेष्ठत्व मलिन आणि दुबळे केले. परंतु तिच्या महात्म्याचे दर्शन किंवा अनुभूती एखाद्यालाच होते. हे आपण आज छातिठोक सांगू इच्छितो.

घरात जोपर्यंत स्त्रीचा वावर असतो, तोपर्यंतच त्या घरास घरपण असते. म्हातारे लोक म्हणतात त्याप्रमाणे ती देवता- लक्ष्मीच असते. त्या घरात तिच्या सहवासाने जीवंतपणा, शांती, प्रेम, वात्सल्य, दया, नम्रता, हे दैवी गुण ठासून असतात. स्त्रीविरहित घर एकप्रकारचे स्मशान असते. कोरोनाच्या जबरदस्त प्रादुर्भावात सन २०२१मध्ये माझी प्रेमळ पत्नी- आशाताई मरण पावली आणि माझ्या घराची आण, बाण व शान पुरती धुळिला मिळाली. कोना न कोना प्रसन्न वाटणारा तेव्हा अडगळ भासू लागला. सगेसोयरे, शेजारी व समाज यांच्या दरम्यान प्रचंड मोठी दरी निर्माण झाली. त्यांचे पाहुणे म्हणून येणे, बसणे, ऊठणे, हसणे, खिदळणे, बागडणे सारे काही हराम झाले. "अतिथी देवो भवः!" या सुवर्ण क्षणासाठी मन आतुर होऊ लागले.

ती माऊली गेल्यापासून घरातील शीतल साऊलीच हरपली, असे वाटत होते. घरात एका पाठोपाठ एक असे चार मांजरीचे पिल्लू पाळून पाहिले, मात्र तीनचार-तीनचार महिन्यांच्या अंतराने बिचारे मरतच गेले. आपणच महापातकी आहोत की काय ? अशी अपराधीपणाची भावना मनात घर करून बसली आहे. घराच्या वळचणीत, खिडकीत किंवा विजेच्या तारांवर आपले घरटे बांधून रोज आनंदाने चिवचिवाट करणारी चिमणीही तेव्हा दिसेनाशी झाली होती. घरात इकडून तिकडे व तिकडून इकडे दिवसात कितीतरी चकरा मारणारी चिचुंद्री पण दिसेल तर शप्पथ! इतका मोठ्ठा फरक आपण त्या घटकेला अनुभवला आहे, हे पांढऱ्या शुभ्र स्पटिकाप्रमाणे सत्य आहे. नेहमी ये-जा करत असणारे आपले अत्यंत काळजीवाहू नातलगसुद्धा ही स्मशान शांतता अनुभवत होते. एवढा फरक काही काळ- दोन वर्षे घरात एकही स्त्री नसल्याने पडलेला दिसला. यावरून आपण सूज्ञ वाचक स्त्रीचे श्रेष्ठत्व मोठे किती ? कसे ? आणि का ? याचा अंदाज अवश्य बांधू शकाल, यात तिळमात्रही शंका नाही! घरातली क्षुल्लकशी वाटणारी धुणे, भांडी, झाडलोट, स्वयंपाक, पाणी, आदी कामे उरकताना आपल्याला तारेवरची कसरत करावी लागत आहे. घरबांधणी, घराची मालकी, राशनकार्ड, स्वयंपाकाचे गॅस कनेक्शन आधी सगळी जडावजड जबाबदाऱ्या तिने लिलया पेलल्या होत्या. खरे तर हे सगळे करताना आम्हास रडू कोसळत होते आणि ३३ कोटी देव आठवू लागले होते. वेळेवर आम्ही बापलेक अंघोळ, स्वयंपाक, जेवण, कपडे धुणे कधी केले काय नि कधी ना केले काय ? विचारतो तरी कोण ? नेहमीचा "अंघोळ करा, जेवण करा..." असा कळवळ्याचा सज्जड दम विरला होता. काळ्याकुट्ट अंधारातही काना न कोपऱ्यातील चकाकणाऱ्या वस्तू राहू द्या, परंतु लख्ख सूर्य प्रकाशातील अंगण तर "सद्या घरात सर्व माणसे मृतप्राय शरीरेच" असल्याची स्पष्ट साक्ष देत होते. घराचे घरपण, घरसजावट किंवा घरांगण स्वच्छता आदी एका स्त्रीजातीशिवाय शेकडो माणसेही पाहिजे तशी ठेवू शकत नाहीत. हे आज आपण पावन आंतरराष्ट्रीय महिला दिन निमित्त प्रामाणिकपणे मांडणे, आपले अहोभाग्य समजतोय! यंदा दि.१० फेब्रुवारी २०२३ रोजी मुलगा- इंजि.दुर्वांकुर यांचा विवाह उरकून सून- पल्लवीताई लक्ष्मीच्या पावलाने घरात आली आणि आमचा जीव भांड्यात पडला. आता खुप प्रसन्न वाटत आहे.



भारतात मुंबई येथे पहिला महिला दिवस ८ मार्च १९४३ रोजी साजरा करण्यात आला. दि.८ मार्च १९७१ला पुण्यात एक मोठा मोर्चा काढण्यात आला होता. पुढे सन १९७५ हे वर्ष युनोने जागतिक महिला वर्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर स्त्रियांच्या समस्या ठळकपणे समाजासमोर येत गेल्या. स्त्रियांच्या संघटनांना बळकटी आली. बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीनुसार काही प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले, तशा स्त्री संघटनांच्या मागण्याही बदलत गेल्या. आता बँका, शाळा, महाविद्यालय व अन्य कार्यालयांमधूनही ८ मार्च साजरा होऊ लागला आहे. आजच्या काळात जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा होताना दिसून येतो. इ.स.१९७५ या जागतिक महिला वर्षाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याचे ठरविले. सन १९७७ साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या समितीने विविध सदस्यांना आमंत्रित करून ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांचे अधिकार आणि जागतिक शांतता या हेतूने साजरा करावा, असे आवाहन का बरे केले असावे ? क्रांतिसूर्य जोतीबा फुले, ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदींनी स्त्रीमुक्ती चळवळीत स्वतःला का समर्पित केले ? याचे कोडे आज आपल्याला उलगडले आहे, हे पुनः पुन्हा सांगणे न लगेच!

# वात्सल्य, मातृत्व, मांगल्य, आदिशक्ती



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**महिलांनी स्वतःच्या हक्कांसाठी जो लढा दिला त्याच्या स्मरणार्थ ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिवस म्हणून साजरा केला जातो. काय होता हा लढा? तर संपूर्ण अमेरिका, आणि युरोप सहित जवळपास जगभरातल्या स्त्रियांना विसाव्या शतकाच्या सुरुवाती पर्यंत मतदानाचा हक्क नाकारला होता.त्याविरोधात महिलांनी लढा उभारला होता,त्याच वेळी जर्मनीतल्या कम्युनिस्ट कार्यकर्ती क्लारा झेटकिन प्रभावित झाली.**

असा एखादा दिवस असावा, ज्या दिवशी जगभरातल्या महिला आपल्या मागण्यासाठी लढ्याचा निर्धार व्यक्त करू शकतील. अशी कल्पना मांडली. १९१० मध्ये कोपनहेगनला झालेल्या परिषदेत ८मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून ठराव पास झाला. पण भारतात मुंबई येथे ८मार्च १९४३ रोजी पहिला महिला दिन साजरा झाला. दरवर्षी जागतिक महिला दिवस मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. उत्साहात साजरा केला जातो. वर्षभरात ज्या ज्या महिलांनी काही विशिष्ट कार्य केले असते, जसे कला, क्रीडा, साहित्य, शिक्षण, सामाजिक , विशेष कार्य केले असते, विशेष प्राविण्य दाखवले असते,त्या महिलांचा सत्कार केला जातो. सन्मान केला जातो. अनेक संस्था व कार्यालयात महिला दिन साजरा केला जातो. महिला दिन असा निरनिराळ्या ठिकाणी साजरा होत असतानाच मनात अनेक प्रश्न उपस्थित होतात. ते अगदी सहज आहे. अनेक महिलांनी निरनिराळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे.सत्तेची पद भुषविली आहेत. त्यांना संधी दिली तर त्या काय करु शकतात हे दाखवून दिले आहे. आपले वेगळेपण सिध्द केले आहे. स्व. इंदिरा गांधी, स्व.सुषमा स्वराज्, श्रीमती प्रतिभाताई पाटील, सुमित्राताई महाजन, अशा अजूनही अनेक महिलांनी आपले वेगळेपण सिध्द केल आहे. उच्च पदावर त्या पोहचल्यात.

तर मेधा पाटकर, यांनी समाजिक कार्यात स्वःतला झोकून दिले आहे.किरण बेदींची प्रशासकीय कारकीर्द, पोलिस प्रशासनात,तिहार जेलमध्ये केलेल्या बदलाने उल्लेखनीय ठरली होती.मीरा बोरवणकर, सुधा मूर्ती आहेत. आजही राजकीय क्षेत्र बघितले तर,डॉं निलम गोरे, सुप्रिया सुळे,पंकजा मुंढे, प्रणिती शिंदे,पुनम महाजन, भावना गवळी, रक्षा खडसे, तर साधना गिरीश महाजन नगराध्यक्षा आहेत. तर रोहिणी खडसे खेवलकर ह्या जिल्हा बँक अध्यक्ष होत्या. या सारख्या महिलांनी राजकीय क्षेत्रात आपलं स्थान निर्माण केलय.अनेक लेखिका आहेत,शिक्षण क्षेत्रातील महिला आहेत, त्यांनी वेगळं स्थान निर्माण केलयं. आजही अनेक महिला प्रशासकीय सेवेत उच्च पदावर कार्य करीत आहेत.मुख्य सचिव, आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, तहसीलदार, गट विकास अधिकारी, नगर पालिका मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, बँक अधिकारी अनेक क्षेत्र आहेत.कुठलं क्षेत्र बाकी नाही. जुना इतिहास बघितला तर जिजाबाई, राणी लक्ष्मीबाई, आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले,अशी अनेक उदाहरणे देता येतील.महिलांनी एक वेगळा क्रांतीकारी ईतिहास घडवलाय. आनंदीबाई, सावित्रीबाईंनी स्त्रीशिक्षणाचा, स्त्रीमुक्तिचा पाया रचला.पुण्यात महिलांसाठी पहिली शाळा काढली.एकूण अठरा शाळा काढल्यात. आई सारखे दैवत साऱ्या जगा मध्ये नाही" किंवा "जिच्या हाती पाळण्याची दोरी,ती जगासी उध्दारी"असे म्हणतो. स्त्री म्हणजे वात्सल्य, स्त्री म्हणजे मांगल्य, स्त्री म्हणजे मातृत्व,स्त्री म्हणजे कर्तुत्व.आपण नेहमीच म्हणतो. पण- आता दुसऱ्या बाजूचा विचार बघीतला तर सध्या त्या जगाचा उध्दार करणाऱ्या, दैवत असणाऱ्या, ज्या स्त्री शक्तिची, मांगल्याची, नवरात्रात पूजा केली जाते. त्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे.तीनशे पासष्ट दिवसांत एक दिवस महिला दिवस साजरा करुन त्यांचा मानसन्मान केला जातो.बाकीच्या तीनशे चौसष्ट दिवसांचे काय ? हा महत्वाचा प्रश्न आहे. स्त्रिया किती सुरक्षित आहेत.रोजच वर्तमानपत्र उघडतो तर त्यात महिलांची शोषण, विनयभंग, बलात्कार, खून अश्या बातम्या असतातच. अगदी पाच-सात वर्षाचे मुलींन पासून तर साठ-पासष्ट वर्षांचे महिलांचा त्यात समावेश असतो. ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. समाजात, शाळेत, नोकरीच्या ठिकाणी,नातेवाईकात, प्रवासात, एकटी स्त्री किती सुरक्षित आहे ? मागील काळात घडलेली आंध्रप्रदेश मधील बलात्कार व त्यानंतर हत्या,विदर्भातील हिंगणघाटची घटना, औरंगाबाद, सिल्लोडची घटना,आणी मुंबई, साकीनाका, डोंबिवली,पुणे, नागपूर आदी ठिकाणी घडलेल्या बलात्काराच्या पाशवी घटना. एका स्त्री वर दहा जणं बलात्कार करतात. स्त्री अत्याचाराच्या घटना रोज वाचत असतो.

अशा अनेक आणि दररोज घडणाऱ्या स्त्रीअत्याचाराच्या घटना हे काय दर्शवितात ? अनेक कार्यालयात महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग सारख्या घटना घडतात, त्यांच शोषण होत,त्या घटना दाबून टाकल्या जातात.अनेक वेळा बायकांसारख्या बांगड्या भरल्या का ? म्हणून हिणवले जाते.हासुध्दा स्त्रियांचा अपमानच आहे.बांगड्या भरा..बांगड्या भरा..असा शब्द प्रयोग मागे एका दूरचित्रवाणी वरील चर्चेत केला होता,त्यावेळी सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांनी त्यांना खूपच कडक शब्दात फटकारले होते.पण असा सडेतोडपणा सगळ्याच महिलांजवळ नसतो,ज्याची आज गरज आहे. राजकीय क्षेत्रात तर राजकीय क्षेत्रातील महिला विषयी अर्वाच्य बोलणे वाढत आहे.स्त्रीचा अपमान तर होतोच पण शाब्दिक शोषणाचा प्रकार असे त्याला म्हणता येईल.त्यांनी ज्या भावनेने तो शब्दप्रयोग केला जातो तो चुकीचा असतो..स्त्रियांना अनेक भुमिकेतून जावे लागते,...माता..भगिनी..पत्नी ..मुलगी.त्या त्या वेळची जीवनातील भुमिका खऱ्या असतात.त्यात निष्ठा असते. तीच तर बांगड्या घालत असते..माता-भगिनी-पत्नी.तिची असे शब्दप्रयोगानी हेटाळणी करु नका.खऱ्या अर्थाने ती हिराँईन असते.

राज्यात महिला आयोग आहे.त्यांनी अशा घटनांची नोंद घेउन संबधितांवर कारवाई करणे अपेक्षित असते.पण राजकीय दबावामुळे काही होत नाही.घटनांना राजकीय रंग असतो.

बलात्कार, स्त्रीअत्याचाराचे घटनामध्ये कारवाईस विलंब होतो.काही वर्षे निघून जातात.त्या घटनेच गांभीर्य रहात नाही. हे आपण बघतोय. आंध्रप्रदेश सरकारने कँबिनेट मध्ये "दिशा"कायदा मंजुरी दिली,सात दिवसांत तपास, चौदा दिवसांत न्यायालयीन कामकाज, आणि एकवीसाचे आत आरोपीस मृत्यूदंड. ह्याच धर्तीवर संपूर्ण देशात असा कायदा लागू व्हावा,त्याने आशा घटनां वर जरब बसेल.

महाराष्ट्रात आता स्त्रियांच्या संरक्षणासाठी "शक्ती" विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर होऊन त्यावर राज्यपालांची सही झाली आहे. व ते पुढे राष्ट्रपतींची झाली.सही . कायदा पास होईल पण कायद्याची अंमलबजावणी होणे हे महत्त्वाचे आहे. असंख्य कायदे अस्तित्वात आहेत, परंतु त्याची काय परिस्थिती आहे हे आपण बघतोच.शक्ति कायद्याची सविस्तरपणे माहिती जनमानसात पोहचायला हवी.

दुसरा मोठा प्रश्न आहे स्त्रियांचे बाबतीत तो दुय्यम स्थानाचा. आणि राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा करुन घेतला जाणारा वापर.तसेच जाहिरात क्षेत्रात स्त्री देहाचा केला जाणारा वापर.

आता तो कसा केला जातो हे काय सांगायला हवे.

आपला उत्पादनाचा खप वाढवण्यासाठी, दूरचित्रवाणीवरील मालिकांमध्ये, जाहिरातीमध्ये, अंडरवियर, बनियान, अत्तर स्प्रे, कुठल्याही चित्रपट, नाटकांचे जाहिरातीसाठी स्त्री देहाचा नको तितका वापर, स्त्री देहाच्या नको त्या भागाच प्रदर्शन केलं जात. अर्थातच यात स्त्रियांचा दोषही आहेच. नाही म्हणून चालणार नाही. त्या स्वतःच अधःपतन करुन घेत आहेत. काही वर्षांपूर्वी दयावान चित्रपटात माधुरी दीक्षित ने स्नानाचे आणि बेडसीन दिला होता. अतिशय भडक आणि सेक्सी दृश्य.नंतर पश्चात्ताप झाला म्हणून म्हटले. अशे दृश्य व जाहिराती त्यांनी करायला नकोत. त्यात अमुलाग्र बदल आवश्यक आहे. स्त्री संघटनांनी, आयोगाने ह्याचेवर गंभीरपणे विचार करावा.



# वाळूचोरीच्या निषेधार्थ वाळवंटात होळी पेटवून आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** चंद्रभागेच्या पत्रामध्ये वाळू चोरी मुळे पडलेल्या खड्ड्यामध्ये कचऱ्याची होळी पेटवून महर्षी वाल्मिकी संघाच्या कार्यकर्त्यांनी चंद्रभागेतील वाळु चोरीचा निषेध करत, आज शिमग्या दिवशीच चंद्रभागेच्या वाळवंटात पेटवलेल्या होळीसमोर प्रशासनाविरुध्द बोंबाबोंब केली. सालाबाद प्रमाणे याही वर्षी महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने चंद्रभागेच्या पात्रामध्ये कचऱ्याची होळी करण्यात आली. यावेळी महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने चंद्रभागेतील पडलेल्या वाळूच्या खड्ड्यामुळे येणाऱ्या भाविकांना भरपूर त्रास होतो, अनेक भाविकांचा जीवही गेलेला आहे, आणि भविष्यामध्ये भाविकांचा जीव जाऊ नये यासाठी शासनाने ठोस पाऊल उचलली पाहिजेत. या गोष्टीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने वाळूत पडलेल्या खड्ड्यामध्ये कचऱ्याची होळी करून शासनाचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. आता तरी झोपलेल्या शासनाला जाग यावी वाळू चोरी चंद्रभागेतून कायमस्वरूपी बंद व्हावी यासाठी महर्षी वाल्मिकी संघाने हा उपक्रम हाती घेतला होता. शासनाला लवकरात लवकर जाग न आल्यास महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने तीव्र आंदोलन करू, असा इशारा महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी दिला आहे. यावेळी गणेश अंकुशराव, चंद्रकांत अभंगराव, गणेश तारापूरकर, महादेव कांबळे, सचिन नेहतराव, वैभव माने, चंद्रकांत माने, तुकाराम अंकुशराव, आप्पासाहेब करकमकर, बंडू नेहतराव, रोहन कांबळे, रोहन कांबळे, भैय्या माने व असंख्य भाविक व वासुदेव उपस्थित होते.



# कृषी स्वावलंबन योजनेअंतर्गत मंजूर विहिरीचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुका मौजे खांडी पिंपळगाव येथील किशोर कडूबा भालेराव यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेअंतर्गत नवीन विहीर मंजूर झाले असता सदरील विहिरीचे उद्घाटन करताना भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, माजी. उपसभापती दिनेश अंभोरे, रिपाई तालुकाध्यक्ष फकीरराव भालेराव, भाजपा ओबीसी सेलचे तालुका उपाध्यक्ष भागचंद जोनवळ, अविनाश वेताळ, खांडी पिंपळगाव जाफरवाडी चे सरपंच सज्जनसिंग झाला, माजी सरपंच दामोदर महालकर, सोसायटी संचालक प्रेमसिंग जोनवळ, सोसायटीचे माजी संचालक बबन भालेराव, पंचायत समिती कृषी विभागाचे विस्ताराधिकारी पाटील साहेब, मंजाराम बोरसे, कडूबा भालेराव, धोंडीराम भालेराव आदी यावेळी उपस्थित होते.

# मोलखेडा येथे बॅटरी व मशीन चोरट्यांनी पळविले

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा गेल्या अनेक दिवसांपासून विद्युत मोटारची बऱ्याच चोरी झालेल्या आहेत त्यात पुन्हा दि.२२/२/२३ रोजी शेतकरी गोपाळ नारायण पाटील गट नंबर ८३ मधून सोलर पेचिंग गार्ड चोरीला गेला होता अज्ञात चोरट्यां विरुद्ध फर्दापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
आज पर्यंत कोणत्याही चोरट्यांचा शोध लावण्यास पोलिसांना यश आले नाही. त्यात पुन्हा चोरट्यांनी संदीप शिवाजी पाटील यांचा बॅटरीक व मशीन दि.३/३/२३ रोजी चोरुन नेले आहे.शेतकरी संदीप शिवाजी पाटील सकाळी शेतात गेले असता बॅटरीक व मशीन चोरी झाल्याचे दिसून आले.चोरट्यांच्या टोळीने लांबविला.
आतापर्यंत मोलखेडा व हिवरी शिवारात बऱ्याच पंधरा ते वीस विद्युत मोटारची चोरट्यांनी चोरी केलेल्या आहेत चोरीची तक्रार शुद्धा फर्दापूर पोलिस ठाण्यात व सावळदबारा चौकीत दाखल करण्यात आलेल्या आहेत परंतु आतापर्यंत एकही विद्दूत मोटारींचा व सोलर पेचिंग गार्ड याचा तपास पोलिसांनी लावलेला नाही यामुळे या परिसरात चोरट्यांची चांगलीच दहशत निर्माण झाली आहे.चोरट्यांनी मोलखेडा,हिवरी शिवारात अनेक दिवसांपासून धुमाकूळ घातला आहे.
याबाबत विद्युत मोटारची शेतकऱ्यांनी सौर ऊर्जा पंप चोरीला गेल्याच्या अनेक तक्रारी सावळदबारा पोलिस चौकीला दिल्या आहेत.त्यानंतर आज पहाटे सौर ऊर्जा पंप चोरणारी टोळीने मोलखेडा शिवारात शेतकरी संदीप पाटील यांचे सौर उर्जाची ६० एम.पीआरची बट्रिक,१०० व्होल्टेजचे करंट मशीन चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास बॅटरीक व मशीन अंधाराचा फायदा घेऊन चोरट्यांनी चोरुन नेला.
सदर घटनेमुळे मोलखेडा शिवारात शेतकऱ्यांमधे भिंतीचे वातावरण तयार झाले आहे.अशी माहिती शेतकरी संदीप शिवाजी पाटील यांनी बोलताना सांगितले.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# बियर पिण्याच्या बहाण्याने केला युवकाचा खून

## उमरखेड येथील खुनाचा २४ तासात ऊलगडा, मारेकरी जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**



**यवतमाळ :** बाळदी रोडच्या आय. टी. आय. कॉलेजच्या मागे उमरखेड येथे जंगल परीसरात कुजलेल्या स्थितीत युवकाचा मृतदेह आढळला होता. शवविश्चेदन प्राथमिक अहवालानुसार चाकुचे घाव मारल्याने युवकाचा मृत्यू झाल्याचे समोर आले. उमरखेड पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपासचक्रे फिरवुन २४ तासाच्या आत या गुन्ह्याचा उलगडा करुन मारेकरी आरोपीला जेरबंद केले. बियर पिण्याच्या बहान्याने जंगलात नेवून चाकुने वार करुन युवकाचा खात्मा करण्यात आला. जुन्या वादातून ही घटना घडली असून, एक महिन्यापूर्वी या खुनाचा कट आखल्याची माहिती पोलीस सुत्रांनी दिली.

राहुल भगवान तपासे वय २२ वर्ष, नागापुर रुपाळा ता. उमरखेड असे आरोपीचे नाव आहे. गोपाल सुधाकर मिराशे रा. बाळदी असे मृतकाचे नाव आहे. १ मार्च पासून तो बेपत्ता होता. या बाबतची फिर्यादी अंकुश नारायण मिराशे रा. बाळदी यांनी उमरखेड पोलीस ठाण्यात दिली होती. दरम्यान ५ मार्च रोजी सकाळी बाळदी रोडच्या आय. टी. आय. कॉलेजच्या मागे उमरखेड येथे जंगल परीसरात चार दिवसानंतर कुजलेल्या स्थितीत युवकाचा मृतदेह आढळला. शवविश्चेदन प्राथमिक अहवालानुसार चाकुचे घाव असल्याचे निष्कर्श आल्याने अज्ञात आरोपी विरुद्ध अपराध क्रमांक १६० / २०२३ कलम ३०२ भादवी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. यावेळी मृतकाचे संपुर्ण शरीर बरेच प्रमाणात कुजलेले असल्याने तसेच घटनास्थळ मुख्य गावंपासुन साधारणतः ३ कि.मी. अंतरावर निर्जन स्थळ असुन प्रत्यक्ष साक्षीदार उपलब्ध होणे कठीन असल्याने गुन्हा उघडकीस आणन्याचे मोठे आव्हान पोलीसांपुढे उभे राहीले होते.

या गुन्ह्याचे गांभिर्य लक्षात घेवुन पोलीस अधिक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी घटनास्थळावर मिळालेले वस्तुजन्य पुरावे, मृतकाचे घर व कामाचे ठिकाणी लोकांची चौकशी सह सर्वतोपरी प्रयत्नांची पराकाष्टा करुन गुन्हा उघडकीस आणन्याबाबत निर्देश दिले. पोलीस स्टेशन उमरखेड तसेच स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी गुन्ह्याचा तात्काळ छडा लावण्याचे उद्देशाने पथके निर्माण करुन तांत्रिक माहितीचे आधारे तपासचक्रे फिरविली. आरोपी राहुल भगवान तपासे वय २२ वर्ष, नागापुर रुपाळा यास कसोसीचे प्रयत्न करून ताब्यात घेण्यात आले. यादरम्यान त्यास विश्वासात घेवुन विचारपुस केली असता आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली आहे. अशाप्रकारे २४ तासाचे आत अतिषय क्लिष्ट गंभिर गुन्हा उघडकीस आणन्यात पोलीस यंत्रनेस यश प्राप्त झाले आहे. सदरची कार्यवाही जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ. पवन बनसोड, अप्पर पोलीस अधिक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाडवी, पोलीस निरीक्षक प्रदीप परदेसी स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ, पोलीस स्टेशन उमरखेडचे ठाणेदार अमोल माळवे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन उमरखेडचे मसपोनि सुजाता बन्सोड, सपोनि प्रशांत देशमुख, पोउपनी अमोल राठोड, पोउपनी शिवाजी टिपुर्णे, पोउपनी चंदु चौधरी, पोहवा विजय पंतंगे, कैलाश नेवकर, संदीप ठाकुर, रोषण सरनाईक, नरेंद्र पुंड, राजु पवार, अतुल तागडे, दत्ता पवार, नितीन खवडे, हिम्मत बंडगर, नितेश लांडे, सुदर्शन जाधव, सुर्यकांत गित्ते, प्रविन वंजारे, स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ येथील सपोनि अमोल सांगळे, पोउपनी सागर भारस्कर, सुभाष जाधव, पंकज पातुरकर, सोहेल मिर्झा, मोहम्मद ताज, सुनिल पंडागळे, चालक दिगांबर गित्ते, सायबर सेल यवतमाळ तसेच सेवानिवृत्त स.फौ. दिपक कांबळे येथील तांत्रिक तज्ञांनी संयुक्तरित्या पार पाडली आहे.





# महालगाव परिसरात गहू, हरभरा, कांदा, मका पिकांचे प्रचंड नुकसान

## चांदेगाव येथे वीज पडून दोन गाईंचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**महालगाव :** राज्याच्या विविध भागात अवकाळी पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. वैजापूर तालुक्यातील महालगाव व परिसरात पावसाचा तडाखा बसला आहे. यात रब्बी पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. रात्री सुमारे 2 वाजेपासून जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊस पडला. यात शेतकर्‍यांच्या रब्बी पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. महालगाव सह चोरवाघलगाव, चिंचडगाव, शिरजगाव, माळी सागज, भगूर, वक्ती,पानवी, घोगरगाव, अव्वलगाव, नागमठाण, शनिदेव गाव,चेंडूफळ आदी गावांमध्ये पावसाचा जोर अधिक पहायला मिळाला. यामुळे शेतात सोगणीला आलेला गहू, हरभरा, पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले दोन दिवसा पासून पाऊस पडत आहे त्यामुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे सरकारने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. प्रशासनाच्या वतीने तत्काळ पंचनामा करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी परिसरातून केली जात आहे.

> अगोदरच खरीप हंगामातील पिकांना भाव नाही अवकाळी पावसाने खरिपातील पिकांचे नुकसान झाले होते त्यांचे पंचनामे देखील केले पण अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात एक रुपयाही मिळालेला नाही . अशातच रब्बी हंगामात वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने माझा तीन एकर गहू संपूर्ण आडवा झाला आहे पिकाचा त्वरित पंचनामा करून सरकारने मदत द्यावी . **दादासाहेब पवार प्रगतशील शेतकरी चोरवाघलगाव**

या पावसामुळे काढणीसाठी आलेल्या गव्हाच्या पिकांसह हरभरा, कांदा, मका पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक भागात सुरू असलेल्या या वादळी वाऱ्यासह पडणाऱ्या अवकाळी पावसामुळे उभं गव्हाचे पीक अक्षरशः आडवे पडायला सुरुवात झाली आहे. शेतकरी अडचणीत खरीप हंगामात चांगले उत्पन्न मिळाले नाही. जे मिळाले त्याला देखील चांगला भाव मिळालेला नाही. यात आता रब्बी हंगामात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान होत असल्याने शेतकऱ्याच्या अडचणीत आणखीवाढ झाली. वादळी वाऱ्यासह पाऊस पडल्याने चांदेगाव येथे विष्णू पवार यांच्या शेतात वीज पडून दोन गायी मरण पावल्या.

# गॅस दरवाढीवर कॉँग्रेसचा जनआक्रोश मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुका कॉंग्रेस पक्षाच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी 10 मार्च रोजी फुलंब्री तहसील कार्यालय वर जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. या जनआक्रोश मोर्चात सर्व शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे.तसेच पत्रकार परिषदेत म्हटले आहे की, शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे, कापसाला प्रतिक्विंटल 15 हजार रुपये भाव द्यावा, शेतकऱ्यांना पिक विमा मिळाला पाहिजे , अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांचे अनुदान तत्काळ द्यावे. नियमित कर्ज फेडणारे शेतकऱ्यांना शासनाने घोषित केलेले 50 हजार रुपये द्यावे. घरगुती गॅस सिलिंडरचे भाव कमी करावा अशा विविध मागण्यासाठी आंदोलन करण्यात येणार आहे. या प्रसंगी फुलंब्री तालुका कॉँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष संदीप बोरसे, सुदाम मते, संतोष मेटे, देविदास ढंगारे, बाबुराव डकले, अंबादास गायके , मुदससर पटेल यांच्या सह आदींची उपस्थिती होती.



# पैठणमध्ये गहू पिकाचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** एकीकडे धुळवडीचा उत्साह असताना दुसरीकडे संपूर्ण राज्यात विविध भागांमध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सोमवारी संध्याकाळपासूनच औरंगाबाद तालुक्यातील पैठण तालुक्यातील सर्वच भागांमध्ये अवकाळी पाऊस पडला. तसेच, ग्रामीण भागात अनेक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस झाला. नाशिक जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, २ दिवसांच्या अवकाळी पावसाने तब्बल आनेक हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. एकीकडे कांद्याचे भाव गडगडले असताना दुसरीकडे या पावसामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. ढगांचा गडगडाट, विजांच्या लखलखाटा पैठण तालुक्यातील विविध भागात अवकाळी पावसाचा तडाखा बसला. जोरदार सुटलेल्या वाऱ्यामुळे शेतात उभे पिक भुईसपाट झाले असून गहू, पिकांना मोठा फटका बसला आहे. त्यामुळे आता या शेतकऱ्यांसाठी प्रशासन काय पाऊल उचलते ? याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र Business Katta












राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र–कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९

चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष
Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking
आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे...
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा
तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल
४९८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...
कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य
तात्काळ बँकिंग सुविधा
रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू
कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा

# जिंतूरच्या विकासासाठी 30 कोटी मंजूर तर 20 कोटी अजून आणणार

## आ. सौ. मेघना साकोरे -बोर्डीकर

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** शहरांमध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सर्व कामाचे भूमिपूजन संपन्न झाले याप्रसंगी त्यांनी गेल्या अडीच वर्षांमध्ये केलेली विकास कामे आणि शहरासाठी देखील भरपूर प्रमाणात विविध विकास कामे मंजूर केली आहेत असे या निमित्ताने सांगितले. मागील पाच वर्षांमध्ये रस्त्यांची झालेली वाताहात आणि दर्जाहीन कामे यामुळे सर्वसामान्य जनतेला त्रास सहन करावा लागला असून यापुढील सर्वच कामे दर्जेदार होतील असा विश्वास या निमित्ताने त्यांनी सांगितला विरोधकावर सडकून टीका करत त्यांनी माझ्या बाबांनी कुणाकडूनही शेअर्स विकत न घेता स्वतःच्या हिमतीवर शेतकरी बांधवांसाठी साखर कारखान्याची उभारणी करून आज पर्यंत तब्बल 100 मेट्रिक टनाचं गाळप सुद्धा करून दाखवलं आणि हा कारखाना काही तांत्रिक बाबींमुळे केवळ आठ ते दहा दिवस बंद असताना विरोधकांनी स्वतःच्या कार्यकर्त्याला सोशल मीडिया मार्फत कारखाना कदापिही चालू होणार नाही सर्वांना सांगा असा संदेश देण्यासाठी धडपडत होता याने साधा डबरोटीचा कारखाना देखील सुरू करून दाखवला नाही आणि हे काय सर्वसामान्य जनतेला न्याय देणार किंवा सर्वसामान्य कार्यकर्त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत करणार. मी तरी फेसबुक आणि सोशल मीडिया याच्यामार्फत मतदार संघासाठी निवडून आल्यापासून केलेल्या विविध विकास कामांचा लेखाजोखा प्रत्येक वेळी आपल्यासमोर मांडत आलेली आहे. केवळ विकासाचेच राजकारण करण्यात मला आवड असून जिंतूर शहरवासीयांच्या आणि ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता, पदाधिकारी यांच्या आशीर्वादामुळेच आज आपल्यासमोर मी आमदार म्हणून उभी असून आपल्या मतदार संघातील सर्वसामान्य जनतेच्या विश्वासाला कदापिही तडा जाऊ देणार नाही असे या निमित्ताने भाषणामध्ये सांगितले. आज जिंतुर शहरात ३० कोटींच्या कामाचे भुमीपुजन संपन्न झाले यामध्ये प्रामुख्याने जिंतुर येथे सा.बां.विभागाच्या अधिकारी/कर्मचारी करीता निवासस्थानाचे बांधकाम करणे-७९६.२७ लक्ष, ग्रामिण रूग्णालय जिंतुर येथील निवासस्थानाचे बांधकाम करणे-४३२.८६ लक्ष, जिंतुर येथे सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे बांधकाम करणे-१७३.८८ लक्ष तर विश्रामगृहाचे विस्तारीकरण करणे-२३५.७० लक्ष, फाळेगाव-सेनगाव या रस्त्याचे रूंदीकरणासह कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे-१५०० लक्ष. या कामांचा समावेश आहे. यावेळी भाजपा तालुकाधक्ष लक्ष्मण बुधवंत, आदमाने मामा, पोलीस निरीक्षक वाघमारे, डॉ. रविकिरण चांडगे, उपअभियंता उमरेकर, शाखा अभियंता दिपक कुपटेकर, विनोद देशमुख, डॉ.विवेक थिटे, सचिन गोरे, गोपाळ रोकडे, डॉ.पंडीत दराडे, प्रदीप चौधरी, दत्ता कटारे, किशोर जाधव, संगीता जाधव, सुमन बार्शीकर, निर्मला बांडे, अखिल भारतीय ग्राहक पंचायत जिंतूर तालुका अध्यक्ष गुलाबराव शिंदे, भाजप प्रसिध्दी प्रमुख महाराष्ट्र राज्य प्रवासी संघटनेचे तालुकाध्क्ष सचिन रायपत्रीवार, सुनील घुगे, संदीप घुगे, विलास भंडारे, आदी जण उपस्थीत होते.



# छत्रपती संभाजीनगर जिल्हा संपर्कप्रमुखपदी ॲड. सर्जेराव साळवे

आधुनिक केसरी न्यूज



**मुक्ताईनगर :** शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर या संस्थेच्या वतीने नुकताच १४वा वर्धापन दिन मुक्ताईनगर येथे साजरा करण्यात आला. या वेळी ३५ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष डॉ शिवचरण उज्जैनकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत डॉ सतिश तराळ तसेच डॉ. प्रतिमा इंगोले या हजर होत्या. संस्थेचे सचिव प्रमोद पिवटे यांनी संस्थेच्या कामकाजाचा लेखाजोखा मांडला. त्यानंतर संस्थेतर्फे राज्य व जिल्हा स्तरावर पदाधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली. छत्रपती संभाजी नगरचे जिल्हा संपर्कप्रमुख म्हणून साहित्यिक, कवी ॲड सर्जेराव साळवे यांची नियुक्ती करण्यात आली. प्रमुख पाहुणे यांच्या उपस्थितीत संस्थेच्या वतीने नियुक्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात.

ॲड सर्जेराव साळवे यांचे सामाजिक क्षेत्रातील कार्य, आवड व शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनच्या उपक्रमातील सततचा सहभाग यावरून ही नियुक्ती करण्यात आली असल्याचे संस्थेच्या वतीने कळविण्यात आले. ॲड सर्जेराव साळवे हे छत्रपती संभाजी नगर येथील गणपतराव साळवे च्यारीटेबल फाउंडेशनचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या अनेक कविता, लेख प्रकाशित असून अनेक साहीत्य संमेलनात सक्रिय सहभाग नोंदवला आहे. त्यांनी अनेक वृक्षारोपण कार्यक्रम तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. कायदेविषयक जनजागृती व मोफत मार्गदर्शन या बाबतीत त्यांना अनेक संस्थांनतर्फे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांनी अनेक ठिकाणी कलामंचावर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून बेटी बचाव, अन्न वाचवा, वाचन चळवळ, भृणहत्या बंदी, क्यैंसर मुक्ती, व्यसन मुक्ती आदि विषयांवर प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर केले आहेत. त्यांच्या या निवडीबाबत सर्व थरातून, मित्रमंडळी व साहित्यिक मित्रांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कार्यक्रमाला डॉ सुभाष बागल, छ.संभाजी नगर, प्राचार्य डॉ पंढरीनाथ शेळके, बुलढाणा, महाराष्ट्रातील सर्व पदाधिकारी, अनेक नामांकित व्यक्ती, साहित्यिक नागरिक तसेच मोठ्या संख्येने महीला वर्ग हजर होते.या वेळी ॲड साळवे यांनी भृणहत्या विषयावर "आई मला तू जगात येऊ दे, आई गं माझा जन्म होऊ दे!" मी कविता सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती ताई राणे, जळगाव जिल्हा संपर्कप्रमुख यांनी केले तर गणेश कोळी यांनी आभार मानले.

# गॅस सिलिंडरच्या दरवाढीचा भडका अन् चुलीवर तडका

आधुनिक केसरी न्यूज



**सुलतानपूर :** केंद्र सरकारची प्रधानमंत्री गॅस उज्ज्वला योजना मोठा गाजावाजा करून सुरू करण्यात आली होती. पीएम उज्ज्वला योजनेच्या माध्यमातून सरकार दारिद्र्य रेषेच्या खालील कुटुंबांना घरगुतीगॅस (एलपीजीगॅस) कनेक्शन मोफत आले, त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांची चुलीच्या धुरापासून मुक्ती मिळाली खरी मात्र, त्या नंतर गॅस सिलिंडरच्या किमतीत भरमसाठ दरवाढ होऊ लागल्याने सर्वसामान्यांसह लाभार्थी त्रस्त झाले आहेत. लाभार्थ्यांनी दोन तीन वेळा उज्ज्वला गॅस योजनेचा लाभ घेतला असेल, मात्र, सिलेंडर संपल्यावर ते भरण्यासाठी पैसेच नाही. त्यामुळे गृहिणींनी पुन्हा चुलीकडे मोर्चा वळवला आहे.सध्या 'गॅस सिलेंडरच्या दरवाढीचा भडका अन् चुलीवर तडका' अशी म्हणण्याची वेळ लाभार्थ्यांना आली आहे, दर महीन्याला सिलेंडर घेणे आर्थिकदृष्टया अवघड जात आहे . यापेक्षा बिकट अवस्था केंद्र सरकारच्या उज्वला योजनेत सिलिंडर घेणाऱ्यांची आहे वाढलेले दर त्यांना परवडणारे नसल्याने त्या महीला पून्हा चुलीकडे वळल्या आहेत यामुळे जनतेत संतापाची लाट पसरली असून दरवाढ त्वरीत मागे घ्यावी अशी मागणी ही महीला वर्गाकडून होत आहे.

महिला दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक

जर-जरी ग्रामीण इंडियन गॅस वितरक
सावळदबारा,
ता. सोयगाव, तथा
मो. आरिफ मो. लुखमान, उपसरपंच,
सावळदबारा, ता. सोयगाव